**प्रकाशक :**
जीवन विद्या प्रकाशन
श्री भजनाश्रम, श्री नर्मदांचल,
अमरकंटक, जिल्हा – अनूपपुर (म. प्र.) भारत

**प्रणेता आणि लेखक :**
ए. नागराज

**संस्करण :**

| हिंदी– | | मराठी– |
|---|---|---|
| प्रथम | 1999 | प्रथम ऑक्टोबर 2010 |
| द्वितीय | 2001 | द्वितीय मार्च 2011 |
| तृतीय | 2008 | |
| चतुर्थ | 2010 | |

**सहयोग राशि :**
80/- रुपये मात्र

**ग्राफिक्स आणि डिझाईन :**
**क्रिएशन्स डिझाइनिंग अँन्ड अॅडव्हरटायझिंग**
**मो.** 9881018299 **नागपूर**

# जीवन विद्या : एक परिचय

प्रणेता -

**ए. नागराज**

श्री भजनाश्रम, श्री नर्मदांचल,
अमरकंटक जि. अनूपपुर,
म. प्र. भारत

# जीवन विद्या - एक परिचय

जीवन ज्ञान संबंधी अध्ययन अस्तित्व मूलक मानव केंद्रित चिंतन विधि से प्राप्त हुआ । ऐसी प्राप्ति ए. नागराज, अमरकंटक, भजनाश्रम निवासी को प्राप्त हुआ।

मैं नागराज, बता रहा हूँ कि साधना समाधि संयमपूर्वक अस्तित्व मूलक मानव केंद्रित चिंतन मुझे समझ में आया । मैं इस आधार पर साधना किया । ब्रह्म से जगत पैदा हुआ, ब्रह्म सत्य जगत मिथ्या कहा जाता है शास्त्रों में । इस जिज्ञासावश मैं साधना किया । संयमपूर्वक जब संपूर्ण अस्तित्व को अध्ययन किया अध्ययन विधि से, तब ये पता चला ब्रह्म से कोई चीज पैदा नहीं हुआ है । ब्रह्म में संपूर्ण प्रकृति काम कर रहा है । विगत से दोनों विधा से, आदर्शवादी, भौतिक विधा से, किये गये अध्ययन में छूटे हुए मुद्दे तीन बिन्दुओं में मुझे समझ में आए, सहअस्तित्वरुपी अस्तित्व दर्शन ज्ञान , जीवन ज्ञान, मानवीयतापूर्ण आचरण ज्ञान। मानवीयतापूर्ण आचरण ज्ञान संबंधी बात पर सभी समुदाय कुछ कुछ सोचा । यह किसी समुदाय से आचरण सर्वमानव को स्वीकार नहीं, यह आंकलन बीसवी शताब्दि के अंत तक हुआ । इक्कीसवी शताब्दि के प्रथम दशक में अस्तित्व मूलक मानव केंद्रित चिंतन मानव गोचर होने लगा। कुछ ज्ञानी, विज्ञानी, अज्ञानियों में स्वीकृत होने लगा । इससे मेरा मन यह स्वीकार किया यह सर्वमानव उपयुक्त है । इसी आधार पर सर्वमानव सम्मुख प्रस्तुत करने का प्रयत्न किया । आशा है इससे सर्व मानव उपकृत हो ।

योग संयोगवश आयुष्मान योगेश एवं आयुष्मति सुवर्णा इस

अध्ययन के संपर्क में आए । आपकी इच्छा हुई, इसमें से जीवन विद्या - एक परिचय शीर्षक से जो प्रस्तुत हुआ , मराठी भाषा में प्रस्तुत करने की इच्छा प्रकट किये ।यद्यपि यह मूलतः पूरा हिंदी भाषा में लिखा हुआ है । दस बारा पुस्तिकाओं में पूरी बात प्रस्तुत हुई है । उसमें से अभी जो जीवन विद्या -एक परिचय को प्रस्तुत किये है, मराठी भाषाविद् विद्वान लाभान्वित होंगे ऐसा मेरा विश्वास है ।

भाषा संबंधी परिपूर्णता की जिम्मेदारी और इसे शुद्ध रुप में प्रस्तुत करने की जिम्मेदारी योगेश, सुवर्णा दम्पति के साथ समाहित है।

इसमें उन्हें श्री. एन. एस पुराणिक, रायपुर, श्री एवं सौ. गिरिजेश एवं जयश्री शास्त्री पुणें, श्री एवं. सौ. रमेश एवं अनुपमा दिवटे, पुणें इनसे सहयोग प्राप्त हुआ है। विश्वास करता हूँ उन्नत मराठी भाषा इससे गौरवान्वित होगा ।

**ए. नागराज**
श्री भजनाश्रम, श्री नर्मदांचल,
अमरकंटक
जिला- अनूपपुर, म. प्र., भारत

# जीवन विद्या : एक परिचय

**मा**नव बंधूंनो ! मी स्वतः हून ,स्वेच्छेने विगत वाङमयाला ऐकले आहे. ह्यामध्ये आणखी कुणाचाही दबाव नव्हता. समजून घेतल्यानंतर मला एक इच्छा झाली, हया पृथ्वीवर मानव कसा असला पाहिजे ? तिच्यासाठी माझ्या आतूनच एक उद्‌गार बाहेर आला. तो असा, ''भूमि स्वर्ग व्हावी ,मनुष्य देव व्हावेत ! धर्म सफल होओ, नित्य शुभ होओ.''

।। भूमि स्वर्गताम् यातु,
मनुष्यों यातु देवताम्,
धर्मो सफलताम् यातु ।।
नित्यम् यातु शुभोदयम्।।

हे कसे उद्‌गमित झाले, त्याची पार्श्वभूमी मी आपल्यासमोर ठेवू इच्छितो. ही (माझी) शरीरयात्रा एका परिश्रमी, सेवाव्रती, वैदिक धर्मपरायण, आर्यश्रेयवादी कुटुंबात सुरु झाली . आपल्या सगळयांना हे माहिती आहे की प्रत्येक मानवाचे मूल एखाद्या आईच्या पोटी जन्म घेते. कोणत्याही एका धर्माला मानणारे असतेच. कुठल्या न कुठल्या राज्याच्या संविधानाला त्याने स्वीकारलेले असते. परंपरेमध्ये प्राप्त शिक्षा-विद्‌वानांनुसार चालून पाहते, ही झाली आजपर्यंतची परंपरा. त्याच पद्धतीने मी सुद्धा जिथून सुरुवात ( शरीरयात्रेची) केली, ज्या कुटुंबातून सुरु केली, ह्याच सगळयातून जात राहिलो. त्याचबरोबर रुढी, परंपरा ह्यांच्यानुसार ''ह्यांच्याबरोबर बस, ह्यांच्या बरोबर बसू नकोस, हे कर, हे करु नको'' ह्या गोष्टी जेव्हा सुरु झाल्या तेव्हा ह्या रुढींनी माझे मन तृप्त झाले नाही. ह्या लहानपणाच्याच गोष्टी आहेत, हे बालपण आहे (हा लहान आहे अजून), असाही विचार वडीलधारी मंडळी करत राहिली. काही दिवसांनंतर ते लोकसुद्धा बदलायला लागले. त्यांच्या नजरा, चेहरे, हावभाव सगळे बदलायला लागले .मला वाटले,

वडीलधारी मंडळी माझ्यामुळे नाखूष आहेत. माझ्यासाठी प्रश्नाचे हे पहिले कारण झाले, पण (त्यांना) खूष तरी कसे करणार ? जसं ते म्हणत होते, तसंच करतानासुद्धा मी कसोट्या लावायला सुरुवात केली. मला  असं दिसलं की ते नेहमी ,रोज, प्रत्येक वेळी प्रसन्न राहत नाहीत. हा गाभा आहे किंवा ह्या सगळयाचे मूळ इथे आहे. जेव्हा  मला वाटायला लागलं की आपली वडीलधारी मंडळी मला ‘‘असं कर, तसं करु नकोस’‘ असं म्हणतात, तेव्हा ते स्वतः तसं करतात किंवा करत नाहीत पण नेहमी, प्रत्येक दिवशी , प्रत्येक क्षणी ते खूष नसतात. खरं पाहिलं तर त्यांच्यापेक्षा अधिक आर्यश्रेय, व्यासंगी ,विद्वान कुठे शोधूनही सापडणार नाहीत. ह्या सगळयाचे अध्ययन करुन मी मनातल्या मनात निर्णय घेतला की, कोणत्याही पद्धतीने रुढी किंवा परंपरांना मानायचेच नाही. एक प्रकारे ही प्रतिज्ञाच व्हायला लागली आणि दुसऱ्या कारणाची भर पडली ती ही की वडीलधारी मंडळी मला समजावून सांगू शकत नव्हती. एकूण काय, जितक्या वेळा ते सफल झाले नाहीत; तेवढाच माझा अहंकार सुद्धा वाढायला लागला. माझा वाढता अहंकार आणि परंपरांना अमान्य करणं हे बरोबरीनेच व्हायला लागलं. ह्या क्रमाने जाऊन मी काय करणार होतो ? आता वडीलधारी मंडळी असा दावा करायला लागली की, ह्याला ना वेद माहिती ना वेदांत, शास्त्र काय आहे हे ह्याने जाणले नाही. हा स्वतःमध्ये स्वयंभू असल्यासारखा प्रत्येक रुढी, प्रत्येक विचारांना नाकारतो आहे; हे कितपत योग्य आहे ? ह्या मुद्यांवर (ते) काळजी करायला लागले. माझ्यासाठी प्रश्नाचे हे दुसरे कारण झाले. आता मी काय करणार होतो? माझ्याकडे दुसरा मार्गच उरला नाही तेव्हा मी आर्ष ग्रंथांनुसार (ऋषीकुळाच्या वेळी लिहिलेले ग्रंथ) वेदांतांना समजून घ्यायला सुरुवात केली ज्यांना ते (वडीलधारी मंडळी) सर्वोच्च मानत होते.

पहिली भूमी आहे वेदांत अर्थात् मानलेल्या वैदिक

विचारांचे कर्म. वैदिक विचारांनुसार कर्म त्याच गोष्टीला मानतात ज्यामुळे स्वर्ग मिळतो, बाकी सगळयांना अजून काही वेगळी नावे आहेत. ज्यामध्ये इन्द्र किंवा दुसरे देव बनण्यासाठी उपक्रम केले जातात त्याला वेद-उपासना म्हणतात. तिसऱ्या शीर्ष भागात असे म्हटले आहे की ज्ञान हे सर्वोच्च आहे. ज्ञान काय आहे हे विचारले तर म्हणाले ब्रह्मज्ञान ! ब्रह्म काय आहे हे (मी) विचारले तर (मला) उत्तर मिळाले, तुला नाही समजणार, (मला) समजलंच नाही तर हे अडथळे कसे ओलांडणार ? वडीलधारी मंडळी म्हणतात ''करा, करु नका'' ह्याच पद्धतीने (तू) करणार. आता काय करावे ? काय होणार ? ''हे तुला समाधीमध्ये मिळेल. समाधीमध्ये सगळया प्रश्नांची उत्तरे मिळतात'', असे आश्वासन मला वडीलधाऱ्यांकडून मिळाले. ह्या आधारावर मी आपले मन सुदृढ केले की, काहीही झाले तरी एकदा समाधी स्थितीपर्यंत पोहोचून बघायचेच. ह्याशिवाय दुसरी कोणतीही गोष्ट करणे ठीक नाहीच. मी कोणताही दावा करण्यात किंवा न करण्यात काहीही अर्थ नाही. एकदा मला माझ्या प्रश्नांची उत्तरे मिळायला हवीत. वेदांतांना जेव्हा (मी) व्यवस्थित ऐकले, तेव्हा असा प्रश्न उभा राहिला की 'बंधन' आणि 'मोक्ष' काय आहे ? ही जी 'माया' आहे त्यामुळेच आपण बंधनात राहतो असं ते म्हणतात. आत्मा जेव्हा ब्रह्मामध्ये विलीन होतो त्याला ते मोक्ष म्हणतात. आत्मा कुठून आला ? असे विचारले तर ते म्हणतात की जीवांच्या हृदयात ब्रह्म स्वतः आत्म्याच्या रुपात राहते. जीवांच्या मुक्तीसाठी म्हणजेच स्वर्ग-नरकातून येण्या-जाण्याच्या प्रक्रियेतून मुक्तीसाठी जर आत्मा ब्रह्मामध्ये विलीन होणे आहेच तर मग बह्म (स्वतः) जीवांच्या हृदयात आत्मा रुपात का जाऊन बसले ? आधी जीव म्हणून होता त्यावेळी त्यात कोणी आत्मा नव्हता, तेव्हा पुन्हा ब्रह्माला आत घुसण्याची काय आवश्यकता होती ? अशा तऱ्हेने (ह्या चर्चांना) वितंडवादाचे स्वरुप आले. कारण मी वडीलधाऱ्यांच्या स्वरात स्वर न मिसळल्यामुळे त्यांनी मला वितंडवादी असे नाव दिले . मी

म्हटलं ,''तुम्ही जे समजताय ते ठीक आहे, पण ह्या प्रश्नाचे उत्तर तर तुम्हीच देणार ? परंतु ह्या प्रश्नांची उत्तरे (मला) मिळाली नाहीत. ह्या नंतरही हेच म्हटले गेले की ह्याचे सुद्धा उत्तर समाधीतच मिळेल. आता काय करावे? समाधीसाठी तत्पर होण्यासाठी मी हळूहळू तयार झालो. माझं मन हळूहळू तयार झालं. १९४४ पासून समाधीचा विचार करता करता १९४६ पर्यंत समाधीसाठी मी तयार झालो. त्यावेळी अजून एक स्थिती बनली. आपल्या देशात स्वराज्य येणार ह्याची शक्यता बळावली. सगळयांना वाटणाऱ्या आशेनुसार १९४७ मध्ये सत्तेचे हस्तांतरण झाले. ज्येष्ठ चिंतक, विचारक ह्यांचे वक्तव्य मी ऐकत होतो स्वराज्य मिळेपर्यंत तर त्यातही अडचण (व्यतिरेक) होती; म्हणूनही मी दुःखी झालो. आता आपले संविधान तयार होईल ही एक आशा त्यानंतर होती. कदाचित ह्या संविधानामध्ये योग्य (सही) माणसांचे मूल्यांकन करण्याची व्यवस्था असेल. मी स्वतःहूनच विचार करत राहिलो की (ह्या) संविधानातून काही ना काही मार्गदर्शन मिळेल.

संविधानाची जेव्हा रचना झाली ; त्यावेळी वृत्तपत्रांमधून त्याविषयीचा जो तपशील येत होता, तो मी बारकाईने ऐकत होतो आणि समजून घेण्याचा प्रयत्न करत होतो. इ.स. १९५० पर्यंत सगळया गोष्टी ऐकल्यानंतर माझ्या मनात आले की, ह्या संविधानाच्या छायेमध्ये योग्य माणसाचे मूल्यांकन होऊ शकणार नाही. ह्याला आधार कोणता होता? तर योग्य माणसाच्या चारि़त्र्याची ह्यात व्याख्याच दिलेली नव्हती ज्याला आपण राष्ट्रीय चारित्र्य (चरित्र) म्हणू शकू . आता काय करावे ? वेदांत आणि समाधीचे संकट तर होतेच, समाधीतच सगळयांची (प्रश्नांची) उत्तरे मिळणार आहेत. ह्या प्रश्नाला सुद्धा (मी) त्याबरोबर जोडले. समाधीमध्ये ह्यासुद्धा गोष्टीचे उत्तर मिळेल, त्यामुळे

कुठल्याही विद्वान, ज्येष्ठ लोकांबरोबर तर्क करण्याची आवश्यकता नाही. मिळत असेल तर सगळयाच प्रश्नांची उत्तरे मिळतील, नाहीतर ही (माझी) शरीरयात्रा बोधासाठी अर्पित आहे असा मी निर्णय घेतला. ह्यासाठी अजून एक जण (माझ्याबरोबर) तयार झाली, ती म्हणजे माझी धर्मपत्नी. अमरकंटकबद्दल आम्ही ऐकतच होतो की नर्मदेचे उगमस्थान आहे , प्राणस्थान आहे. तिथेच जाऊन शेवटचा प्रयत्न का बरे करु नये? असा विचार करुन आम्ही अमरकंटकला आलो. इथे येऊन आगम तंत्रोपासना ह्या विधिने मी साधना करु लागलो. ह्या विधीमध्ये समाधीची एक पद्धत सांगितली आहे, ज्यामध्ये सगळया देवांना, देवींना, आपल्याच शरीराच्या प्रत्येक भागात आपल्या कल्पनेने पहायचे असते, त्यांची पूजा करायची असते. आपल्या शरीराच्या वेगवेगळया भागात हे -हे देव आहेत, ही कल्पना करायची असते. त्या क्रियेला म्हटले आहे ''न्यास'' ह्याच्या मुळाशी एक सूत्र दिले आहे, ''देवोभूत्वा देवान् यजेत्'' म्हणजे ''तुम्ही स्वतः देवरुप होऊन देवांची आराधना करा''. ही गोष्ट मला सांगितली गेली होती. त्याबरोबर सांगितल्याप्रमाणे प्रामाणिकपणे सगळं करण्यासाठी मी तत्पर झालो. जसं जमत होतं तसं करत होतो. असं करता करता एक दिवस असा आला की, मी देवांच्या /देवींच्या सान्निध्यातून मुक्त झालो. ''मी आहे'' ह्याचा बोध होता माझ्याजवळ आणखी कोणताही विचार नव्हता.

मला एखादी गोष्ट मिळवायची आहे ह्याबाबत कुठला विचार नव्हता. माझ्याजवळ कुठली गोष्ट आहे हा विचार सुद्धा नव्हता. मला काही करायचे आहे हा सुद्धा विचार नव्हता. एक नवीन गोष्ट, छोटीशी गोष्ट, ही छोटीशी घटना घडली. ह्या घटनेनंतर काही तासांपर्यंत हीच स्थिती होती. ह्यानंतर जसं मला शरीर, वेळ ह्यांचा बोध झाला, तेव्हा कळलं की, ह्या तिन्हींचा मला बोधच नव्हता. माझ्याकडे विचारच नव्हता, असा मला स्वत : मध्ये विश्वास वाटला.

हे झाल्यानंतर मी विचार केला की, मला समाधी स्थिती प्राप्त झाली आहे, त्या स्थितिची मी प्रतिदिन पुनरावृत्ती करत होतो. काही तासांपर्यंत मी पुनरावृत्ती करत होतो आणि माझ्या प्रश्नांची उत्तरे आता मिळतील, मग मिळतील ह्याची वाट पहात होतो, पण अनेक वर्षे वाट पाहिल्यानंतर सुद्धा प्रश्नांची उत्तरे मिळाली नाहीत. हा दुसरा निष्फळ प्रयत्न होता. आता काय करावे? वेदांतांना समजल्यानंतर उत्तर मिळाले नाही. समाधीनंतर उत्तर मिळाले नाही. आमच्या कुटुंबातील जे सर्वोच्च विद्‌वान आहेत, ते सुद्धा काही सांगू शकत नाहीत, तर आता कुठे जावे ? आता कुणावरही आरोप करायची सोय राहिली नाही, ह्या जाळयात मी आपल्या ढंगाने राहिलो. एके दिवशी असे वाटले की, समाधीबद्‌दल जे काय मी ऐकले होते त्यावरुन मला विश्वास सुद्धा वाटला की समाधी झाली आहे, पण हीच समाधी आहे हे मी दुसऱ्यांना कसे सांगणार ? ह्याला मी सुदृढ कसे मानणार ? प्रमाण काय मानणार ? ह्यात सांगण्यासारखी तर कोणतीही गोष्ट नाही, तर मग मी प्रमाण कसे देणार ? जेव्हा ही जिज्ञासा प्रबळ झाली तेव्हा मला समाधी झाली की नाही ह्याची खात्री करुन घेण्यासाठी मी ‘संयम’ नावाची एक क्रिया केली. हा सुद्धा पूर्वजांकडून मिळालेला सल्ला होता. पातंजली योगसूत्रात ह्याचा उल्लेख आहे, त्यात लिहिले आहे, ‘धारणा ध्यान समाधि त्रयमेकत्रत्वात्‌ संयमाः।’ कुणीही बुद्धिमान माणूस ह्याला वाचून बघू शकतो. संयमाबद्‌दल जे काही लिहिले आहे, ते मी स्वीकारु शकलो नाही. माझ्या पद्धतीने मी संयमाचे चित्र रंगवले, पद्धत बनविली. त्या पद्धतीने मी संयम केला. संयम केल्यामुळे मला संपूर्ण अस्तित्वातील एक एक कण माझ्यासमोर दिसायला सुरुवात झाली. दिसला ह्याचा अर्थ समजला असा आहे.

एका अणुपासून (परमाणुपासून) सुरुवात करुन एवढी मोठी पृथ्वी कुठल्या कुठल्या प्रक्रियेतून गेली, त्याला मी क्रमाने बघितले आहे. विधिवत पाहिलं आहे. त्याचा तुम्हाला बोध करुन

देतो. ही स्थिती माझ्यामध्ये स्थापित झाली. ह्या बरोबर अणुंच्या (परमाणुंच्या) ओळीत एक जीवन अणु (परमाणु) सुद्धा पाहिला. माझ्यात, तुमच्यात, आज जन्म झाला त्यामध्ये, शरीर सोडलेल्या स्थितीमध्ये हा जीवन अणु (परमाणु) समान राहतो ह्याचा बोध झाला. शरीर सोडून सुद्धा 'जीवन' राहतो आणि शरीराबरोबर सुद्धा तो राहतो. शरीराबरोबर तो का राहतो ? ह्याबद्दल विचारलं तर पुढे प्रसंग आल्यानंतर मी सांगेन. ह्या ठिकाणी मी पाहिलं की शरीराच्या माध्यमातून 'जीवन' स्वतःला मानव परंपरेमध्ये प्रमाणित करु इच्छितो एवढेच ह्याचे सूत्र आहे. जीवन काय प्रमाणित करु इच्छितो ? त्याचं उत्तर मिळालं, 'जीवन' आधी जगू इच्छितो, त्यानंतर तो जगताना सुखी होऊ इच्छितो. सुखी होण्याबरोबरच तो प्रमाणित होऊ इच्छितो.

ह्या तीन स्थिती आहेत. त्यातली जी पहिली स्थिती आहे, जगू इच्छितो, हे जीवावस्थेतच पूर्ण होऊन जाते. सुखी होऊ इच्छितो आणि प्रमाणित होऊ इच्छितो, हे मानव अवस्थेतच पूर्ण होऊ शकते, दुसरीकडे पूर्ण होऊ शकत नाही. मी ह्याला व्यवस्थित पाहिले आहे, समजले आहे, ही खूप संतुष्टीची जागा मला मिळाली. त्यानंतर, त्यानुसार, सुखी होण्यासाठी एक सूत्र सुद्धा बघितले 'समाधान समृद्धिपूर्वक व्यवस्थेमध्ये जगणे'.

जितक्या काही भौतिक रासायनिक वस्तू आहेत (जड संसार) म्हणजे ज्याला आपण पदार्थावस्था, प्राणावस्था म्हणतो त्या वस्तू घन, द्रव, वायू रुपात आहेत आणि जितक्या प्राणकोशिकांनी (प्राण पेशींनी) बनलेल्या रचना आहेत, त्यांच्या मुळाशी खूप रस - रसायनांचा संयोग असण्याचा अनुभव झाला आहे. मानव जातीला अजून जे काही करायचे आहे, मानवजात ते करत राहील. सगळया रस रसायनांच्या संयोगानेच शरीर रचना पाहिली. भौतिक रासायनिक वस्तुंनीच जीव शरीर आणि मानव शरीर सुद्धा बनते,

तर ह्या जीवजंतु आणि माणसांच्या शरीर रचनेमध्ये मी हा फरक बघितला की मानव शरीर रचनेमध्येच मेधस तंत्र (मज्जा संस्था) पूर्ण समृद्ध होऊ शकते. समृद्ध होण्याचा अर्थ असा आहे की 'जीवन' बहुमुखी विधीने स्वतःला प्रमाणित करण्यायोग्य मेधस तंत्र असते, ह्याला मी अचूकपणे बघितले आहे.

हे सगळं बघितल्यावर मला वाटलं, जीवावस्थेतील जीव आपल्या व्यवस्थांमध्ये आहेत, स्वतःमध्येच त्यांची एक व्याख्या आहे. परिभाषा आहे. मला हे सुद्धा कळाले की त्याच पद्धतीने मानव सुद्धा त्व सहित व्यवस्थेच्या रूपामध्ये परिभाषित होऊन जगू लागला तर सुखी होऊ शकतो. खरेच 'मोक्ष' काय आहे ? 'बंधन' काय आहे ? ह्यांचीसुद्धा उत्तरे बरोबरीनेच मिळाली. ज्या गोष्टीसाठी मी निघालो होतो त्याचे उत्तर ह्याच जागी मिळाले, कसे मिळाले ? प्रत्येक माणसाच्या शरीराला 'जीवन ' संचालित करतो. प्रमाणित काय करायचं आहे ? ह्या आधी सांगितले, सुखाला प्रमाणित करायचं आहे. सुख प्रमाणित करण्यासाठी काय व्हावं लागतं ? समजदार व्हावं लागतं. माणूस समजून व्यवस्थेला प्रमाणित करेल आणि सुख प्रमाणित करेल. दुसऱ्या कोणत्याही पद्धतीने प्रमाणित करु शकणार नाही. मी स्वतः जेव्हा साधना करत होतो, तेव्हा सगळे लोक म्हणायचे, किती व्यवस्थित नियमाने, संयमाने, काटेकोरपणे हा माणूस राहतो आहे. सगळे लोक गर्दी करुन मला पहायला यायचे पण मी शपथेवर सांगतो की माझ्या साधनेच्या प्रारंभिक स्थितिमध्ये मानसिकतेमध्ये कोणताही संयम नव्हता. जोपर्यंत मी समाधिस्थ झालो नाही तोपर्यंत माझ्यामध्ये कोणताही मानसिक संयम नव्हता. इतकंच होतं की मला साधना करायची आहे. आणखी कुठलेही वेडेवाकडे काम मी करु शकत नाही, पण वेडयावाकडया गोष्टी माझ्या मनात येणारच नाहीत असे काही नव्हते. ह्या आधारावर मी ठासून सांगू शकतो की जोपर्यंत माणूस समाधिस्थ होत नाही तोपर्यंत वेडेवाकडे विचार येणार

नाहीत, असा कोणताही कायदा संपूर्ण अस्तित्वात नाही. माणसाला स्वतःला वाटत नाही की वेडेवाकडे विचार मनात यावेत. साधना करणाऱ्या कुणाचीही अशी इच्छा नसते. माझी पण इच्छा नव्हती तरी सुद्धा होत होते. सगळयांसमोर हे संकट येते. जोपर्यंत साधक ह्याला पेलू शकतो (तो) पेलतो, पेलू नाही शकला तर पेलत नाही, हेच मी म्हणू शकतो, हीच ह्याची समीक्षा आहे.

आता 'बंधन' आणि 'मोक्ष' काय आहे ह्याचे उत्तर मिळाले आहे. भ्रम किंवा नासमजदारी (नासमझी) म्हणजे बंधन. नासमज असणे म्हणजे काय तर आपण जीव जनावरांसारखे जगणे, जनावरांच्या क्रियांना मानवासाठी प्रमाण कसे मानणार ? ह्यालाच प्रमाण मानले, त्यानुरुप जगण्यासाठी जर मानव प्रवृत्त झाला तर हाच मानव जातीसाठी भ्रम आहे. समजदार न होता जगण्यासाठी परंपरा आपल्याला भाग पाडते. ह्याचा पुरावा आहे, कामोन्मादी मनोविज्ञान, भोगोन्मादी समाजशास्त्र आणि लाभोन्मादी अर्थशास्त्र. ह्यातून जाणारा माणूस आपल्या मुलांना ''खूप चांगला हो, श्रेष्ठ हो, संस्कारी हो, सुखद हो, सुशील हो'', असा आशीर्वाद देतो. आता ह्याचा आणि त्याचा ताळमेळ कुठे आहे ? मुलांना आपण जे शिकवतो त्याचा आणि आपण देणाऱ्या आशीर्वादाचा ताळमेळ कुठे आहे ?

दुसरा प्रश्न होता, राष्ट्रीय चारित्र्याविषयी (चरित्र), त्याचं पण उत्तर मिळालं. काय मिळालं? अस्तित्वामध्ये प्रत्येक आपल्या 'त्व' सहित व्यवस्थेमध्ये आहे. समग्र व्यवस्थेमध्ये भागीदारी करतो आहे. ही गोष्ट मानवामध्ये सुद्धा येण्यासाठी मार्ग मिळाला. मानवाची परिभाषा मिळाली. जागृत मानवाच्या कार्य व्यवहाराचे स्वरुप ''मानवता'' आहे. त्या कार्यव्यवहारास जेव्हा आपण सूत्रबद्ध करतो, व्यवहारामध्ये व्याख्या करतो, त्यालाच समाजशास्त्र किंवा संविधान म्हणतात. मानवाच्या आचरणाचा बोध करवणे हीच समाजशास्त्राची

मूळ वस्तू आहे असे मला समजले. ह्या पद्धतीने मला दोन्ही मुद्‌दयांची उत्तरे मिळाली. संविधानातूनच मानवीय आचार संहिता मिळेल. संविधान रुपात आपण राष्ट्रीय चारि‌त्र्य ओळखू शकतो. ह्यानंतर आपण भ्रममुक्त होऊ तर, माणसासारखे जगू, हीच भ्रमातून मुक्ती आहे, मोक्ष आहे. ना बर्फाचा दगड करायचा, ना दगडाचे पाणी करायचे, ना कुणाला आशीर्वाद द्यायचा ना कुठली सिद्धी वा चमत्कार करायचा. मी अचूकपणे पाहिले आहे की अस्तित्वामध्ये कुठल्याही प्रकारची सिद्धी वा चमत्कार नाही. शाप आणि अनुग्रहामध्ये कण्हणारी कित्येक कोटी माणसे आजही आहेत, म्हणून ह्याचे एकच उत्तर आहे की ज्या क्षणी आपण सगळे जागृतिच्या दिशेने एक जरी पाऊल टाकतो, त्या मुहूर्ताला सगळे शाप, ताप, पाप तिन्ही ध्वस्त होतात.

त्याचा कुठलाही कलंक रहात नाही. ते कसं, ह्याचं उत्तर गणिती पद्धतीने दिले आहे. जसं आपण गणित हजार वेळा चुकीचं करतो, पण जेव्हा बरोबर करता येते, तेव्हा आयुष्यभरासाठी होऊन जातं. जोपर्यंत चूक करत राहतो तोपर्यंत एकदा केलेली चूक पुन्हा दुसऱ्यांदा करत नाही. दुसऱ्या वेळेस दुसरीच चूक करतो. त्याला सुद्धा घटना रुपात आपण हे बघू शकतो की कोटी मुलांना जरी गणिताचा कुठला प्रश्न दिला तरी बरोबर उत्तर असेल तर सगळयांचे एकच उत्तर येते. चूक असेल तर कोटी उत्तरे असतील. प्रत्येक सामान्य माणूस ह्याचे सर्वेक्षण करु शकतो. ह्या पद्धतीने मला आणखी एक सूत्र मिळाले, ‘‘आपण माणसं बरोबर असू तर एक आहोत, चूक असू तर अनेक आहोत. (हम मानव सही में एक हैं गलती में अनेक।)

जेव्हा अस्तित्वाला पाहिले, तेव्हा एक महिमासंपन्न सूत्र मला मिळाले. अस्तित्वामध्ये दोनच जातीच्या वस्तू आहेत. पहिली, ज्याला आपण एक एक करुन मोजू शकतो त्याला प्रकृती म्हणू

शकतो आणि दुसरी, जी सगळीकडे पसरलेली आहे, प्रत्येक जण एका क्षणात ह्याला समजू शकतो. ह्या दुसऱ्या वस्तूमध्ये पहिली प्रत्येक वस्तू भिजलेली आहे, बुडालेली आहे, प्रत्येक वस्तुला दुसऱ्या वस्तुने घेरलेले आहे. ह्याला व्यापक वस्तू म्हणू शकतो. एक एक वस्तू (एकके) दोन जातीच्या आहेत - एक जड (भौतिक रासायनिक वस्तू) आणि दुसरी चैतन्य. चैतन्य वस्तू म्हणजे जीवावस्था, ज्ञानावस्था आणि जड वस्तू म्हणजे पदार्थावस्था, प्राणावस्था. ह्यात सगळी खनिजं, माती, धातू आणि प्राणकोशिकांनी बनणाऱ्या, ऱ्हास होणाऱ्या सगळया वस्तू आहेत. ह्या जितक्या काही वस्तू आहेत, त्या व्यापक वस्तुमध्ये भिजलेल्याच आहेत, बुडालेल्याच आहेत, घेरल्या गेलेल्याच आहेत, हे मी अचूकपणे बघितले आहे. व्यापक वस्तुपासून एक एक वस्तू वेगळी होण्याची अस्तित्वामध्ये कुठली तरतूदच (प्रावधान) नाही. अस्तित्वात ज्याची तरतूदच नाही (प्रावधान नाही) त्या गोष्टीला माणूस निर्माण करु शकत नाही.

अस्तित्वात ज्या गोष्टींची तरतूद आहे (प्रावधान आहे) त्याचा उपयोग सोडून जर दुरुपयोगाच्या दिशेने जाऊन माणूस काही प्राप्त करु लागला तर विनाशाशिवाय काहीही हाती लागत नाही. जसं - युद्धासाठी आपण खूप गोष्टींचा उपयोग केला. त्यामुळे धरती आणि माणसांचा विनाश करण्याशिवाय आपण काही करु शकलेलो नाही. कदाचित हे सगळं हळूहळू शास्त्रज्ञांना समजायला लागलं आहे. जर हे आधी समजलं असतं तर मानव सुखी आणि समृद्ध होऊ शकला असता. अनेक घाट ओलांडल्यानंतर नदी समुद्राला जाऊन मिळते, कदाचित हीच नियती असेल. आधी आदर्शवादामध्ये, रहस्यमयी स्थितीमध्ये माणसाला यावं लागलं, स्वीकारावं लागलं त्यामुळे जो थोडासा बचाव (राहत) झाला तो माणसासाठी पुरेसा नाही झाला. पुन्हा भौतिकवादाच्या जाळ्यात अडकले. ह्यामुळे सुद्धा जी मदत (राहत) मिळाली ती सुद्धा सुख समृध्दिसाठी पुरेशी झाली नाही. आज जे दु:ख आहे, ही त्याची गोष्ट

आहे. ह्या दोन्ही मार्गांनी आपल्याला पूर्ण मदत मिळाली नाही, त्यामुळे स्वाभाविकपणे तिसऱ्या पायरीची आवश्यकता आहे.

ह्या पद्धतीने 'बंधन' आणि 'मोक्ष' ह्याची जी उत्तरे मिळाली ती अशी- ''माणूस जेव्हा समजदार होतो तेव्हा त्याला बंधनापासून मुक्ती मिळते, समजदार कसे व्हावे''? ह्यासाठी जेव्हा मी पाहिलं की, माझ्यात कोणता भ्रम आहे? मी माझ्यामध्ये शोध केला. माझ्यामध्ये मी तपासले, तेव्हा कळाले की, माझ्यामध्ये बंधनाचं कोणतंही कारण दिसत नाही, मग हीच स्थिती सगळयांमध्ये का बरे निर्माण करु नये? सगळ्यांमध्ये निर्माण केल्यानंतर कसं वाटेल ? तसंच वाटेल जे तुम्हाला आधी ऐकवलं होतं ''धरती स्वर्ग होईल, मानव देव होईल, सगळे धर्म सफल होतील, नित्य शुभच होईल''. परंपरा रुपात नित्य शुभ होईल. ह्या सगळया गोष्टींना मग मी माझ्यामध्येच तपासायला लागलो. ह्या सगळया गोष्टी मी संप्रेषित करु शकेन काय ? ह्याची लोकांना आवश्यकता आहे की नाही ?

त्यानंतर हे सगळं सुरु झालं तर मुख्य मुद्‌दा हाच होता, ज्यामुळे मी माझ्याच बाबतीत आश्वस्त झालो की संविधानामध्ये मानवतेच्या आचरणरुपी मानवीय आचार संहितेचा समावेश करु शकू, ज्यामुळे मानवीय राष्ट्रीय चारित्र्य (चरित्र) प्रमाणित होईल, ह्या ठिकाणी मी निश्चिंत आहे. मी स्वतः पारंगत आहे आणि प्रमाण सुद्धा आहे. 'अस्तित्व' मला समजलेले आहे, तुम्हांला समजावून देईन, 'जीवन' मला समजलेले आहे आणि तुम्हाला समजावून देईन, मानवीयतापूर्ण आचरण मला समजलेले आहे तुम्हाला समजावून देईन. जर ह्या तिन्ही गोष्टी समजल्या आहेत, तर असं मानू की आपण समजदार झालो. भ्रमरुपी बंधनातून मुक्त झालो. आधी वडीलधाऱ्या मंडळींनी काय सांगितलं होतं ? जन्म मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्ती मिळेल. ह्याच्याशी मुक्तीचा काही संबंध नाही. कोणीही गेलेला नाही आणि कोणी येणारही नाही. जे काही आहे ते

अस्तित्वातच आहे.

मृत्यू झाल्यानंतरसुद्धा ‘जीवन’ अस्तित्वामध्ये आहे आणि शरीर चालविताना सुद्धा ‘जीवन’ अस्तित्वात आहे. कोळसा जाळल्यानंतरसुद्धा वेगवेगळया स्वरुपात अस्तित्वात राहतोच. ही गोष्ट भौतिक रसायन शास्त्राचे शास्त्रज्ञ समजलेच असतील. जर समजले नसतील, तर सगळयांना समजावेच लागेल, त्याशिवाय तरणोपाय नाही. ह्या पद्धतीने ‘समजदारी’ कळते. मुळात वस्तुचा नाश होत नाही. त्याच आधारावर मी मंगल कामना केली आहे की जमीन जर एकसंध राहील, मानव जर व्यवस्थेमध्ये जगू शकत असेल तर हाच नित्य सार्वभौमिक मंगल होण्याचा आधार आहे. ह्या पद्धतीने जी मंगल कामना माझ्या मनातून उमटली त्याच्या समर्थनासाठी संपूर्ण अस्तित्वामध्ये मानवीयतापूर्ण आचरण हाच एक प्रमुख मुद्दा आहे. ह्यामुळे मोठे उपकार असे होतील की धरतीला जखमी केल्याशिवाय, तिचे पोट फाडल्याशिवाय, काहीही वाया घालविल्याशिवाय माणूस ह्या पृथ्वीवर चिरकालापर्यंत राहू शकेल. ह्याची सुद्धा विधी ह्याच समजदारीने येते, जर धरती स्वतः सांभाळू शकते, सावरु शकते.

आजपर्यंत इतिहासात मानवाने अनाकलनीय पद्धतीने जे काही केले आहे, त्या सगळया घटना समज कमी असल्यामुळे घडल्या आहेत. धरतीला जितके जखमी केले गेलेले आहे, धरतीचे पोट फाडले गेले आहे, तिचे तापमान वाढवले गेले आहे, तिच्या पृष्ठभागावर अनेक प्रकारच्या विकृती निर्माण केल्या गेल्या, त्यामुळे नदी, नाले विनाशाकडे गेले आहेत. हवा, पाणी प्रदूषित केले आहे आणि ह्यामुळे माणूस त्रस्त होतो आहे हे आपणा सर्वांना माहितीच आहे. जोपर्यंत धरतीला त्रास होईल, तोपर्यंत धरतीवर राहणाऱ्या सगळया वनस्पती, सगळे जीव, माणसं सगळेच त्रासात राहतीलच. धरतीला जखमी करुन माणूस स्वस्थ, सुखी राहील अशी कल्पना किती चांगल्या लोकांनी केली असेल, तुम्हीच विचार करा. आता

ह्याच्या पुढे जाऊन एक शुभ गोष्ट अशी आहे की जर आपण धरतीला त्रास देणं बंद केलं तर आपण आश्वस्त होऊ शकू कारण ह्या पृथ्वीच्या पृष्ठभागावर जितक्या संपदा आहेत, त्या स्वतःच पृथ्वीवर राहणाऱ्या माणसांच्या जगण्यासाठी पुरेशा आहेत. चुका, अपराध, द्रोह, विद्रोह ह्या सगळया गोष्टी माणसाला समज नसण्याचाच दोष आहेत. समज असती तर माणूस, पृथ्वी, नदी, ओढे-नाले, डोंगर, जंगल सगळे असंतुलित झाले नसते.

विज्ञान युगात आपण सगळयांनी हे अपराध केलेले आहेत तरीसुद्धा शेखी मिरवून आपण विचार करतो की विज्ञानानेच आपण काहीतरी ठोस, काहीतरी चांगलं मिळवू शकू. खरंतर ह्या पृथ्वीवरुन माणसाची जात नष्ट व्हायची वेळ आली आहे, ह्याकडे लक्ष द्यायची वेळ आली आहे. ह्या प्रश्नातून स्वतःला बाहेर काढायचे असेल तर मानवाला समजदार व्हावेच लागेल, दुसरा कोणताही मार्ग नाही, जितके काही अपराध आहेत, त्यांना समजदारीशिवाय थांबवू शकत नाही, भलेही राष्ट्रीय संविधान विधीने असतील. अपराध तर अपराधच आहे. ह्या पृथ्वीतलावर जितक्या राष्ट्रांमध्ये मानव राहत आहेत त्या सगळया राष्ट्रांचे आपले एक संविधान आहे. ह्या सगळया राष्ट्रांच्या संविधानामध्ये तीन मुख्य मुद्दे आहेत, एक वचन आहे. महावाक्य आहे. ''शक्ती केन्द्रित शासन.'' शक्ती केंद्रित शासनाची जी व्याख्या दिलेली आहे त्यात तीनच कामे आहेत. चुकांना (दुसरी) चूक करुनच थांबवणे, अपराधांना अपराधी पद्धतीनेच थांबवणे, युद्धाला युद्ध करुनच थांबवणे. ह्या तिन्ही कामातून आपण अपराधांपासून मुक्त झालो असं अजिबात दिसत नाही आणि ह्या तिन्ही गोष्टी आपोआपच प्रत्येक दिवशी, प्रत्येक महिन्याला, प्रत्येक वर्षी, प्रत्येक शतकात अजूनच मजबूत होत आहेत. युद्ध मजबूत होणं, अपराध विपुल असणं, चुकांच्या रांगा ह्या सगळ्यांनीच इतिहासाची पानं रंगलेली आणि भरलेली आहेत. ही साक्ष आहे, ह्या सगळयांवर जर आपण समाधान

शोधायला सुरुवात केली तर कळतं की ह्या सगळयांच्या मुळाशी ह्या परिस्थितींना निर्माण करणारा फक्त माणूसच आहे. दुसरे महत्त्वाचे कारण आहे, धर्म संविधान. संपूर्ण पृथ्वीतलावर जितके धर्म संविधान आहेत, त्यात असे मानलेले आहे की माणूस मुळातच पापी, अज्ञानी, स्वार्थी आहे. पण वास्तव तर याहून वेगळे आहे. पापी लोकांना तारण्यासाठी, अज्ञानी लोकांना ज्ञानी करण्यासाठी, स्वार्थी लोकांना परमार्थी बनवण्यासाठी सगळ्या धर्म संविधानांनी आपल्या पद्धतीच्या युक्त्या, चरित्र, कर्तव्य, दायित्व, कर्मकांड इ. गोष्टी बनवल्या. ही सुद्धा एक सुस्पष्ट घटना आहे. ह्यांचा काय परिणाम झाला ? अजूनपर्यंत कोणी अज्ञानी माणूस ज्ञानी झाला आहे असं मानव जातीने ओळखलेलं नाही. स्वार्थी परमार्थी झाला आहे ह्याचे सुद्धा प्रमाण मिळाले नाही, पापी माणूस पापातून मुक्त झाला ह्याचे सुद्धा काही प्रमाण मिळाले नाही.

मी ह्याआधी आपल्याला काही सांगितलेलं होतं. समाधीपर्यंत साधना आहे. साधनेच्या काळात मानव वैचारिक रूपामध्ये समाधानित असेल असे होत नाही. मन उद्वेलित असतंच कारण (वेगवेगळया) प्रश्नांमुळे, त्रासूनच मानव समाधीकडे धाव घेतो. समाधीपर्यंत प्रयत्न करत असतानाच माणसाची उंची दिसते. साधनाकाळात माणसाच्या मनात खूप वेड्यावाकड्या गोष्टी येतात, समाधीनंतर त्यांचे शमन होते. विकल्प विधी म्हणजे अध्ययन, पारंगत, प्रमाण विधी आहे.

हे पण बघितलं की समाधीनंतर मानवाला काहीही करायची इच्छा होतच नाही, काही मिळवायची इच्छा होतच नाही, काही ठेवण्याची इच्छा होतच नाही. मग हे सगळं तयार करण्याची मला कशी इच्छा झाली ? मी विनयाने आपण सगळ्यांना हे आधीच सांगितले आहे की मी मुक्तिसाठी, स्वर्गासाठी समाधी अवस्थेत गेलो नव्हतो, तर माझ्या प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्यासाठी समाधीसाठी

प्रवृत्त झालो होतो. समाधीमध्ये माझ्या प्रश्नांची उत्तरे मिळाली नाहीत तर खरंच मला समाधी झाली होती किंवा नाही ही गोष्ट तपासण्यास मी सुरुवात केली. तपासतानाच ह्या सगळया गोष्टी समजल्या. माणसाच्या पुण्याईने, भविष्यासाठी, सर्वशुभ व्हावे, सर्व कल्याण व्हावे ह्यासाठी ह्या सगळया गोष्टी कळाल्या. ह्या पुस्तकांतून मिळालेल्या नाहीत, ही खरी गोष्ट आहे. वडीलधाऱ्या मंडळींनी मला इतकंच मार्गदर्शन केलं होतं की समाधीतूनच उत्तर मिळेल, समाधी मला झाली किंवा नाही, ह्याला प्रमाणित करण्यासाठी मी 'संयम' केला, म्हणूनच मला ह्या सगळया गोष्टी कळाल्या. माणसाची समज ही (लाटेसारखी) तरंगासारखी आहे. आधी जंगल युगात, पाषाणयुगात, धातुयुगात माणूस कसा जगलेला आहे हे सगळं इतिहासात लिहिलेलं आहे. राजयुग आल्यानंतर पुष्कळ लोकांना चांगलं वाटलं, राजा माणसाचं आणि वस्तुंचं संरक्षण करेल असं वाटलं जे आजतागायत झालेलं नाही. माणसांचे, वस्तुंचे जिथे संरक्षण झालेलं नाही तिथं शांतता, मनःस्वास्थ्य ह्या सगळया गोष्टी खूप दूरच्या आहेत.

प्रत्येक कुटुंब, प्रत्येक समुदाय आपले आणि आपल्या वस्तुंचे संरक्षण आणि शांतता, मनःस्वास्थ्य ह्या सगळया गोष्टींसाठी काळजीत असतोच, आदर्शवादाच्या शिडीने माणसांना क्षणिक उत्तरे मिळाली, पण थोड्या काळानंतर ती सुद्धा पुरेशी नव्हती. ही उत्तरे पुरेशी पडेनात तेव्हा स्वाभाविकपणे पुनर्विचार केला गेला. विचार रुपात विज्ञानवाद समोर आला. तर्कसंगत वैशिष्टयांमुळे तो लोकांनी स्वीकारला. ह्याआधी उपदेशवादामध्ये तर्काला कोणतीही जागाच नव्हती, आदर्शवादात, 'हे करा, ते करु नका' ह्या गोष्टी असतात, त्या न मानण्याऱ्या लोकांना पापी ठरवलं गेलं. त्रास पण दिला गेला. हे सगळं इतिहासात लिहिलेलं आहे. विज्ञान तर्क संगत होतं, तर्काला आमंत्रण देणारं होतं, म्हणून मानवाने विज्ञानवाद स्वीकारला.

दुसरीकडे स्वर्गाची जी कल्पना होती, सुखाची कामना होती ती विज्ञानामुळे प्राप्त सुविधांमध्ये लोकांना मिळायला लागली. त्या सगळयांचा सुद्धा माणसाने खूप आस्वाद घेतला आहे. विज्ञानामुळे मिळालेल्या गोष्टीसुद्धा माणसासाठी पुरेशा पडल्या नाहीत. पुन्हा माणूस त्रासात अडकायला लागला. अशा तऱ्हेने मानव भक्ती, विरक्ती, संग्रह - सुविधांमध्ये झुलतच राहतो. संग्रह सुविधेने जेव्हा माणूस त्रासून जातो तेव्हा भक्ती विरक्तिकडे धावतो आणि जेव्हा भक्ती-विरक्तिमध्ये थंड होऊन जातो तेव्हा संग्रह सुविधांकडे धावत येतो आणि ऐकायला दोन्ही छान वाटते. पण छान वाटणे आणि छान असणे ह्यात किती अंतर आहे ह्याविषयी प्रत्येक माणूस विचार करु शकतो. फक्त चांगलं वाटल्यामुळे (त्याने) काही चांगलं होईलच असं काही नाही. थंड पाणी पिऊन कोणी रोगी होऊ शकतो, कुणाला खोकला येऊ शकतो, म्हणून थंड पाणी चांगलं वाटणं किंवा चांगलं न वाटणं ह्या दोन्ही गोष्टी सार्वभौम होऊ शकत नाहीत. हे शरीरासाठी अनुकूल - प्रतिकूल आहे.

विज्ञानवादामुळे आपण एका अस्थिरतेकडे, अनिश्चयतेकडे जात आहोत आणि शास्त्रज्ञांनी मानवाला एका यंत्राच्या रुपात परिभाषित करण्याचा प्रयत्न केला आहे. अजूनपर्यंत ते सफल झालेले नाहीत. हे सगळे ऐकले आहे . जो शास्त्रज्ञ (वैज्ञानिक) मानवाला यंत्ररुपात परिभाषित करतो तो स्वतः ह्या व्याख्येमुळे संतुष्ट होत नाही. माणसाच्या यांत्रिक कार्यविधींना समजून घेणे हा एक मोठा मुद्दा सध्या झालेला आहे. ह्याच आधारावर मानवाच्या व्यवहारात गती, कार्यात गती, विचारांमध्ये गती येईल असे वाटते. पण माणूस ह्या रूपामध्ये येत नाही. विज्ञानाने यांत्रिकतेलाच तंतोतंत मानलेले आहे ही गोष्ट माणूस समजू शकतो, सहन करु शकतो. आदर्शवादी लोकांनी संवेदनशीलतेला नाकारण्याची वकिली केली. संवेदनशीलतेला माणूस समजू शकत नाही, सहन करु शकत नाही. दोन्ही प्रकारच्या वादांमध्ये अंतर तसेच आहे. ह्या

प्रकारे एकानंतर एक अशा प्रश्नांमध्ये मानव अडकत गेला. प्रश्नाबरोबरच शरीरयात्रेला संपवत गेला.

एकूण अशी आपली स्थिती झालेली आहे. आता मी मानव कुळासमोर जो प्रस्ताव ठेवत आहे, ते मानव जातीचेच पुण्य आहे अशी माझी स्वीकृती आहे. मी जे परिश्रम घेतले आहेत, त्यांचं मूल्यांकन करायला गेलं तर ते इतक्या मोठ्या फलप्राप्तीसाठी योग्य आहेत असं मला वाटत नाही. (जितकं मला मिळालं) जसं पेरुच्या झाडाला एक टन फळे आली तर झाड मोडून पडेल, असं आपण बघू शकतो. तशीच घटना माझ्याबरोबर घडली. माझ्या मेहनतीपेक्षा हे जास्त आहे. ह्या परिश्रमाची कोण पुनरावृत्ती करतो ही महत्त्वाची गोष्ट आहे. मानवामध्ये मेहनतीपेक्षा अधिक फळाची कोण पुनरावृत्ती करतो, त्याला मी अचूकतेने बघितले आहे, ‘जीवन’ पुनरावृत्ती करतो. अशी फळं घेऊन जायला ‘जीवन’ कसा काय समर्थ आहे? ‘जीवनाला’ मी अक्षय बल अक्षय शक्ती रुपात पाहिलेलं आहे. आपल्याला सुद्धा त्याचं अध्ययन करवेन. तुमच्यामध्ये जिज्ञासा निर्माण झाली तर तुम्हीसुद्धा समजू शकता, समजावू शकता. मला विश्वास आहे की तुम्हाला सुद्धा समजण्याची आवश्यकता आहे, म्हणून तुम्ही समजून घ्यालच. एक गोष्ट कळते की शरीराच्या माध्यमातून ‘जीवन’ जे काही ठरवतो ते शरीराच्या आवश्यकतेपेक्षा जास्तच होते. ही एक सहज प्रक्रिया आहे. मी जीवनाला पाहिले आहे. मानवाला मी जीवन आणि शरीराच्या संयुक्त रुपात पाहिले आहे. आतापर्यंत अध्ययन पद्धतीने ‘जीवन’ आणि ‘अस्तित्व’ ह्या गोष्टी समजावून सांगायला मानव असमर्थ होता. जिथं जिथं विज्ञानाने अस्तित्वाचा बोध करुन देण्याचा प्रयत्न केला, प्रत्येक ठिकाणी अस्थिरता, अनिश्चयता ह्या गोष्टी त्याने दाखविल्या आणि लाभोन्माद, भोगोन्माद, कामोन्माद ह्या गोष्टींसाठी संघर्ष करा असा विचार त्याने दिला. ह्या गोष्टी आपण स्वीकारत राहिलो. स्वीकार करुन

जेव्हा आपण त्या भोगल्या तो आपल्यासाठी तृप्तीचा आधार झाला नाही. सुविधा संग्रहाचा तृप्तिबिंदु होऊ शकला नाही ही हयाची साक्ष आहे. अशा प्रकारे आपण अंतर्विरोधी होऊन सुद्धा जगत राहिलो. आता आपल्या सगळ्यांसमोर जो प्रस्ताव ठेवतोय, तो समजून घ्यायचाच आहे. जसं मी आपल्यामध्येच तपासतो, तसंच तुम्हांला सुद्धा तपासायचं आहे आणि तपासून जेव्हा तुम्ही जगता तेव्हाच तृप्त होता तेव्हा दुसऱ्यांना समजावण्यासाठी तुम्ही स्वतःला अर्पित करताच. जेव्हा आपण दुसऱ्यांना समजावू शकतो तेव्हा आपण किती समजलो आहोत त्याचे प्रमाण मिळते. समजदार होण्याची ही एक कसोटी आहे. समजदारीमध्ये मी सह-अस्तित्व पाहिले आहे, असा मला अनुभव झाला आहे. सह-अस्तित्वामध्ये मानव आपल्या कुटुंबाच्या आवश्यकतेपेक्षा अधिक उत्पादन करुन समृद्धी अनुभवू शकतो. (माणसामाणसातल्या) प्रत्येक व्यवहाराच्या मूळ मुद्दयामध्ये माणसाची समजदारीच समाधानाच्या स्वरुपात ध्रुवीकृत होत असते. ह्या तिन्ही गोष्टींना मी पाहिले आहे. त्याचे अध्ययन करवताना, प्रमाणित करताना आपण दूरवरपर्यंत पसरत जात असतो, पण शरीराची लांबी, रुंदी मात्र तेवढीच राहते. मानवासाठी जो प्रस्ताव (मी) प्रस्तुत करतो आहे, तो व्यक्तीच्या स्वतःच्या लांबी, रुंदी, उंचीपेक्षा दूरपर्यंत पसरणारा आहे. अशाप्रकारे प्रत्येक मानवात ती योग्यता आहे, प्रत्येक मानवामध्ये ते स्वप्न आहे. समजदारीच्या अर्थाने प्रत्येक मानवामध्ये उत्साह जागवू शकतो, हा ह्या प्रस्तावाचा अर्थ आहे, प्रयोजन आहे.

विज्ञान एक पायरी आहे, त्याच्या आधीची पायरी आदर्शवाद आहे, त्याच्या आधीची पायरी म्हणजे खेड्यातला कबिला रुपी संसार आहे, त्याच्या आधीची पायरी म्हणजे जंगलात भटकणारा माणूस (शिलायुग) आहे. अशा प्रकारे पायरी पायरीने आपण इथपर्यंत पोहोचलो. ह्या उपकाराला आपल्याला

स्वीकारायला हवं आहे आणि त्यासाठी कृतज्ञ आहोत. ह्या पृष्ठभूमीचा साधारण उपक्रम आपल्याला सांगितला. थोडक्यात सारांशाने सांगायचे झाले तर परंपरेने ज्या उच्चकोटीच्या गोष्टी मला दिल्या त्याने मी संतुष्ट झालो नाही, म्हणून मी स्वतःला एक जबाबदार व्यक्ती मानलं. माझ्या प्रश्नांची उत्तरे शोधायची जबाबदारी माझी स्वतःची आहे हे स्वीकारलं; म्हणून मी प्रयत्न केला. अजून कुठल्याही कारणासाठी मी प्रयत्न केला नाही. ह्या वैचारिक प्रयत्नात शेवटी मला असं सापडलं की सगळी माणसं सुखी होऊ शकतात, धर्म सफल होऊ शकतो. पृथ्वी (धरती) स्वर्ग होऊ शकते, माणूस देव होऊ शकतो, म्हणून मला इच्छा झाली, उत्साह वाटला की, ही गोष्ट मनुष्य कुळासमोर प्रस्तुत करावी, ठेवावी. त्याच प्रयत्नात मी आहे.

जेव्हा मला अस्तित्व, 'जीवन' आणि मानवीयतापूर्ण आचरण ह्या गोष्टी नीटपणे समजल्या, त्यानंतर लगेचच माझी जी स्थिती होती ती मी आपल्यासमोर ठेवत आहे. समजदारीनंतर स्वतःमध्ये विश्वास निर्माण झाला.ह्यासाठी खूप काही प्रयत्न, परिश्रम घेतले असं काही नाही, विश्वासाला मी प्रत्येक आयामामध्ये तपासायलासुद्धा सुरुवात केली. तसंच श्रेष्ठतेचा (सम्मान) सन्मान सुद्धा करता आला. श्रेष्ठतेचं मूल्यांकन करता आलं म्हणून सन्मान सुद्धा करता आला. ज्याचं आपण मूल्यांकन करत नाही, त्याचा (सम्मान) सन्मान करु शकणार नाही. तिसरा मुद्दा असा होता, जितकी काही माझी समज होती त्यानुसार माझ्या व्यक्तित्वाला मी स्वीकारण्यायोग्य झालो. कुठेही मला अशी अडचण वाटली नाही की प्रतिभेनुसार, अस्तित्व स्वाभाविक (सहज), जीवन स्वाभाविक विधिने मी जगू शकणार नाही, त्याला (मी) नाव दिलं, 'प्रतिभा आणि व्यक्तित्वामध्ये संतुलन'. ह्यात मी योग्य रीतीने उत्तीर्ण झालो. व्यवहारात मी सामाजिक झालो ही चौथी स्थिती होती. सामाजिक झाल्यानंतर मला स्वतःमध्येच

तृप्ती आपोआप मिळायला लागली. त्याचा फायदा असा झाला की माझ्याकडे सगळया जगाविषयी कोणतीही तक्रार शिल्लक राहिली नाही. मी आता किती सार्थक (काम) करतो त्याला प्रत्येक क्षणी तपासत राहतो. जितक्या संबंधांमध्ये मी जगतो, आपल्या स्वतःच्या दायित्व आणि कर्तव्याबरोबर सार्थक जगतो. पाचवी स्थिती म्हणजे समृद्धी. तसं तर मी परिश्रम करणाऱ्या, मेहनत करणाऱ्या कुटुंबात जन्मलो. सेवा, परिश्रम करणे ह्या गोष्टी मी जाणत होतो. समृद्धीचा अर्थ मला कळत नव्हता. आता समृद्धीचा अर्थ समजला. माझ्या कुटुंबाची जितकी आवश्यकता आहे, त्यापेक्षा अधिक उत्पादन मी करतो, म्हणून मला समृद्धीचा  अनुभव होतो. ह्या पद्धतीने खूपशा चांगल्या गोष्टी माझ्या हाताला लागल्या, त्याला नाव दिले, स्वायत्तता. मी स्वतः स्वायत्त झालो, म्हणून तुम्ही सुद्धा होऊ शकता. जेव्हा मी स्वायत्त झालो, तेव्हा माझ्यानंतर ह्या जगाला मी अर्पण करु शकतो, समजावू शकतो, बोलू शकतो, म्हणून ह्या सगळयांना एका वाङ्मय दस्तऐवजाचं रुप द्यायला सुरुवात केली. पहिला दस्तऐवज होता- मध्यस्थ दर्शन सह - अस्तित्ववाद. मध्यस्थ दर्शनाला चार भागांमध्ये ध्रुवीकृत केलं.

पहिल्या भागाला नाव दिलं – मानव व्यवहार दर्शन. दुसऱ्या भागाचे नाव आहे– मानव कर्मदर्शन.  तिसऱ्या भागाचे नाव आहे – अभ्यास दर्शन.चौथ्या भागाचे नाव आहे– अनुभव दर्शन. अशा तऱ्हेने चार भागांमध्ये संपूर्ण दर्शन लिहिले.

ह्या चार भागांचे मूळ तत्त्व आहे मध्यस्थ दर्शन. अस्तित्वामध्ये सम, विषम आणि मध्यस्थ शक्ती म्हणजे गती आहेत. त्यांचे आपआपल्या ढंगाचे परिणाम आहेत. ह्यातून मध्यस्थ बल आणि शक्ती वैभवित होणं हेच मानव परंपरेचे अद्भूत ध्येय आहे. ह्यामुळे मी सुद्धा चमत्कृत झालो. आतापर्यंत जितके शास्त्रज्ञ, ज्ञानी, अज्ञानी ज्यांना कुणाला ह्याचा वास आला आहे ते चमत्कृत

होतातच. वैज्ञानिकांच्या म्हणण्यानुसार ते सम, विषम शक्तींना मानण्यापर्यंत पोहोचले आहेत. मध्यस्थ शक्ती, मध्यस्थ बलाचे काही प्रयोजन आहे हे अजूनपर्यंत ओळखलेले नाही. मला वाटतं की हीच, फार मोठी कमतरता राहून गेली, म्हणूनच पुनर्विचार करण्याची आवश्यकता वाटायला लागली, त्यामुळे मध्यस्थ बल, मध्यस्थ शक्ती, मध्यस्थ सत्ता, मध्यस्थ जीवन ह्या चार तथ्यांना समजण्याचे, समजावण्याचे काम केले आहे, त्याचेच नाव आहे, ‘‘मध्यस्थ दर्शन’’.

सह – अस्तित्वाला जेव्हा मी स्पष्ट करायला लागलो, तेव्हा तीन स्वरुपांमध्ये, तीन शीर्षकांमध्ये (ते) तयार झालं. पहिले - ‘समाधानात्मक भौतिकवाद’. त्याचा ध्रुवबिन्दू असा आहे – संपूर्ण भौतिकता आणि रासायनिकता आपल्यामध्ये ‘त्व’ सहित व्यवस्थेच्या रुपात प्रकाशित आहेत. समग्र व्यवस्थेमध्ये ते भागीदारी करतातच, चैतन्य प्रकृतिबरोबर सुद्धा पूरक आहेत, जड प्रकृतिसुद्धा आपआपसात भागीदारी करते, ह्याला स्पष्ट करायचा प्रयत्न केला आहे. आतापर्यंत मानवाजवळ जो वाद आहे तो संघर्षात्मक म्हणजे द्वंद्वात्मक भौतिकवाद आहे. अस्तित्व स्वाभाविक (सहज) स्थिती - गतीमध्ये कोणतेही भांडण नाही, विद्रोह नाही, ओरबाडून घेणे नाही, एकमेकांसाठी पूरकता आहे. एक उत्सव आहे, खुशाली आहे, निरंतर विकास आहे ह्या गोष्टीला समजावण्याचा प्रयत्न केला आहे. वाङ्मय तर वाङ्मयच आहे, पण मला असे वाटते की माणूस हा माणसाकडूनच समजून घेणार. वाङ्मयामध्ये तर प्रयत्नच होऊ शकतो. ह्यात मूळ मुद्दा आहे, विज्ञानानुरुप विवेक, विवेकानुरुप विज्ञान (विवेकाला प्रमाणित करण्यासाठी विज्ञान), ह्या पद्धतीने तर्क प्रस्तुत केलेला आहे. विवेक म्हणजे प्रयोजनाची ओळख. जर प्रयोजन समजलं, त्याची ओळख पटली तर त्याचे विश्लेषण आपण करु. जर प्रयोजन कळालं नाही आणि जर का आपण विश्लेषण करत गेलो तर काय

होतं ते तुम्हाला सुद्धा कळतं. विज्ञानाने आज माणसाला कुठं नेऊन बसवलं आहे किंवा अडकवलं आहे, त्याचं तुम्ही स्वतः मूल्यांकन करु शकता, म्हणून समाधानात्मक भौतिकवादानुसार अस्तित्वामध्ये भौतिक, रासायनिक स्वरुपात जे कुठले पदार्थ आहेत ते मानवाला व्यवस्थेमध्ये जगण्यासाठी प्रेरक आहेत, आणि सगळी एककं एकमेकांसाठी पूरक आहेत, वैभवासाठी सहाय्यक आहेत आणि पुढच्या विकासासाठी एकमेकांबरोबर अंतर्संबंधांनी जोडली गेलेली आहेत. ह्या पद्धतीने समाधान सांगितले गेलेले आहे. सह - अस्तित्ववादातील दुसऱ्या प्रबंधाला नाव दिले आहे-''व्यवहारात्मक जनवाद''. मानव अस्तित्वामध्ये आहे, तो व्यवहारामध्येच संतुष्ट होतो. (हा) व्यवहार मानव - मानवाबरोबर करतो आणि हा व्यवहार मानवीयतापूर्ण आचरण रुपात स्पष्ट होतो आणि तोच स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

तिसरा प्रबंध लिहिला आहे -''अनुभवात्मक अध्यात्मवाद'', आतापर्यंत जगाने ज्याला अध्यात्म मानले, त्याला समजावू शकलेले नाही. आपण खूपच सोप्या रीतीने काही क्षणातच अध्यात्माला समजू शकतो. तुम्ही-मी ह्यांच्यामध्ये जी रिक्तता आहे, दिसते त्याला विस्तार आणि शून्य काहीही म्हणू शकतो. ही रिक्तता जशी तुमच्या माझ्यामध्ये आहे तशीच ही पृथ्वी आणि दुसऱ्या पृथ्वीमध्ये आहे. एक सौरव्यूह आणि दुसऱ्या सौरव्यूहामध्येसुद्धा अशीच रिक्तता आहे. एक आकाशगंगा आणि दुसऱ्या आकाशगंगेमध्येसुद्धा तसेच आहे, म्हणजे हा विस्तार सगळीकडे एकसारखा आहे. ही वस्तू व्यापक आहे इतकं ज्ञान होतं. ह्या व्यापक वस्तुमध्ये सगळया वस्तु, सगळी एककं बुडालेली आहेत, भिजलेली आहेत, घेरली गेलेली आहेत. मानवाला सगळयात आधी त्याचाच अनुभव होतो त्यानंतर मानवाला स्वतःच्या असण्याचा अनुभव होतो. तुमच्या माझ्यामध्ये जर व्यापक नसेल तर तुमच्या असण्याचा अनुभव मला होऊच शकत नाही, म्हणूनच सगळयात आधी जो अनुभव होतो तो व्यापक मध्येच होतो.

ह्यालाच स्पष्ट करायचा प्रयत्न केला आहे. ह्याच्या आवश्यकतेवरसुद्धा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. अस्तित्व काय आहे, हे समजल्याशिवाय, ज्या अस्तित्वाचा मानवजातसुद्धा एक भाग आहे असा मानव, स्वतःला कसं काय समजून घेणार ? म्हणूनच अस्तित्व काय आहे हे समजून घेणं खूप आवश्यक आहे . व्यापक वस्तुमध्येच संपूर्ण एक एक वस्तू आहे, ही सहअस्तित्वाची साक्ष आहे, म्हणून अस्तित्व स्वाभाविक (सहज) सहअस्तित्व जर आपण विसरलो तर संकट, दुःखाशिवाय अजून काहीही होत नाही. आतापर्यंत आपण जितके द्रोह, विद्रोह, शोषण, युद्धे केलेली आहेत ती सगळी सहअस्तित्ववादाच्या विरुद्ध आहेत. हे सगळं केल्यानंतर आपण योग्य गोष्ट मिळावी अशी इच्छा व्यक्त केली, आशा व्यक्त केली. आपली इच्छा पूर्ण झाली नाही आणि आपण जसं वागलो तशाच घटना आपल्यासमोर येत राहिल्या. आपण कधी हसलो कधी रडलो सुद्धा. जसं एखादं कुटुंब, समुदाय दुसऱ्या कुणाला तरी जेव्हा मारतो, तेव्हा आपण आपल्या शत्रूला मारलं म्हणून खूप खूष होतो. सरकार देशसुद्धा असाच विचार करतात. आता काय करावे? धर्मसत्ता सुद्धा अशीच तयार होते. मानव आता कुणाला शरण जाणार ? ह्या प्रकारे धर्मगद्दी, राजगद्दी, शिक्षागद्दी, व्यापारगद्दी सगळीकडे फक्त भ्रमच दिसतो,कोणती दिशा दिसत नाही की प्रयोजन कळत नाही. आता कुठे जावे, काय करावे हा प्रश्न सतावत होताच. जागृत होण्याआधी हा सगळा त्रास मला होत होता. जागृतीनंतर चांगल्या तऱ्हेने हे वास्तव स्वीकारण्यासाठी मी तयार झालो आणि वाटलं की ह्या सगळ्या वास्तविकतेला मानवापर्यंत पोहोचवलं पाहिजे. नंतर ही गोष्ट जगण्याच्या कलेच्या रुपात, शास्त्र रुपात मला सापडली. आज जे अर्थशास्त्र आहे, ते लाभोन्मादी आहे. त्याने माणूस सुखी होऊ शकत नाही. सगळया मानवांच्या सुखी होण्याचा मार्ग केवळ आवर्तनशील अर्थशास्त्र विधिनेच मिळू शकतो. हे स्वाभाविक आणि व्यवस्थेनुरुप आहे. दुसरा प्रबंध लिहिला आहे- ‘‘व्यवहारवादी समाजशास्त्र’’. मानव

न्यायपूर्वक व्यवहारानेच संतुष्टी मिळवतो. मानवाबरोबरच व्यवहार करतो. व्यवहार न्यायपूर्वक झाल्यानंतर संतुष्टी होते. ह्या प्रबंधाचा मूळ ध्रुवबिंदू आहे – मानवीयतापूर्ण आचरण, म्हणजे राष्ट्रीय आचार संहितेच्या रुपात आपण मानवीयतापूर्ण आचरण स्वीकारु शकतो. सगळया देशातील नागरिक ह्याला संविधान रुपात स्वीकारु शकतात ज्यामुळे अखंड समाज सार्वभौम व्यवस्था होईल.

समुदायांमध्ये जी युद्धाची दहशत असते तिचे निवारण ह्यामुळे होऊ शकते. जोपर्यंत युद्धाचे प्रयत्न होतील तोपर्यंत पृथ्वीला त्रास दिल्याशिवाय मानव जगू शकणार नाही. अधिक त्रास देण्यासाठी अधिक बुद्धी वापरावी लागेल. ह्यामुळे विज्ञानबुद्धीचे सुद्धा मूल्यांकन होते. युद्धाच्या संरक्षणासाठी बरेचसे विज्ञान आणि वैज्ञानिक मग्न आहेत. त्यासाठीच त्यांना पैसे मिळतात आणि (ते) स्वतःला धन्य समजतात. इतकंच काम आहे, पृथ्वीला नष्ट करणे. ह्यातून आपल्याला मुक्त व्हावेच लागेल आणि त्यासाठी समजदार व्हावेच लागेल, दुसरा कोणताही मार्ग नाही.

तिसरं शास्त्र लिहिलं आहे. – ‘‘मानव संचेतनावादी मनोविज्ञान’’ संचेतनेचा आधार जीवन आहे हे सांगायची इच्छा ह्यात आहे. ही विकसित चेतनाच आहे. संचेतनेला म्हणजे पूर्णतेच्या अर्थाने चेतनेला मानव परंपरेत व्यक्त करण्याचे शरीर हे एक माध्यम आहे ह्या गोष्टीला समजावण्याचा प्रयत्न केला आहे. तुम्ही सगळे त्या गोष्टीला तपासाल. तुम्हाला जर ते समजलं तर माझ्या लिहिण्याचं सार्थक झालं, ह्या ढंगाने दर्शन, विचार, शास्त्र ह्या तिन्ही गोष्टी दिल्या, शास्त्रांचा मूळ आशय हाच आहे की, मानवाला व्यवस्थेमध्ये जगायचं आहे. जगण्याची पद्धत, विधी, नीती, प्रणाली कोणती आहे ? ह्या बाबी शास्त्रामध्ये स्पष्ट केल्या आहेत. ह्यानंतर ह्याला अमलात आणण्यासाठी योजना आल्या. त्या तीन स्वरुपात आल्या,

पहिली योजना आहे – ''जीवन विद्या योजना.'' आदिकालापासून मानव स्वतःबददल अज्ञानी होता. आदर्श युगातसुद्धा आत्मा, परमात्मा नावाच्या गोष्टींना उपदेश रुपात समजावण्याचा खूप प्रयत्न केला गेला, पण समजावू नाही शकले. स्वतःबद्दलच्या अनभिज्ञतेमुळेच माणूस त्रासलेला आहे. जर हे समजलं तर पुढच्या गोष्टी समजतीलच. हा अडसर दूर करण्यासाठीच जीवन विद्या योजना आहे. ह्या योजनेचा केन्द्रबिन्दू ''जीवन'' आहे. आबालवृद्धांमध्ये, सगळया मानवांमध्ये समान रुपात समजण्याचा अधिकार विद्यमान आहे. मानवाच्या समानतेचा आधार जीवनच आहे. कोणत्याही दोन माणसांचे शरीर एकसारखे असत नाही. 'जीवन' समान आहे, त्याच्या शक्ती आणि बल समान आहेत, त्याचे लक्ष्य समान आहे. 'जीवन' जागृत होऊ इच्छितो. जागृती हेच त्याचे (जीवनाचे) लक्ष्य आहे. प्रत्येक व्यक्तिला समाधानाची, न्यायाची इच्छा असते. तुम्ही सगळे ही गोष्ट तपासू शकता. तुमच्या शरीराचे कोणतेही अंग, कोणताही अवयव असा नाही की ज्यामध्ये न्यायाची प्रतीक्षा आहे, न्यायाची इच्छा आहे किंवा शरीराचे कोणतेही अंग समाधान इच्छिते. शरीराच्या कोणत्याही अंग, अवयवाला समृद्धी हवी आहे असे नाही, पण माणसाला मात्र न्याय, समाधान, समृद्धी हवी आहेच, ह्यावरुन असा निष्कर्ष निघतो की, न्याय, समाधान, समृद्धी, सत्य ह्या सगळया गोष्टी 'जीवनालाच' हव्या आहेत, म्हणून 'जीवनाचे' स्वरुप समजून घ्यावे, 'जीवन' क्रियांना समजून घ्यावे, 'जीवन' तृप्त होण्यासाठी न्याय, धर्म, सत्य ह्या गोष्टी समजून घ्याव्यात. हे एक छोटेसे काम ह्यातून निघाले आहे. ह्या आधारावरच जीवन विद्या योजनेला प्रस्तुत केले आहे. त्याला कार्ययोजनेमध्ये परिणित केले आहे. विज्ञानाचे दिग्गज तसेच विज्ञान ज्यांना माहिती नाही अशा ज्ञानी, अज्ञानी लोकांनी हे ऐकले आहे. काही लोकांना हे समजलं आहे आणि ते दुसऱ्यांना समजावण्यासाठी मग्न झालेले आहेत आणि समजावण्यात सफल झालेले आहेत. तेव्हा मला

विश्वास वाटला की जे मला समजलंय ते सार्थक आहे आणि प्रमाणित आहे, सगळे ह्याला समजू शकतात आणि समजून दुसऱ्यांना समजावू शकतात. दुसरी योजना आहे– शिक्षेचे मानवीकरण. समजदार होणे ही सगळयांचीच आवश्यकता आहे, म्हणून समजदारीच्या सगळया वस्तुला शिक्षेमध्ये सामील करावे. त्यासाठी पाठ्यक्रम बनवला गेला, शाळेत त्याचे प्रयोग केले गेले. ती शाळा बिजनौर (उत्तर प्रदेश) जिल्ह्याच्या गोविंदपुरमध्ये आहे. तिथे एक फार चांगला अनुभव आला. आधी सगळे शिक्षणतज्ज्ञ म्हणत होते की विद्यार्थ्यांवर वातावरणाचा प्रभाव पडतो, पण गोविंदपुरमध्ये असा अनुभव आला की विद्यार्थ्यांचा वातावरणावर प्रभाव पडतो. ह्याला विशाल स्वरुपात पाहण्याचे स्वप्न आहे. त्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. तिसरी योजना आहे - परिवारमूलक ग्राम स्वराज्य व्यवस्था. शक्ती केंद्रित शासनाच्या जागी समाधान केन्द्रित व्यवस्था. ह्या पद्धतीने दर्शन, शास्त्र आणि योजना निस्पंदित झालेल्या आहेत.

जय होवो, मंगल होवो, कल्याण होवो.

# जीवन विद्या

जीवन मला समजलेले आहे. तुम्हाला समजावण्याचा प्रयत्न इथून सुरु होतो. ह्या प्रक्रियेचे नाव आहे ‘जीवन विद्या’. आधीच तुम्हाला स्पष्ट करु इच्छितो की, जीवनामध्ये समानता नित्य विद्यमान आहे. ‘जीवन’ आहे तरी काय ही गोष्ट प्रत्येक व्यक्ती जाणून घेऊ इच्छिते, मानू इच्छिते आणि त्याच्या परिणामांना प्रमाणित करु इच्छिते, हा ह्याचा मूळ उददेश आहे. ‘जीवन’ भौतिकही नाही, अभौतिकही नाही. ‘जीवन’ अणू (परमाणु) आहे, घडणपूर्ण अणू (गठनपूर्ण परमाणु) चैतन्य एकक आहे. घडणपूर्णता म्हणजे काय? ह्या अणुमध्ये (परमाणु) प्रस्थापन किंवा विस्थापन ह्यापैकी काहीही होत नाही. जे काही भौतिक रासायनिक रुपात अणू (परमाणु) आहेत, त्यांच्यामध्ये समाविष्ट असलेल्या अंशांमध्ये प्रस्थापन विस्थापन होणे आढळते. ह्यालाच आपण परिणाम म्हणतो. अणुमध्ये (परमाणुमध्ये) समाहित अंशांच्या संख्येमध्ये परिवर्तन होते. हेच परिवर्तन आहे, अजून कोणत्याही प्रकारचे परिवर्तन जगात होत नाही. मानव जर कुठले परिवर्तन करु शकेल तर परिणामशील अणुंच्या (परमाणुंच्या) अंशांमध्ये परिवर्तन करु शकेल. अणुंच्या (परमाणु) दोन जाती आहेत. एक भुकेलेला अणू (परमाणु) आणि दुसरा अजीर्ण अणू(परमाणु). ज्या अणुमध्ये (परमाणु) तृप्त होण्यासाठी काही अंशांची भूक किंवा आवश्यकता शिल्लक असते, त्याचबरोबर प्रत्येक परिणाम स्वतःमध्ये यथास्थिती संपूर्णता स्पष्ट होते, त्यांना भुकेलेला अणू (परमाणु) म्हणतात. ज्या अणुंमध्ये (परमाणुंमध्ये) काही अंश बहिर्गमित होऊ इच्छितात, त्यांना अजीर्ण अणू (परमाणु) म्हटले आहे. ह्या प्रकारे दोन्ही प्रकारचे अणू (परमाणु) तृप्त होण्यासाठीच क्रियाशील राहतात.

घडणपूर्ण अणू (गठनपूर्ण परमाणु) हा तृप्त अणू (परमाणु) आहे. हा घडणपूर्ण अणू म्हणजे चैतन्य एकक आहे. चैतन्य एकक (हे) नाव त्याला दिले कारण संज्ञानशीलता संवेदनशीलतेव्दारे मानव परंपरेमध्येच प्रमाणित करण्याची शक्ती 'जीवनामध्ये' आहे. 'जीवनाच्या' अभावामध्ये शरीर जरी बनवले तरी संवेदनशीलतेलाच प्रमाणित करु शकणार नाही, संज्ञानशीलता तर दूरच राहिली, म्हणूनच संवेदनशीलता, संज्ञानशीलतेला प्रमाणित करण्याच्या क्रमामध्येच मानव व्यवस्थेमध्ये जगू शकतो आणि समग्र व्यवस्थेमध्ये भागीदारी करु शकतो. एवढंसं तर काम आहे. जीवावस्थेतील सगळे जीव, प्राणी संवेदनशीलतेला प्रमाणित करतात. कितीही डोकेफोड केली तरी मानव संज्ञानशीलतेला प्रमाणित केल्याशिवाय तृप्त होत नाही, सुखी होत नाही.

मानव सुखी होऊ इच्छितोच. सुखी होण्याच्या क्रमामध्ये कधी आपण विचार करतो की सुविधा संग्रहाने सुखी होऊ, कधी जप-तप केल्याने, भक्ती विरक्तिने सुखी होऊ. सगळे लोक सुखी होण्यासाठी काही ना काही प्रयत्न तर करतातच, पण ह्या प्रयत्नांमुळे कुणी तृप्त झालं आहे, निरंतर सुख मिळालं आहे, ह्याचे प्रमाण काही मिळालेले नाही. जसं सुखी होण्याच्या क्रमामध्ये समजदारीच्या आधारावर मी सुखी झालो, मला वाटतं प्रत्येक व्यक्ती समजदार झाल्यानंतर सुखी होऊ शकते. ''प्रत्येक मानव बरोबर गोष्टींमध्ये एक आहे चुकीच्या गोष्टींमध्ये अनेक'' (आहे.) (सही में मानव एक है गलती में अनेक) ह्यासाठी प्रत्येक मानवामध्ये समानतेच्या वस्तुला ओळखण्याची आवश्यकता होती की जी बरोबर गोष्टीची धारक वाहक होऊ शकेल. ती गोष्ट मला समजली, ती म्हणजे समाधानपूर्वक जगणारा 'जीवन' आहे.

'जीवन' जेव्हा समजदार होऊन जगतो, तेव्हा प्रत्येक ठिकाणी समाधानाला प्रस्तुत करतो. समाधानामुळे प्रत्येक व्यक्ती

सुखी होते. समस्येमुळे दुःखी होते. मानव शरीराला चालवणारा 'जीवन' ही समजणारी वस्तू आहे. आपण गाय, बैल आणि इतर प्राण्यांना जे काही शिकवलं ते सगळं संवेदनशीलतेमुळेच. आता माणूस एकमेकाला कसं शिकवेल? मारुन तर कोणी कोणाला काही शिकवू शकलेला नाही. पोटापाण्याच्या भीतीने माणूस जितका वेळ नियंत्रित राहतो, त्यानंतरसुद्धा भीतीचं कवच काढूनच ठेवतो. इतिहासात दास - दासी प्रथेचा अंत झाला ह्या उदाहरणावरुन आपल्याला हे कळतं. संवेदनशीलतेमध्ये भय आणि प्रलोभन असतेच. भय आणि प्रलोभनाच्याच आधारावर सगळी राष्ट्रे, सगळे धर्म, तंत्रज्ञानाची सगळी व्यवस्था, व्यापार संस्था हे सगळे व्यवस्था देण्याचा दावा करतात, परंतु ना भय ही व्यवस्था आहे, ना प्रलोभन ही व्यवस्था आहे, कारण मानव भय किंवा प्रलोभन ह्या दोहोंचा स्वीकार करत नाही, मग मानवाजवळ काय असायला हवं? मूल्य आणि मूल्यांकन. मूल्यांना ओळखण्याची विधी हवी आहे. मूल्यांकन करायचं तंत्र हवं आहे. ह्या दोन्ही गोष्टी जर आपल्याकडे असतील तर निरंतर समाधानाची परंपरा चालत राहील. मूल्य आणि मूल्यांकनसुद्धा समजदारीच्याच प्रक्रिया आहेत. ह्या शारीरिक किंवा यांत्रिक प्रक्रिया नाहीत. विज्ञान तर आता असं म्हणतंय की सगळया गोष्टी यांत्रिक आहेत, कोणत्याही भावुक गोष्टी नाहीत. मग यांत्रिकतेमध्ये भय आणि प्रलोभनाबरोबर झुंजत रहा. यांत्रिक विधींनी विचार करता करता मानव इथपर्यंत पोहोचला. ही पृथ्वी तरी राहील की नाही ह्यावरच प्रश्नचिन्ह आहे.

कितीही समस्या एकत्र केल्या तरी समस्यांचे निराकरण समस्यांनी तर होणारच नाही. समस्येचे निराकरण समाधानानेच होईल. समाधानाशिवाय आपल्याला स्वस्थता लाभणार नाही. समाधान मिळवण्यासाठी चेतना विकास मानव चेतनापूर्वक मूल्य आणि मूल्यांकन विधिने व्यवस्थेचे समीकरण मांडणारी पद्धत आपल्याला विकसित करायची आहे. ह्या पद्धतीने जीवन संबंध

,'जीवनाची' तृप्ती, 'जीवनाचे' लक्ष्य ह्या गोष्टी केन्द्रस्थानी ठेवून जर व्यवस्थेची समीकरणे बनवली तर आपण सफल होऊ. 'जीवनाला' विसरुन शरीरासाठी आपण जितक्या व्यवस्था देण्याचा प्रयत्न करु, त्याने अव्यवस्थाच निर्माण होणार आहे. शरीराला चांगलं वाटलं तरी नेहमीच चांगलं होत नाही. शरीराची कोणतीही क्रिया सतत तशीच नाही राहणार. 'शरीर' क्रियांना वारंवार बदलावंच लागेल. 'जीवन' सतत असतो, म्हणून जीवनाच्या आधारावर निर्णय घेण्याच्या सद्बुद्धिची गरज आहे. 'जीवन' सगळया मानवांमध्ये समान आहे, त्याची ताकद समान आहे, 'जीवनामध्ये' बल आणि शक्ती अक्षय आहेत, ह्या कधी संपत नाहीत की कमी होत नाहीत. ह्या कमी का होत नाहीत ? जीवन अणुच्या परिणामामध्ये कुठलाही बदल तर होणार नाही, म्हणून त्याचं बल आणि शक्ती अक्षय आहेत. स्थितिमध्ये बल प्रमाणित होते आणि गतिमध्ये शक्ती. ह्याला पुरावा काय आहे तर मानव आपल्या स्वतःचं असणं सतत स्वीकारत असतो. असणं हेच वर्तमान आहे. वर्तमानातच प्रत्येक वस्तुचे अध्ययन होते. त्यानुसार वर्तमानामध्ये सगळ्यांमध्ये 'जीवन' समान आहे. जीवन सहज (स्वाभाविक) बल आणि शक्ती समान आहेत. चौथं म्हणजे जीवनाचे लक्ष्य – सगळे मानव सुखी होऊ इच्छितात.

सगळयांचं लक्ष्य सुखी होणं हेच आहे. ह्या चारही गोष्टींना लक्षात ठेवायची गरज आहे. जीवन एक घडणपूर्ण अणू (गठनपूर्ण परमाणु) चैतन्य एकक आहे. ह्याला बनवतं कोण हा प्रश्न ओघाने येतोच. कुणीतरी बनवणारा आहे, कुणीतरी बिघडवणारा आहे हा अजूनपर्यंत त्रास आहेच. त्याच आधारावर मानव विचार सुद्धा करतो. आपणही बनवू शकतो ,बिघडवू शकतो हाच विज्ञानाचा मूळ आधार आहे. त्यामुळे बनवू शकणे , बिघडवू शकणे ह्या त्रासात खूप कुंठा आली आहे. काही देश म्हणतात आम्ही ॲटम बॉंब बनवू शकतो ,काही बनवू शकत नाहीत ,म्हणून ह्या समानतेचा काही अर्थ नाही, कारण समानता ही अस्तित्व स्वाभाविकतेमध्ये आहे आणि बॉंब

बनवणे ही गोष्ट सहअस्तित्वाच्या विरुद्ध आहे. जे अस्तित्व आहे ते सहअस्तित्व स्वाभाविक (सहज) आहे.अस्तित्वाच्या विरुद्ध (असहज) पद्धतीने आपण काहीही करतो तर कुठे ना कुठे त्याचा विरोधच होतो, ह्या पद्धतीने व्यापार हा लाभोन्मादी झाला आणि त्यामुळे अधिक - कमी ह्या गोष्टीचे भूत मागे लागले. एक मानव म्हणतो, ''कमी आहे '', दुसरा म्हणतो, ''अधिक आहे'' आणि अधिक - कमीचा वाद चालूच राहतो. ह्या पद्धतीने स्वस्थ रुपाने सुखी होऊन मानवाला जगताच आले नाही ,त्यामुळे स्वस्थ रुपाने जगण्यासाठी प्रत्येक मानवाला चेतना विकास मूल्य आणि मूल्यांकन विधिने जगावे लागेल, त्यातली पहिली पायरी आहे समजदारी, दुसरी इमानदारी, तिसरी जिम्मेदारी (जबाबदारी) आणि चौथी भागीदारी. ह्या चार स्तरांवर मानवाला आपल्या समजदारीला प्रमाणित करायचं आहे. समजदारीचा अर्थ काय तर तीन गोष्टी आहेत - 'जीवन' ज्ञान, सह -अस्तित्व दर्शन ज्ञान आणि मानवीयता पूर्ण आचरण ज्ञान. 'जीवनाच्या' स्वरुपाबद्दल तुम्हाला सांगितलं आहे. 'जीवन' नित्य आहे, सुखाकांक्षी आहे आणि सुखाला मानव परंपरेतच प्रमाणित करु शकतो. ह्याकरिता प्रयत्न करण्यासाठी पहिला मुद्दा आहे 'जीवन' ह्या गोष्टीला समजणं , ज्याचं नाव आहे 'जीवन विद्या' . विद्येचा धारक वाहक 'जीवन' आहे. विद्येच्या स्वरुपाचे तीन भाग आहेत. विद्या, विद्वत्ता आणि विद्‌वान. विद्या–संपूर्ण सह-अस्तित्व हाच विद्येचा स्वाभाविक स्रोत आहे, सह अस्तित्वामध्येच विद्या आहे. सहअस्तित्वामध्ये 'जीवन' सुद्धा अविभाज्य आहे. विद्‌वत्ता – जीवनामध्ये स्वीकृत सह-अस्तित्व हीच समजदारी आहे. विद्‌वान मानव असतो.प्रत्येक मानव जीवन आणि शरीराच्या संयुक्त रूपामध्ये आहे. मग समजण्यासाठी वस्तू काय आहे?

संपूर्ण सहअस्तित्व रुपी अस्तित्व . हीच विद्या ही जाणण्याची, मानण्याची व जगण्याची वस्तू आहे. विद्वत्तेची धारक

वाहक वस्तू 'जीवन' आहे आणि त्याला प्रमाणित करणारा मानव आहे. मानव हा शरीर आणि 'जीवन' ह्यांचे संयुक्त रुप आहे. ह्या विधिने मानवाचा महिमा, 'जीवनाचा' महिमा आणि सह-अस्तित्व ह्याचा महिमा आपोआप स्पष्ट होतो. अस्तित्व स्वाभाविक (सहज) रूपामध्ये आहे सह-अस्तित्व. सह-अस्तित्व स्वाभाविक आहे विकास. विकास स्वाभाविक जीवन आहे. 'जीवन' स्वाभाविक आहे जागृती. त्यासाठी सह-अस्तित्व दृश्य आणि जीवन हाच द्रष्टा आहे. रासायनिक आणि भौतिक रचना - विरचना ह्या एकमेकांशी अंतर्संबंधित क्रम आहेत. ह्या सगळया घटना नित्य वर्तमान आहेत. भौतिक रासायनिक विरचना होत नाहीत असा एकही क्षण आपल्याला सापडणार नाही. कुठला दिवस मिळणार नाही. कुठलं शतक मिळणार नाही. ह्या सगळया रचना-विरचनांचा द्रष्टा 'जीवन' आहे, पाहणारा, समजणारा 'जीवनच' आहे. शरीर काहीही समजत नाही. शरीराच्या ज्या भागात जीवनाचा जिवंतपणा राहत नाही, त्याला शून्य म्हणतात. त्या जागी गरम थंड काहीही (स्पर्श) केले तरी काही समजत नाही.

हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन करत असताना बेशुद्ध केल्यानंतर काहीही कापले तरी सुद्धा काही कळत नाही. ह्या आधारांमुळे कळते की जिथे 'जीवनाने' जिवंतपणा ठेवला आहे तिथेच संवेदना समजतात. 'जीवन' आपल्या तृप्तिसाठी जिथे जिज्ञासू असतो त्यासाठी तो सत्यता, यथार्थता, वास्तविकता ह्यांना समजतो. ह्यामुळे 'जीवन' सुखी होण्याचा आधार तयार होतो, म्हणूनच 'जीवन' काय आहे हे समजून घेण्याची मला आवश्यकता वाटली. गरीब, श्रीमंत, सशक्त, अशक्त, लहान, मोठा ह्या सगळयांना ह्याची आवश्यकता आहेच.

ह्यात दुसरं सूत्र असं मिळतं की जीवन विद्येमध्ये वर्ग संघर्षांचा कोणताही आधार नाही. ह्यामध्ये सर्वशुभ गोष्टींचा आधार

सह -अस्तित्वच आहे. सगळयांसाठी निरंतर सुखी होण्याचा स्रोत आहे. समाधानित राहण्याचे प्रमाण आहे. ह्या सगळया गोष्टी आपोआपच उद्‌गमित होतात. मला असं समजतं मानवाला ह्याच गोष्टी हव्या आहेत. तो असंच जगू इच्छितो. आपण सगळयांबरोबरच सुखाने जगू शकतो. एकटा कुणी असत नाही हा सिद्धांत मिळतो. ह्या धरतीबरोबर असलेला संबंध सोडून कुणीही मानव जर सुखी व्हायचा प्रयत्न करेल तर तो सुखी होऊ शकणार नाही . पाण्याबरोबरचा संबंध सोडून सुखी होऊ शकणार नाही. जर कोणत्याही गोष्टींबरोबरचा संबंध तोडून आपण सुखी होऊ शकत नाही तर जीवन संबंध सोडून कसे बरे जगणार? कसे यांत्रिक होईल आणि भावनेच्या जगापासून मुक्त कसा होईल? तुम्हीच विचार करा, हे कसं होऊ शकेल? आपण बाजारात जातो, भाजी, धान्य, सोनं, लोखंड, सगळयांच्या भावाची चौकशी करतो. त्या भावाचा द्रष्टा कोण आहे? मानवच असतो. जर सगळया गोष्टींचा भाव आहे तर माणसाचा सुद्धा भाव असणार. मानवाचा भाव काय आहे हे कळणं हीच आवश्यकता आहे, त्याला सोडून सगळयांचा भाव आपण माहिती करुन घेतला आहे. जिथून नफा मिळण्याची संधी मिळाली, त्या सगळया भावांना आपण पकडून ठेवलं आहे. मानवाचा भाव किंवा मूल्य जर समजलं तर आपण लाभहानिमधून मुक्त होऊ. मानव मूल्य समजल्यानंतर, ‘जीवन’ मूल्य समजल्यानंतर, स्थापित मूल्य, शिष्ट मूल्य समजल्यानंतर नफातोटयाची गरजच शिल्लक राहत नाही. पृथ्वीच्या छातीवरील किती मोठं ओझं हलकं होऊ शकतं. लाभहानिच्या चक्रामध्ये मानव आपल्यालाच वाचवू शकत नाही. परका तर वाचणं शक्यच नाही. लाभहानिच्या चक्रामध्ये सगळयाच गोष्टी नष्ट होत आहेत. ह्या सगळया दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी हाच मार्ग आहे की मानव, मूल्यांना समजण्यामध्ये सहज होतो. त्याच्या आधी काही होणं शक्य नाही. मी खूप डोकेफोड केली आहे,पण काही झालं नाही. साम्यवाद आणि भांडवलशाही ह्याच्या साक्षीला आहेतच.

शेवटी साम्यवादसुद्धा राष्ट्रीय नफ्यासाठी झगडला, नफ्यातून मुक्त झाला नाही आणि भांडवलशाही ही तर घोषित रुपात नफ्याची समर्थक आहेच, म्हणूनच नफा तोट्यातून मुक्त होण्यासाठी मानवाला आपलं मूल्य समजून घेण्याची आवश्यकता आहे. मानव मूल्यांचा निर्वाह करण्याची आवश्यकता आहे. हे कसं होणार आहे? 'जीवन विद्या' समजल्यानंतर, अस्तित्व हे सह - अस्तित्व रुपात आहे हे समजल्यानंतर, मानवीयतापूर्ण आचरणामध्ये विश्वास निर्माण झाल्यानंतर मानवी मूल्ये चरितार्थ होतील. ह्यालाच म्हणतात, समजदारी.

मानवी मूल्यांना जेव्हा आपण चरितार्थित करायला सुरुवात करतो, तेव्हा आपण योग्य गोष्टी करण्यात निष्णात होतो, समर्थ होतो, पारंगत होतो. जोपर्यंत कुठल्या ना कुठल्या उन्मादामध्ये अडकून राहतो, आपल्याला योग्य पद्धतीने पुढे जायचा मार्ग सापडत नाही. समजदार होण्यासाठी 'जीवन 'तसेच अस्तित्वाला आणि मानवाला आपल्या आचरणाला समजून घ्यायचे आहे. हीच 'जीवन विद्या' आहे. विद्येचे दोन भाग आहेत - 'जीवन' ज्ञान आणि सह -अस्तित्व दर्शन ज्ञान. ह्या दोहोंचा धारक आणि वाहक 'जीवनच' आहे. 'जीवनाचं' ज्ञान म्हणजे 'जीवनाची' -जीवनाला' समजण्याची प्रक्रिया आहे. 'जीवनच' जेव्हा अस्तित्वाला समजून घेतं तेव्हा ह्या प्रक्रियेला ''अस्तित्व दर्शन'' असं म्हटलेलं आहे. सगळे 'जीवन' समान आहेत. सगळया मानवांमध्ये 'जीवन' एक समान आहे. समानता आहे हे कसं कळतं? 'जीवनाच्या' 'जीवनाला' समजण्याच्या विधिमध्ये, प्रमाणित करण्याच्या विधिमध्ये, अस्तित्वाला समजण्याच्या विधिमध्ये, सहअस्तित्वाला प्रमाणित करण्याच्या विधिमध्ये समजले की, सगळे 'जीवन' समान आहेत.

समजण्याची व्यवस्था शरीरामध्ये हात, पाय, कान, नाक, डोळे, मेंदू, हृदय ह्यापैकी कुठेही नाही. ही व्यवस्था 'जीवनामध्येच'

आहे. ‘जीवनच’ ‘जीवनाला’ समजणारी वस्तू आहे आणि सह-अस्तित्वाला समजणारी वस्तू आहे. दुसरा कोणीही समजणारा नाही. ह्या पद्धतीने आपण अशा निष्कर्षापर्यंत पोहोचतो की मानवाला समजदारी व्यक्त करण्यासाठी (प्रमाणित करण्यासाठी) शरीर आणि ‘जीवन’ ह्यांच्या संयुक्त रुपात असण्याची आवश्यकता आहे. केवळ शरीर किंवा केवळ जीवन असून हे होणार नाही. प्रमाणित करण्याचा केन्द्रबिंदू आहे व्यवस्थेमध्ये जगणे आणि समग्र व्यवस्थेमध्ये भागीदारी करणे. समजदारीची हीच सार्थकता आहे, तेव्हा आपण सगळेच व्यवस्थेमध्ये जगू इच्छितोच. ही ‘जीवन’ स्वाभाविक प्रक्रिया आहे. कोणतीही लादण्याची गोष्ट नाही.

अस्तित्व हे स्वतः सहअस्तित्व आहे ही गोष्ट सह-अस्तित्वाला समजून घेताना कळते, कारण सत्तेमध्ये (व्यापकामध्ये) संपृक्त (बुडालेली, भिजलेली आणि सत्तेने घेरली गेलेली) प्रकृती हेच संपूर्ण अस्तित्व. प्रकृती म्हणजे एक एक मोजता येण्याजोग्या वस्तू आहेत. मोजणारा मानव आहे. प्रकृतिमध्ये ह्या मोजता येणाऱ्या वस्तू म्हणजे जड आणि चैतन्य, दोन्ही वस्तू. एक छोटंसं सूत्र आहे - समजदारीने मानव सुखी, समजदारी नसेल म्हणजेच जीव चेतनेमध्ये जगत असलेला मानव दुःखी.(समझदारी से मानव सुखी,नासमझी अर्थात जीव चेतना में जीता हुआ मानव दुःखी।) आतापर्यंत सगळं जग ह्यासाठी झगडत राहिलं. आधी प्राण्यांबरोबर झुंजले , तप करा, योग करा, संन्यासी व्हा,तेव्हाच सुखी व्हाल. लोकांनी हे सुद्धा करुन बघितलं, पण काही प्रमाण मिळाले नाही, त्याची परंपरा तयार झाली नाही. दुसऱ्या मार्गाने ह्या गोष्टीसाठी झुंजत राहिलो की खूपशा वस्तू एकत्र करा, सुविधेने तुम्ही सुखी व्हाल. त्याने सुद्धा सुखी झाले नाही. दोन्ही गोष्टींनी कोणी सुखी झाला नाही. विचार करावा लागेल आता. मग ह्यातूनच कळालं की समजदारीने समाधान, समाधानाने सुखी होतो. समजदारीमुळे योग्य कार्य व्यवहार होतो. बरोबर गोष्टीत आपण सगळे एक असतो,

चुकीच्या गोष्टीत मात्र अनेक. माझ्या चुकीच्या गोष्टीबरोबर तुम्ही सहमत व्हाल, तुमच्या चुकीबरोबर मी सहमत होईन असं होत नाही.

जी चूक आहे ती चूकच आहे, तुमच्यासाठी आणि माझ्यासाठीसुद्धा. बरोबर गोष्टीत आपण एकच आहोत ही गोष्ट मला समजली. समजदारीमध्ये, पासून, साठी आपले कल्याण प्रशस्त होते. समजदारीनेच आपण सुखी होऊ, समृद्ध होऊ. समजदारीमध्ये वर्तमानात व्यवस्थेच्या रुपात जगतो. समजदारीमुळेच परंपरेच्या रूपामध्ये सह - अस्तित्वाला प्रमाणित करतो. सुखाचे चार चरण आहेत– समाधान, समृद्धी, अभय, सह-अस्तित्वामध्ये जगणे. चारही गोष्टी प्रमाणित होतात तेव्हा आपण सुखी होतो. जोपर्यंत ह्या चार गोष्टी मिळत नाहीत, तोपर्यंत आपण समजदार परंपरेमध्ये, पासून,साठी प्रयत्न करत राहतो. हा प्रयत्न करता करता आपण सगळयांनी जप-तप, पूजा - अर्चा, योग, यज्ञ केले आहेत. खूप वस्तू सुद्धा एकत्र केल्या आहेत, पण सगळे लोक मात्र सुखी झाले नाहीत. सगळे सुखी होण्यासाठी समजदार होणं आवश्यक आहे. सगळयांपर्यंत समजदारी पोहोचवली जाऊ शकते. समजदारीसाठी पहिली पायरी आहे - अस्तित्व काय आहे ते समजणे. अस्तित्व चार अवस्थांमध्ये आहे. पहिली पदार्थावस्था, ज्यामध्ये माती, दगड, मणि, धातू इत्यादी येतात. हे सगळे आपल्या आचरणात प्रमाणित आहेतच. दुसरी आहे प्राणावस्था ज्यामध्ये सगळी झाडे, रोपे, वनस्पती, औषधी वनस्पती इत्यादी येतात. हे सगळे सुद्धा आपल्या आचरणामध्ये प्रमाणित आहेत. तिसरी जीवावस्था ज्यामध्ये मानवाला सोडून सगळे जीव, पक्षी येतात, हे सगळे सुद्धा आपल्या 'त्व' सहित व्यवस्थेच्या रुपात प्रमाणित आहेतच. चौथी आहे ज्ञानावस्था ज्यामध्ये केवळ मानव आहे आणि त्याचे अजून व्यवस्थेमध्ये जगणे प्रतीक्षेत आहे. विचार करा सगळयांत विकसित अवस्था सगळयांत मागे आहे. काय अर्थ आहे ह्याचा? दु:खी होणार नाही तर काय होणार ?

आपलं चरित्र सुद्धा विकसित होण्याची आवश्यकता आहे. आचरणरुपात प्रत्येक वस्तू आपली व्यवस्था प्रमाणित करत असते. मानव सुद्धा आपल्या आचरणानुसार व्यवस्था प्रमाणित करेल हे एक सूत्र मिळते. हे सूत्र तुम्हा, आम्हा, सगळयांना तपासून पहायचेच आहे. तपासायला गेल्यानंतर आपल्यामध्ये समजणारी गोष्ट कोणती आहे, आधी तिला समजायला हवं. समजल्यानंतर निर्वाह करणारी कोणती गोष्ट आहे तिला समजायचं आणि समजल्यानंतर काय मिळणार ह्या गोष्टीला समजायचं. मानवाच्या आवाक्यातील गोष्ट आहे ही. मानव ज्ञानावस्थेमध्ये गणला जातो. ज्ञानावस्थेमध्ये गणला जाण्याचा आधार कोणता आहे? जीव चेतना क्रमामध्ये जे काही आपल्याला समजलं आहे असं मानव समजतो, त्याच पद्धतीने कार्य व्यवहार करतो. त्याने जाणून घेतलं नाही तरी सुद्धा मानण्याची भावना प्रत्येकामध्ये आहे आणि जीव चेतनेमध्ये जगत असताना मी हे जाणतो असं ठासून सांगतो सुद्धा. जाणलेले नसते, मानलेले असते पण बोलताना म्हणतो, मी जाणतो. हा व्यतिरेक (अडचण, बाधा) आहेच. कारण जीव चेतनेमध्ये जगत असताना सर्वशुभाच्या अर्थाने सत्यापित करता येत नाही. भ्रमित मानवामध्ये हाच व्यतिरेक आहे. नव्याण्णव टक्के भ्रमित मानवांनी शरीरालाच जीवन मानलेले आहे, म्हणूनच सगळया त्रासांचा जन्म झाला आहे आणि ह्या त्रासांनी मानव त्रस्त सुद्धा झाला आहे, आता ह्या त्रासातून मुक्त होण्याची इच्छा झाली आहे, त्या इच्छेअंतर्गत हा कार्यक्रम आहे. समजल्याशिवाय, समाधानित असल्याशिवाय सुखी होऊ शकत नाही. पदार्थावस्था ही परिणामानुषंगी विधिने नियंत्रित आहे. प्राणावस्था बीजानुषंगी विधिने नियंत्रित आहे. जीवावस्था वंशानुषंगी विधिने नियंत्रित आहे. व्यवस्थेमध्ये राहणे, निश्चित आचरण असणे हेच नियंत्रित असण्याचे प्रमाण आहे. मानवाला सोडून प्रकृतिमधील प्रत्येक एकक आपल्या निश्चित आचरणात आहे. मानवामध्ये सुद्धा निश्चित आचरणाची

आवश्यकता आहे. मानव संस्कारानुषंगी विधिने नियंत्रित होणार आहे. संस्कार म्हणजे काय आहे? विकसित चेतनारूपी समजदारी आहे. समजदारीचे प्रमाण आहे मानवीयतापूर्ण आचरण. जेव्हा मानव समजदार होतो तेव्हा व्यवस्थेमध्ये जगतो आणि तेव्हा त्याचे आचरण मानवीयतापूर्ण असते. जेव्हा व्यवस्थेमध्ये जगू शकत नाही, तेव्हा अमानवीय आचरण म्हटले जाते. ह्याठिकाणी मानवीय आणि अमानवीय आचरणाची परिभाषा तयार होते. त्यानंतर आपल्याला कळतं की ह्याची आवश्यकता आहे की नाही? ज्याची आवश्यकता असते तिकडेच स्वाभाविकपणे मानवाची प्रवृत्ती असते. ह्या रीतीने मानवाच्या जागृतिचा मार्ग तयार होतो. 'जीवनाचा' ना जन्म होतो ना मृत्यू व शरीराची रचनाही होते आणि विरचनासुद्धा. 'जीवन' त्याच्या स्वभावानुसार शरीराला चालवू इच्छितो. त्याची स्वाभाविक विधी काय आहे? सुखी होण्याची समज आणि कार्यक्रम. सगळे प्राणी वंशानुषंगी पद्धतीने फक्त जगण्याची आशा करतात, पण मानव सुखाने जगू इच्छितो, परंतु जेव्हा मानव वंशानुषंगी पद्धतीने जगायला बघतो तेव्हा, दु:खी होतो, एवढंच आहे.

ह्या गोष्टीला आपल्याला नीटपणे समजून घेण्याची आवश्यकता आहे. व्यवस्थितपणे प्रमाणित करण्याची आवश्यकता आहे. प्रमाणित करण्याची वस्तू काय आहे तर समजदारी. जेव्हा तुमच्याकडून समजून घेऊन मी दुसऱ्यांना समजावू शकतो तेव्हा तुम्ही प्रमाणित होता. ह्या तऱ्हेने परंपरेच्या रुपात समजदारी वाहत जाते. अपूर्ण समजेला परंपरेमध्ये प्रवाहीपण नसते, समजदारीच्या वस्तुमध्ये विविधता नसते, केवळ प्रस्तुतिमध्ये विविधता असते, म्हणून प्रत्येक पिढीगणिक प्रस्तुती सुदृढ होईल, प्रखर होईल. बरोबर करण्याची पद्धत आणखी प्रखर होते. बरोबर करण्याची सार्थकता आणखी सुलभ होते. संपूर्ण मानवजातिसाठी ह्याची आवश्यकता आहे, म्हणूनच समजदारी असलेला मानवच ही परंपरा योग्य पद्धतीने पुढच्या पिढीला अर्पण करुन स्वतः संतुष्ट होऊ शकतो.

पुढची पिढी संतुष्ट होऊ शकते.

मानव संस्कारानुषंगी एकक आहे. समजदारी, इमानदारी, जिम्मेदारी, भागीदारीच्या संयुक्त रूपामध्ये संस्कार वर्तमान असतो. चुकांचा कोणी स्वीकार करत नाही, म्हणून चुका कधी संस्कार नसतात. चुकांना कुणी स्वीकारत नाही पण त्यात अडकून राहतात. कुणी एखाद्याने हजार चुका जरी केल्या असल्या तरी तो त्या चुकांना स्वीकारत नाही. चुकांना कुणी स्वीकारत नाही, म्हणून कुणीही त्या पुढच्या पिढीला अर्पण करत नाहीत, म्हणून चुकांची कधी परंपरा बनत नाही. ह्या सगळया साक्षी पुराव्यांनिशी हाच निष्कर्ष निघतो की समजदारी हाच परंपरा स्वाभाविक स्रोत आहे. त्यासाठी ध्रुवबिन्दू आहे समानता. समानतेचा ध्रुव आहे 'जीवन.' 'जीवनामध्ये' घडणपूर्णता, अक्षय बल, अक्षय शक्ती ह्या गोष्टीच समान आहेत. मी कितीही आशा, विचार, इच्छा केले तरी माझ्यामध्ये आशा, विचार,इच्छा करण्याची ताकद शिल्लकच असते. ह्या पद्धतीने 'जीवनामध्ये' अक्षय बल आणि शक्ती ही परिणामशीलतेमधून मुक्त झाल्याशिवाय होऊ शकत नाही. ह्या तर्कसंगत पद्धतीने जीवनाची घडणपूर्णता आपण स्वीकारु शकतो.

मी समजदारीला स्वीकारले, हे तपासणार कसे? ह्या गोष्टीला व्यवहारामध्ये, कार्यामध्ये, व्यवस्थेमध्ये तपासले जाते. व्यवस्थारुपात जगणे हे समाधान समृद्धी रूपामध्ये स्पष्ट आहे. सध्या मानव परंपरेमध्ये समग्र व्यवस्था नाही. अखंड समाज व्यवस्था रूपामध्ये जगण्याने सह - अस्तित्वामध्ये जी वस्तू जशी आहे तिला तसेच समजणाऱ्या परंपरेच्या रूपामध्ये प्रमाण हाच अनुभव आहे. अशा अनुभवमूलक पद्धतीने जगण्याची गोष्ट आहे, म्हणून असा निष्कर्ष निघतो की मानव समजदारीने अनुभवमूलक विधिने व्यवस्थेमध्ये जगतो. जीवावस्था ही वंशानुषंगी विधिने, प्राणावस्था बीजानुषंगी विधिने आणि पदार्थावस्था परिणामानुषंगी

विधिने व्यवस्थेमध्ये राहते.

आपण ह्या मुद्यावर पोहोचलो की समजदारी निश्चित आहे. समजदारीचा धारक वाहक निश्चित आहे, म्हणून तिचे प्रमाण निश्चित आहे. 'जीवनच' समजदार होतो. 'जीवनच' समजतो, समजदारीचे प्रमाण मानव परंपरेतच असते कारण मानवाच्या शरीरामध्येच समृद्धपूर्ण मेधस रचना आढळते. अजून कोणत्याही (जीव) परंपरेमध्ये समजदारीचे प्रमाण मिळणार नाही. सह-अस्तित्वामध्ये पूरकता, उदात्तीकरण, विकास क्रम, विकास आणि जागृती ह्या सगळया गोष्टी सामावलेल्या आहेत. ह्या सगळया बिंदुंना समजण्याची विधी मानवामध्येच समाहित आहे, क्षमतासुद्धा मानवामध्येच समाहित आहे.

अस्तित्वाला समजायचा मूळ मुद्दा इतकाच आहे की अस्तित्व म्हणजे सत्तेमध्ये संपृक्त असलेली प्रकृती आहे. ते एकमेकांबरोबर ओतप्रोत आणि सतत अविभाज्य, निरंतर विद्यमान, वर्तमान असणे आढळतात. प्रकृतीला व्यापक वस्तुपासून वेगळे करण्याची कोणतीही विधी नाही, वेगळं करण्याचं कोणतंही प्रयोजन नाही. ते वेगळे होऊ शकत नाही, म्हणून अस्तित्वामध्ये ते नाही, त्याची कल्पना करुनसुद्धा काही करु शकणार नाही. अस्तित्वामध्ये जे आहे तेच समजायचे आहे, प्रमाणित करायचे आहे. चार अवस्थांमध्ये अस्तित्वच व्यक्त झालेले आहे.

आपण जर समजदारी प्रमाणित करु शकलो नाही तर आपण परिवार आणि समाज व्यवस्थेमध्ये कुठेही जगू शकणार नाही. प्रत्येक ठिकाणी आपण त्रासून जातोच. सातशे कोटी लोक ह्या पृथ्वीवर आहेत, पण मानवाला अजून व्यवस्थेमध्ये जगता आलेले नाही. संख्या वाढली किंवा कमी झाली, त्यामुळे मानवाला समजले असे काही नाही. मानव परंपरेमध्ये प्रयोजन काय आहे - समाधान,

समृद्धी, अभय, सहअस्तित्व स्वाभाविक प्रमाण. सहअस्तित्व विधिने आपण पूरकतेने जगू शकतो. अभय विधिने वर्तमानामध्ये विश्वास ठेवतो. समृद्धी विधिने आपण कुटुंबाच्या आवश्यकतेपेक्षा जास्त उत्पादन करु शकतो. समाधानामुळेच न्यायाने जगू शकतो.

मानव परंपरेमध्ये आदर्शवादी आणि भौतिकवादी पद्धतींनी प्रयत्न झाले, दोन्ही पद्धतींनी आपल्याला समजदारी मिळाली नाही. त्याचं मूळ कारण असं की आपल्याला अस्तित्व हे सह - अस्तित्व रुपात आहे हे समजलं नाही. सह-अस्तित्वामध्ये जीवन व जीवन जागृतीला समजण्यात चूक झाली, त्यामुळे 'जीवन' आणि समजदारीची परंपरा तयार झाली नाही.

परंपराच नाही तयार झाली तर व्यवस्थेमध्ये जगणे कुठून येईल ? समजदारीच्या अभावामुळे मानवाला मानवाबरोबर न्यायाने आणि प्रकृतिबरोबर (जीव, वनस्पती, पदार्थ) नियमाने, संतुलित रुपात जगता आले नाही म्हणूनच मानव ह्या अनुपम निसर्गाचे हनन करत राहिला .

मानवाला न्याय मिळाला नाही. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना जेव्हा विचारलं तेव्हा ते म्हणाले, आम्ही निर्णय देतो, न्याय करत नाही. ह्या स्थितिमध्ये जेव्हा खुद्द न्यायालयालाच जर न्याय माहिती नसेल तर त्याला न्यायालय म्हणणं किती योग्य आहे? त्याच न्यायालयांमध्ये म्हटलं जातं ''खरं बोला''. न्यायालयातच कितपत खरेपणा आहे? खरेपणा कुठे शोधावा? ह्याच प्रकारे कार्यालयांमध्ये काय काम होतं? चुकांना शोधणे, अपराधांना शोधणे, आणि त्यांना दुसऱ्या चुका आणि अपराध करुन थोपवणे. ह्याच कामासाठी संपूर्ण सरकारी व्यवस्थांमध्ये कर्मचारी नियोजित केलेले आहेत.

मानव जागृत होण्यासाठी मूळ वस्तू समजदारी आहे. जर प्रत्येक मानव समजदार झाला तर मानव न्यायाने जगू शकेल. न्यायाने जगताना समृद्धी, अभय, सह - अस्तित्व ह्या गोष्टी आपोआप येतात. न्यायाने जगल्याशिवाय समाधान येणार नाही. ह्यावरुन कळतं की न्याय हाच मानवीयतेचा कणा आहे. सगळयात आधी न्याय समजदार कुटुंबात प्रमाणित होतो, मग समाजात आणि नंतर संपूर्ण पृथ्वीवर सार्वभौम व्यवस्थेच्या रुपात प्रमाणित होतो. न्यायाने जगल्यामुळे मानव तृप्त राहतो, सुखी राहतो, समाधानित राहतो, वर्तमानामध्ये त्याचा विश्वास वाढायला लागतो आणि आपल्या व्यवहारात निरंतर प्रखरता प्रकट होते. ह्या सगळया गोष्टी न्यायाने जगल्यामुळेच उपलब्ध होतात. ह्या सगळयांसाठी म्हटलं जातं की हे खूप पुण्याने मिळेल. समजदार होणं हाच मला समजलेला पुण्याचा अर्थ. मानव समजदार होण्याच्या परंपरेमध्ये आपली योग्यता, क्षमता, पात्रता स्वतःच प्रमाणित करायला सुरुवात करतो. क्षमता म्हणजे काय तर वहन करण्याची क्रिया. वहन कशाचे करतो? भ्रम किंवा जागृतीचे. मानव जेव्हा जागृत होतो तेव्हा भ्रम आपोआपच निघून जातो. मानव हे संस्कारानुषंगी एकक आहे. समजदारी किंवा भ्रम हे परंपरेनेच येतात. मानवाचे मूल जन्मतःच ह्या गोष्टी घेऊन येतं, परंपरेनेच हे गुण त्यामध्ये प्रचलित, प्रेषित होतात. त्यानंतर येतो पुरुषार्थ आणि परमार्थ. ह्या दोहोंच्या आधारावर मानव समजदार होऊन भ्रमातून मुक्त होतो. भ्रमातून मुक्ती म्हणजे काय तर जीवनाच्या जागृतपणे जगण्याच्या क्रिया. आतापर्यंत परंपरेतून आपल्याला जी शिक्षा मिळाली आहे, ती आहे शरीर सापेक्ष जगणे. लाभोन्माद, भोगोन्माद, कामोन्माद ह्यासाठी शिकवलं जातं, ही गोष्ट साक्षीला आहे. खरं पाहिलं तर मानव हा, जीवांपेक्षा, प्राण्यांपेक्षा वेगळा आहे, वेगळया प्रवृत्तीचा आहे. 'जीवनामुळे' मानवामध्ये बहुमुखी अभिव्यक्ती आहे. मानवाला समाधान हवं आहे. कोणताही पशु, झाडे, दगड समाधानाची इच्छा करत नाहीत. मानवाला समृद्धी हवी. कोणतेही पशु – पक्षी

समृद्धीची  कामना करत नाहीत. कोणताही प्राणी उदा. वाघ, गाय, साप, डुक्कर इ. मध्ये संग्रह करण्याची प्रवृत्ती नाही. मुंगीसुद्धा संग्रह करण्याच्या उद्‌देशाने संग्रह करते  असे नाही. वस्तू मिळते म्हणून ती एकत्र करते. भोग अतिभोगाच्या वासनेमुळे मानवामध्ये जाणून बुजून सुविधासंग्रह करण्याची प्रवृत्ती असते. ह्या आधारावर समाधान मिळवणे आणि व्यवस्थेमध्ये जगणे हे लक्ष्य न होता सुविधा संग्रह हे आपलं लक्ष्य झालं आहे आणि त्यासाठी प्रिय, हित, लाभ हा आपला दृष्टिकोन आहे, म्हणूनच आपण दुःखी होत राहिलो, संघर्ष करत राहिलो, आपल्याला त्रास होत राहिला.

ह्या सगळया त्रासांतून सुटायचा एकच उपाय आहे, ‘जीवन’, सह अस्तित्व आणि मानवीयतापूर्ण आचरण ह्या गोष्टींना समजणे. शरीर आणि ‘जीवन’ रुपात मानव अस्तित्वात सर्वोच्च विकसित एकक आहे, शरीर रुपात आणि ‘जीवन’ रुपात. ‘जीवन’ आपल्या अस्तित्वाला आणि जागृतिला प्रमाणित करण्यासाठी शरीराचा उपयोग करत असताना तो शरीर जिवंत ठेवतो, नंतर जीव चेतनेमध्ये जगून शरीरालाच ‘जीवन’ मानायला लागतो, म्हणून भ्रमित होतो आणि प्रमाणित करण्यासाठी पुन्हा शरीर संचालित करतो. ह्या प्रकारे खूप वेळा शरीर सोडल्यामुळे त्रासून जातोच. ह्यामध्ये पाप किंवा पुण्य नावाची कोणतीही गोष्ट नाही. समजदारी असणे किंवा समजदारी नसणे ह्याच गोष्टी आहेत. परंपरेनेच समजदारी येते. समजदारीला परंपरेमध्येच मिळवायचं आहे, कुणी एक मानव समजदार झाल्याने संपूर्ण जग तरुन जाईल हे शक्य नाही. ह्या कल्पनेनेच आपल्याला भयभीत, निरीह बनवलं. मानवीयतापूर्ण आचरणामध्ये प्रत्येक मानव स्वतःच स्वधन, स्वनारी / स्वपुरुष, दयापूर्ण कार्य व्यवहार ह्या रुपांमध्ये जगू शकतो. ह्या प्रकारे जगल्यानंतर आपल्या तन, मन, धनाचा सदुपयोग आणि सुरक्षा सुद्धा करता येते आणि जेव्हा ह्या दोन्ही गोष्टी सजतात तेव्हा संबंध, मूल्य, मूल्यांकन आणि उभयतृप्ती ह्या गोष्टी सुद्धा

आपोआप प्रमाणित होतात. ह्या पद्धतीने मूल्य, चरित्र, नैतिकता ह्यांच्या संयुक्त रुपात मानवाच्या आचरणाची व्याख्या होते. नैतिकता म्हणजे काय तर तन, मन, धन रुपी अर्थाचा सदुपयोग सुरक्षा होणे. संबंधांना ओळखण्याच्या विधिनेच मूल्यांचा निर्वाह होतो. जसं एखादा मानव आपल्या पित्याबरोबर, मातेबरोबर, गुरुबरोबर व्यवस्थेच्या अर्थाने संबंध ओळखतो तेव्हा (भाव) मूल्यं आपोआप स्रवू लागतात त्यामुळे मूल्यांचा निर्वाह होतो. जिथं संबंध ओळखत नाही, तिथं कोणतंही मूल्य स्रवत नाही. उदा. रेल्वेच्या डब्यामध्ये एखादा बसलेला आहे, कोणीतरी एखादा अपरिचित येतो, तेव्हा बसलेल्याचे हातपाय आपोआप लांब होतात, इथं कोणी बसू नये अशी इच्छा होते. थोडया वेळानंतर कोणी परिचित मानव आल्यानंतर तो स्वतः आपोआप उठून उभा राहतो, त्यांना बसवतो, म्हणजे संबंध ओळखणे हे एक मोठे काम आहे. प्रयोजनाच्या आधारावर संबंधांबद्दल अध्ययन होते. जसा आईशी संबंध हा पोषण प्रधान रुपी प्रयोजन आधारित, पित्याशी संबंध हा संरक्षण प्रधान रुपी प्रयोजन आधारित अध्ययन केला जातो. सगळे संबंध ओळखायला लागल्यावर मानव चूक करत नाही. संबंध न ओळखता चूक करणारच.

प्रचलित राजकीय तंत्र, धर्म तंत्र, प्रचार माध्यमे ह्याकडे पाहिल्यावर असं वाटतं की ही सगळी तंत्रे अपराध्यांसाठी बनलेली आहेत. अपराधी लोकांना तारण्यासाठी ह्या दोन्ही यंत्रणा आपआपल्या पद्धतीनुसार काम करत आहेत. ह्या सगळया यंत्रणा मानवाला समजदारी देऊ शकल्या नाहीत. प्रत्येक मानव समजदार होऊ इच्छितो. इमानदार होऊ इच्छितो. इमानदारीचा मार्ग दाखवू शकल्या नाहीत. प्रत्येक मानव जिम्मेदार (जबाबदार) होऊ इच्छितो. जबाबदारीचे प्रयोजन परंपरेमध्ये देऊ शकल्या नाहीत. लोकांनी शुभ कामना व्यक्त केल्या ''सगळयांचं शुभ होवो, सगळयांची कुटुंबं असावीत, सगळयांचे मंगल होवो'' ह्या प्रकारच्या शुभकामना

सगळयांनी वारंवार व्यक्त केल्या, पण केवळ कामना व्यक्त केल्यामुळे, त्याची पुनरावृत्ती केल्यामुळे मार्ग सापडेल असे नाही. ''सगळयांचे शुभ होवो'' असं ज्या पुस्तकात लिहिलेलं असतं त्यातच असंही लिहिलेलं असतं ''सगळं जग माया आहे. खरे माता पिता तर ईश्वर आहे त्यांनाच शरण गेलं पाहिजे''. ह्यामुळे कल्याण झालं नाही. खऱ्या आई -वडिलांकडे गेल्यानंतर मानव राहिलाच नाही तर कुठे कुणाचे कल्याण होईल ? ह्या सगळयांतून कोणतेही प्रयोजन निघत नाही. समजदार झाल्यानंतरच मानवाचं प्रयोजन स्पष्ट होते . सगळया संबंधांमध्ये प्रयोजन सामावलेलं असतंच. असं कोणतं प्रयोजन? समाधान, समृद्धी, अभय, सहअस्तित्व ह्यांना सफल बनवणे हेच प्रयोजन आहे. सगळया संबंधांचे प्रयोजन त्याच्याशीच निगडित असते. त्याच्याशी जोडले गेल्यानंतर परंपरा तयार होते. परंपरा ही समजदारीचीच होणार. नासमजदारीची कोणतीही परंपरा अखंड होणार नाही, म्हणूनच सर्वशुभ अर्थाने अजूनपर्यंत कोणतीही परंपरा झालेली नाही. सध्याच्या शिक्षेमध्ये मानव जेव्हा तयार होतो तो स्वतःला सगळयात बुद्धिमान मानतो, सगळया जगाला मूर्ख मानतो. दरवर्षी असे कित्येक कोटी स्नातक तयार होतात. ह्या एक एक स्नातकांना कसे समजदार बनवायचे ? कुठून इतक्या डॉक्टरांना आणायचे की जे ह्यांना ठीक करु शकतील ?

स्वतः समजल्याशिवाय कुणी स्वीकारत नाही, मी स्वतः ह्याचा प्रत्यक्ष पुरावा आहे. आमच्या कुटुंबात वेदमूर्ती ,शेजारी वेदमूर्ती, सगळया गावात वेदमूर्ती होते, पण आमच्या कुटुंबातले लोक मला वेद शिकवू शकले नाहीत कारण माझी शिकायची इच्छा नव्हती. पण ह्या पृथ्वीवर प्रत्येक मानव समजदार बनू इच्छितो. ह्या आधारावर प्रत्येक मानवाने समजदार बनायची पूर्ण शक्यता आहे. ह्या प्रवृत्तीला बघूनच हे अभियान सुरु केलं. प्रत्येक मानवाचे समजदार बनायचे स्वप्न सुद्धा आहे. ह्या सत्य स्थितिला बरोबर

घेऊन सुरुवात केली आहे. त्यानुसार सुरुवात करुन ज्या लोकांना काही समजलं आहे, त्यांना हायसं वाटलं आहे, ज्यांना आपण मानवीयतापूर्ण आचरण रुपात ओळखतो ते सगळे गुण त्यांच्यामध्ये आलेले आहेत.

तन, मन, धन रुपी अर्थाला प्रयोजनानुसार नियोजित करणे हे नैतिकतेचं मूळ तत्त्व आहे, ज्याला सदुपयोग म्हणतात. सदुपयोग दोन अर्थांनी होतो- १. सेवा आणि उत्पादनात तन, मन, धनाचे नियोजन. २.संबंधांबरोबर प्रयोजनाला सफल बनवण्यासाठी तन, मन, धनाचा अर्पण - समर्पण सदुपयोग.

ज्याचा सदुपयोग केला जातो त्याची सुरक्षा होते. ज्याच्यासाठी आपण सदुपयोग केला त्या अर्थाची सुरक्षा होते. हाच माझ्यानुसार सदुपयोग आणि सुरक्षेचा अर्थ आहे. समाधानासाठी, समृद्धिसाठी, वर्तमानामध्ये विश्वासपूर्वक व्यवस्थेसाठी, सहअस्तित्वासाठी तन, मन, धन रुपी अर्थाला नियोजित केल्याने त्याची सुरक्षा होते, म्हणजेच आपल्या धनाचा सदुपयोग झाला. सदुपयोग झाल्या- शिवाय सुरक्षा आणि सुरक्षेशिवाय सदुपयोग होणार नाही. सुरक्षा सदुपयोग सतत शुभ असतो. सद्प्रवृत्तींमध्ये आपल्या तन, मन, धनाला नियोजित करण्याची आवश्यकता कायम असते की जी आपल्या जागृतीसाठी आहे.

सह - अस्तित्वामध्ये मानव हेच समजदार एकक असू शकते. ‘जीवन’ आणि शरीराच्या संयुक्त रुपात मानव प्रमाणित आहे. मानव शरीराची वंशपरंपरा आहे. सह - अस्तित्व स्वाभाविक रुपात घडणपूर्ण अणू रुपात ‘जीवन’ आहे. मानवाचे त्यात कोणतेही योगदान नाही. शरीरामध्ये मानव परंपरेचे योगदान आहे. हीच व्यवस्था आहे. ‘जीवनाला’ आपली जागृती प्रमाणित करण्यासाठी ‘जीवन’ आणि शरीराच्या संयोगाची आवश्यकता आहे आणि जीव

शरीरांमध्ये समजदारी प्रमाणित करण्याची व्यवस्था नाही,म्हणूनच मानव हा संस्कारानुषंगी एककाच्या स्वरुपात समजतो. अस्तित्वामध्ये मानवाला सोडून तिन्ही अवस्था परस्पर पूरक आहेत. मानवाने पूरक होण्याची आवश्यकता आहे. पूरकतेच्या रुपातच मानव व्यवस्थेमध्ये जगू शकतो. व्यक्तिवाद, भोगवादाच्या आधारावर हे कधीच शक्य नाही. भौतिकवाद आणि विरक्तिवाद ह्या मागच्या दोन्ही प्रकारच्या चिंतनामुळे मानव व्यक्तिवादी झाला आहे. भौतिकवादी पद्धतीने मानव भोगवादी होतो म्हणजेच व्यक्तिवादी होतो. विरक्तिवादी मानव हा व्यक्तिवादी असतोच, ह्या दोन्ही विचारांनी समाज घडण्याचे सूत्र मिळाले नाही तर समाज विरोधीच झाले, पण मानव तर समाजात, सह अस्तित्वामध्ये समृद्धिसहित, समाधानाने जगू इच्छितो. तिन्ही विचार (सह - अस्तित्व, समृद्धी, समाधान) प्रयोजनांना पूर्ण करणे ही मानवाची जबाबदारी आहे.

समजदारी आल्यानंतर जबाबदारी (जिम्मेदारी) येतेच. जबाबदारी ओळखल्यानंतर आपण स्वाभाविकपणे परिवार मानव होऊन जातो, सामाजिक होतो, म्हणजेच आपण सार्वभौम होता होता प्रमाणित होतो. अशा वैभवशाली परंपरेची आवश्यकता आहे. व्यवस्था असावी अशी प्रत्येक मानवाची आशा आहे, आकांक्षासुद्धा आहे. मला वाटते इच्छासुद्धा तीच आहे पण तिचा क्रमांक (प्राधान्य) खूप खालचा आहे. तिच्या वर आणखी बऱ्याचशा गोष्टी आहेत, म्हणून व्यवस्थेची तीव्र इच्छा होऊ शकत नाही, म्हणून समर्पित होण्यासाठी मानव असमर्थ होतो. जीव चेतना विधिने मानव विवश होतो. काय करावे ? जे लगेचच समजायला तयार आहेत, त्यांना पारंगत करावे. त्यांच्याद्वारे शिक्षा संस्थांमध्ये मानवीय शिक्षेला व्यवहारात आणायला हवे, मुलांना संस्कारित करावं. मुलांवर संस्कार केल्यामुळे त्यांच्या घरी स्वाभाविकपणे बदल होतीलच. ह्या प्रकारे शिक्षेच्या मानवीकरणाची आवश्यकता आहे शिक्षा सार्थक होणे हीच व्यवस्था, ही दुसरी योजना आहे.

पदार्थावस्था, प्राणावस्था आणि जीवावस्थेतील एकके मानवासाठी पूरक आहेत, पण मानव त्यांच्यासाठी पूरक होणं अजून विचाराधीन आहे. त्याने पूरक होण्याची आवश्यकता आहे. मानव व्यवस्थेमध्ये जगत असल्याचे प्रमाण तेव्हाच मिळू शकेल.

जागृत 'जीवन' सहज (स्वाभाविक) मूल्य आहे– सुख, शांती, संतोष आणि आनंद. 'जीवन' सहज मूल्यांनी मानवाचे लक्ष्य सफल होते. मानवाचे लक्ष्य आहे– समाधान, समृद्धी, अभय, सह -अस्तित्व. मानव लक्ष्य प्रमाणित होते, 'जीवन' मूल्य प्रमाणित होते. समाधान = सुख. जिथं जिथं आपण समाधानित राहतो, तिथं तिथं सुख अनुभवतो. जिथे समाधानित नसतो, तिथे त्रासून जातो. त्यानंतर कुटुंबात आपण जगतो, समाधान, समृद्धिने प्रमाणित होण्याच्या स्थितिमध्ये शांती अनुभवतो. व्यवस्थेमध्ये जगतो तेव्हा संतोष, आनंदाचा अनुभव होतो. आपल्या समजदारीला प्रमाणित करण्याच्या अर्थाने आनंदाचा अनुभव होतो. ह्या तऱ्हेने जेव्हा आपण सगळे प्रमाणित होऊ शकतो तेव्हा परंपरेमध्ये समजदारी स्वाभाविक प्रमाण राहील. अशा तऱ्हेने आपण सुख, शांती, संतोष, आनंद ह्यांचा अनुभव करण्यायोग्य आहोत.

'जीवन' अक्षय बल, अक्षय शक्ती संपन्न आहे, म्हणून 'जीवन' समाधानानंतर समाधानाला निरंतर प्रकाशित, प्रमाणित करत राहतो आणि तृप्तीतच राहतो. 'जीवन' हा स्थितिमध्ये बल आणि गतिमध्ये शक्ती आहे. गतिमध्ये होणाऱ्या क्रिया एकमेकांच्या परस्परतेमध्ये प्रमाणित होतात. स्थितिमध्ये राहिल्यानंतर क्रियांचा अनुभव होतो. आपण जितके आस्वादन केले आहे त्यांनी आपण तृप्त झालो आहोत की नाही हे कळतं. जितकं आपण तुलन केलं, आपल्याला काही तथ्य मिळालं की नाही, सत्याचा आपण अनुभव पूर्वक साक्षात्कार (चिंतन) केला, बोध केला, अनुभव केला त्याने तथ्य मिळाले की नाही ह्याबाबत आपण निरंतर प्रयोजनाच्या अर्थाने

परीक्षण करतोच, परीक्षण करावंच लागेल, करणारच, त्याशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाही. ह्या पाच अवस्थांमध्ये तृप्ती हाच सतत सुखी होण्याचा मार्ग आहे. ह्यालाच सुख, शांती, संतोष, आनंद हे नाव देतो. प्रमाणित झाल्यानंतर मानवाचे वैभव स्वतःमध्ये स्वराज्याच्या रुपात प्रतिष्ठित होते. राज्याचा अर्थ आहे, मानवीयतेने परिपूर्ण होऊन मानवाचे वैभवात असणे. व्यवस्थेमध्ये जगणे हेच राज्य आहे, स्वराज्य आहे. स्वयंप्रेरित होऊन व्यवस्थेमध्ये जगणे हेच स्वराज्य आहे, म्हणून मानवीयतापूर्ण आचरण हीच ह्याची व्याख्या आहे. स्वतःमध्ये, कुटुंबात, समाजात, प्रकृतिमध्ये, व्यवस्थेमध्ये जो संबंध आहे त्याला सार्थक बनवावं, हेच मानवाच्या जागृतिचे स्वाभाविक वैभव आहे. संबंध आणि मूल्यांना सार्थक बनवण्यासाठी आपण वर्तमानामध्ये विश्वास ठेवू शकतो. संबंधांना ओळखत नाही, तेव्हा वर्तमानात जगत नाही, तेव्हा भूतकाळात जातो, भूतकाळ वर्तमान असत नाही (भूतकाळाबरोबर जगता येत नाही) भविष्याबद्दल विचार करतो, भविष्य सुद्धा वर्तमान नसते. ह्या प्रकारे माणसाला कुठेही जागा मिळत नाही, म्हणून दिशाहीन असतो. असं भटकणं कुणाला नको असतं. परंपरेमध्ये दिशा आणि लक्ष्य निर्देशाची व्यवस्था नाही. प्रत्येक मानव चेतना विकास मूल्य शिक्षेने समजदार होऊन प्रमाणित परंपरा होऊ शकते. प्रत्येक मानवाच्या आचरणामध्ये येऊ शकते आणि मानवत्व मूल्यांकित होऊ शकते. मानवाला समजदारीला सफल बनवायचं आहे, हेच त्याचे वैभव आहे, हेच मानवाचे ऐश्वर्य आहे. ह्याच ऐश्वर्याच्या मदतीने मानव आपल्या परंपरेला निरंतर सुखी बनवू शकतो. संपूर्ण पशु विश्व, वनस्पती विश्व, पदार्थाबरोबर मानव संतुलित व्यवहार करु शकतो, त्यात जी पूरकता आहे, त्याबद्दल स्वतः कृतज्ञ होऊन त्याचा उपयोग, सदुपयोग करु शकतो. प्रयोजनशील बनू शकतो.

संबंध, मूल्य, मूल्यांकन, उभयतृप्ती हे मानवाबरोबर आहे.

तृप्ती हा वर आहे, अतृप्ती हा वर नाही. प्रत्येक मानवाला तृप्त होण्याच्या आशेने समाधान, समृद्धी, वर्तमानामध्ये विश्वास, व्यवस्थेमध्ये जगणं आणि सह-अस्तित्वाला प्रमाणित करायचंच आहे. सत्याचे स्वरुप ह्या प्रकारे आले. अस्तित्व हेच परम सत्य आहे, अस्तित्व हीच निरंतर राहणारी वस्तू आहे आणि अस्तित्व हे सह-अस्तित्व स्वरुप आहे, सह-अस्तित्व हेच निरंतर प्रभावशील आहे, म्हणून विकास व जागृती प्रकट होते, विकास क्रम असतो. विकसित जिवंत होतो. विकास क्रमामध्ये भौतिक रासायनिक वस्तुंच्या रुपात निरंतर कार्य आहे. 'जीवनाची' संख्या किती असावी हे सुद्धा सह-अस्तित्व स्वाभाविक विधिने ठरते. भ्रमित मानवाच्या क्रमाने ठरत नाही. चारही अवस्थांना अस्तित्वाने स्वतःच्या पद्धतीने प्रकाशित केलेले आहे. ह्यामध्ये मानवाचे कोणत्याही प्रकारचे योगदान नाही. मनुष्येतर प्रकृतिबरोबर पूरक असल्याचे प्रमाण मानव देऊ शकला नाही, प्रमाणित करु शकला नाही, उलट शोषण करत राहिला. शोषण करुन मानवाने सुखी होण्याची इच्छा कशी केली ही विचार करण्याची गोष्ट आहे. शोषण करुन सुखी होण्याविषयी सगळी राज्ये, सगळे समुदाय, सगळे धर्म, बहुतांश कुटुंबे विचार करत राहतात. राज्य आणि समुदायांची तर ही मान्यता आहे की शोषण करुनच मानव सुखी होऊ शकतो. आजपर्यंत हीच अंतिम गोष्ट आहे आणि विज्ञानाने सुद्धा ह्याचे समर्थन केले आहे की, संघर्ष आणि शोषण करुनच मानव आपले अस्तित्व टिकवू शकतो. अस्तित्वाचा येथे आपली जात, समुदाय असा अर्थ आहे. संघर्ष म्हणजे बळी तो कान पिळी. संघर्ष करणे ह्यालाच विकास म्हणतात. जे देश अधिक युद्धं करु शकतात, अधिकाधिक व्यापारामध्ये डोके चालवू शकतात, अधिक शोषण करु शकतात, त्यांना विकसित देश म्हटले जाते, पण विकसित देश तोच आहे, जो जागृत आहे. व्यवस्थेमध्ये आहे, समाधानित आहे, समृद्ध आहे, ज्याचा आपल्यावर विश्वास आहे, सह-अस्तित्व ज्याला समजलं आहे. 'जीवनाने' 'जीवनाला' समजणं आणि 'जीवनाने' अस्तिवाला समजणं ह्या दोन

वेगळया पद्धती आहेत. ज्या काही भौतिक रासायनिक वस्तू आहेत, त्यांना आपण प्रयोगाने उपयोगितेच्या आधारे ओळखतो. सामान्य आकांक्षा आणि महत्त्वाकांक्षा ह्या रुपात आपण उपयोगितेला ओळखतो. सामान्य आकांक्षा अशा - आहार (अन्न), आवास (निवारा) आणि अलंकार ( शरीर पोषण व संरक्षणासाठी साधनं). दूरगमन, दूरदर्शन, दूरश्रवण ह्या महत्त्वाकांक्षा आहेत. ह्या सगळयातील अधिकाधिक गोष्टींना आपण ओळखलं आहे, त्याचं उत्पादन सुद्धा केलं आहे. ह्या गोष्टी सर्वसुलभ व्हाव्यात ह्यासाठी व्यापारी पद्धतीने प्रयत्न सुद्धा केला आहे. व्यापार विधिमध्ये लाभाची प्रतीक्षा तर असतेच.

'जीवनामध्ये' होणाऱ्या विश्लेषण क्रियेच्या आधारावर आपल्याला कुठल्या गोष्टींची आवश्यकता आहे हे आपण ओळखू शकतो, मग त्या आवश्यकता ओळखून आपण उत्पादन करतो आणि समृद्धी अनुभवतो. जेव्हा समृद्धी अनुभवतो तेव्हा व्यवस्थेमध्ये जगायला सुरुवात करतो, म्हणूनच सगळयात आधी विदयार्थ्यांना स्वायत्त बनवण्याची आवश्यकता आहे, नंतर कुटुंबात प्रमाणित होण्यायोग्य प्रवृत्ती आणि मग समग्र व्यवस्थेमध्ये जगण्याची आवश्यकता आहे. ह्या तिन्ही स्थितिंमध्ये प्रमाणित होणं हे मानवाचे सौभाग्य आहे. असं सौभाग्यशाली बनण्यासाठी मानवाची स्वयंस्फूर्त आवश्यकता हा एकच आधार आहे. जर अशी आवश्यकता भासली तर ह्या प्रस्तावाला मनापासून अध्ययन करुन स्वतःला प्रमाणित करणे स्वाभाविक आहे.

मी हे समजून घ्यायचा प्रयत्न केला की समजदारी म्हणजे काय आहे? समजणारा कोण आहे? समजण्यासाठी वस्तू काय आहे ? समजणारी वस्तू 'जीवनच' आहे. समजण्यासाठी अस्तित्व ही वस्तू आहे, 'जीवन' आहे आणि मानवीयतापूर्ण आचरण हेच आहे. अस्तित्वाला समजून घेताना अस्तित्वामध्ये विकासाला

समजून घ्यायचे आहे. रासायनिक भौतिक रचना, विरचना ह्या गोष्टींना समजून घ्यायचे आहे. रासायनिक भौतिक रचना, विरचना ह्या पदार्थावस्था आणि प्राण अवस्थेच्या रुपात अस्तित्वात आहेत. ह्या सगळया वस्तुंचे एका स्वरुपातून दुसऱ्या स्वरुपात परिवर्तन होत राहते जशी झाडं, वेली काही काळानंतर आपणहून वाळून जाऊन मातीमध्ये परिवर्तित होतात.

ह्यालाच परिवर्तनशीलता म्हणतात, हे जे परिवर्तन आहे ते भौतिक रासायनिक पदार्थांमध्ये निरंतर चालू राहणारी प्रक्रिया आहे. अशाच प्रकारे मानव आणि पशु शरीर रचना गर्भाशयात रचित होतात आणि काही काळानंतर विरचित होऊन माती, पाणी, हवा ह्यामध्ये परिवर्तित होतात.

समजणारी वस्तू म्हणजे 'जीवन' हा नेहमी एकसारखाच असतो. मानवाच्या शरीरात समजणारी वस्तू फक्त 'जीवनच' आहे. .समजताना अस्तित्वाला सह-अस्तित्व रुपातच समजलं गेलेलं आहे. सह - अस्तित्वाच्या दृष्टिनेच आपण संपूर्ण परिस्थितीमध्ये, व्यवस्थेमध्ये जगू शकतो. व्यवस्थेमध्ये जगणे हेच मानवाचे लक्ष्य आहे, व्यवस्थेमध्ये जगणे हेच सुख आहे. अव्यवस्थेमध्ये जगून समस्यांमुळे 'जीवन' त्रासून जातो, म्हणूनच समाधानाचा शोध हा स्वाभाविक आहे. जीवनामध्ये निरंतर शोध, अनुसंधानाची प्रवृत्ती असते. जीवनातच नाही तर जड अणुमध्ये सुद्धा अनुसंधान होत राहते, परिवर्तनासाठी हेच मूळ कारण आहे. सहअस्तित्वामध्ये राहण्याची प्रत्येक ठिकाणी प्रवृत्ती आहे. सह -अस्तित्वामध्ये राहण्याच्या प्रवृत्तीमुळे अणुअंशांची (परमाणुअंशांची) अणु- रुपामध्ये (परमाणुरुपामध्ये) आणि अणुंची (परमाणुंची) रेणू (अणु) रुपात घडण होत राहते. रेणूंची (अणुंची) सुद्धा ह्याच प्रवृत्तीमुळे रेणुपिंड (अणुपिंड) रुपामध्ये घडण होत राहते. ह्याच प्रकारे अनंत ग्रह- गोल अस्तित्वामध्ये आहेत ही गोष्ट मानवाला समजते. जड प्रकृतिमधील

जी विविधता आहे, त्याचं मूळ रुप हे अणुमध्ये (परमाणु) असणाऱ्या अंशांच्या संख्येमधील फरकच आहे. ह्या विविध वस्तुमधील विविधतेच्या आधारावर, स्थापनेच्या आधारावरच त्यांच्यापासून बनलेल्या रचनांमध्ये विविधता आढळते. जसं वनस्पतींमध्ये अनेक प्रकारच्या रचना आहेत, ज्या ज्या रचनांनी वस्तू बनलेल्या आहेत त्या आपल्या स्वाभाविक रुपात म्हणजेच आपल्या स्वरुपात वैभवात आहेत. सह-अस्तित्वामध्ये भागीदारी करणे हेच त्याचे भौतिक प्रयोजन आहे. रचनेच्या मुळाशी जे द्रव्य आहे, ते सुद्धा सह-अस्तित्वामध्येच असल्याचा महिमा आहे. ह्याच महिमेच्या आधारावर संपूर्ण अस्तित्व विद्यमान आहे, प्रमाणित आहे, प्रकाशित आहे. ह्या अस्तित्वाचाच एक भाग मानवसुद्धा आहे. सह-अस्तित्वामध्ये मानव अविभाज्य आहे. सह-अस्तित्वाला सोडून मानव कुठेही पळून जाऊ शकत नाही. जितका त्याने पळण्याचा प्रयत्न केला आहे, तितका तो त्रासून गेलेला आहे. प्रत्येक मानव स्वतःमध्ये समाधान इच्छितो. त्यासाठी प्रत्येक जण शोध करत राहतो. व्यवस्थेचा शोध करण्याचा अधिकारी प्रत्येक जण आहे. प्रत्येक व्यक्ती जेव्हा शोधपूर्वकच जगते तेव्हा तिला कर्मस्वतंत्रता आपोआप कळते. शोध करण्याचा उद्देश स्पष्ट आहे, जगण्याचा उद्देश स्पष्ट आहे. मानव सुखाने जगू इच्छितो ह्याच एका बिंदुवर जगण्याचा उद्देश धृवीकृत होतो. सुखी होण्यासाठी एकच प्रक्रिया आहे. ‘जीवनाचा’ उद्देश, मानवाचा उद्देश सफल झाला पाहिजे. समजदारीने ‘जीवनाचा’ उद्देश सफल झाला पाहिजे. समजदारीने ‘जीवनाचा’ उद्देश पूर्ण होतो. ‘जीवन’ तृप्त होतो आणि तृप्त ‘जीवनच’ समाधान, समृद्धी, अभय आणि सह -अस्तित्व अनुभव समान हे मानवी उद्देश टिकवून ठेवण्यात समर्थ असतो. व्यवस्थेमध्ये जगण्याचा हाच पुरावा आहे. मानव व्यवस्थेमध्ये जगतो, चारही लक्ष्य उपलब्ध असतात. अशी मानवी परंपरा एकमेकांसाठी उपकारी असते. एकमेकांना समजदार बनवणे हाच उपकार आहे. त्यानेच सह-अस्तित्वाचा अर्थ परंपरा

रूपामध्ये सार्थक होतो.मानव परंपरेमध्ये सह-अस्तित्वाला वर्तमानामध्ये टिकवून ठेवणे हीच व्यवस्था आहे. सह-अस्तित्वापेक्षा विपरीत जेव्हा काही झालेलं आहे, तेव्हा व्यवस्थेमध्ये गडबड होते. कर्मस्वतंत्रता आणि कल्पनाशीलतेमुळे मानव काहीही गडबड करतो. उदा. पृथ्वीला त्याने खूप त्रास दिला आहे. ह्या त्रासामुळे आपल्याला काय त्रास होऊ शकतो हे त्याला माहिती नव्हते. जेव्हा कळाले तेव्हा काही उपाय राहिला नाही.

कर्मस्वतंत्रता आणि कल्पनाशीलतेमुळेच मानव सतत शोध अनुसंधान करत राहतो. शोध आणि अनुसंधान तेव्हाच सार्थक असतात, जेव्हा ते व्यवस्थेसाठी असतात. समाधान, समृद्धी, अभय, सह-अस्तित्वासाठी असतात. समजदारीमुळे मानव –

१. स्वतःमध्ये विश्वास

२. श्रेष्ठतेचा सन्मान

३. प्रतिभा आणि व्यक्तित्वामध्ये संतुलन

४. व्यवहारामध्ये सामाजिक

५. व्यवसायामध्ये स्वावलंबी होतो,

ह्यांना सद्‌गुण म्हणू शकतो. ह्या सद्‌गुणांमुळे मानव सामाजिक होतो, समजदारीला प्रमाणित करणे हीच विद्‌वत्ता आहे. विद्‌वान जो आहे तो अस्तित्व स्वाभाविक विद्यमान मानवच असतो. प्रत्येक एककाचा स्वतःमध्येच शोध चालू असतो, पण विद्‌वत्ता फक्त मानवातच असते.

मानवामध्ये असलेल्या चार क्रिया आता मी सांगितल्या. जाणणे, मानणे, ओळखणे (पहचानना) आणि निर्वाह करणे. ह्यातले ओळखणे आणि निर्वाह करणे हे प्रत्येक वस्तुमध्ये समाहित आहे. प्रत्येक वस्तू दुसऱ्या वस्तुला ओळखते, तेव्हाच निर्वाह सुद्धा करते. अणुचा (परमाणुचा) एक अंश सुद्धा दुसऱ्याला ओळखतो, म्हणूनच ते व्यवस्थेमध्ये राहतात, एकमेकांबरोबर राहू शकतात, कार्य करु शकतात, त्यामुळे सह-अस्तित्वामध्ये प्रकाशित होऊ शकतात. ह्याच

पद्धतीने रेणूपासून (अणुपासून) ग्रह-गोल एकमेकांना ओळखतात आणि निर्वाह करतात. ह्या पद्धतीने पदार्थावस्था, प्राणावस्था, जीवावस्थासुद्धा एकमेकांना ओळखतात आणि निर्वाह करतात, प्रकृतिमधील पूरकता विधिने ह्याचे प्रमाण स्पष्ट होते. मानव केवळ ओळखून निर्वाह करण्यामध्ये तृप्त झाला नाही. त्याच्यामध्ये शंका निर्माण झाल्या. मानवामध्ये अजून दोन क्रिया जोडल्या गेल्या- जाणणे आणि मानणे. जाणणे आणि मानणे ह्या दोन क्रियांच्या आधारावरच मानव ओळखून त्याचा निर्वाह करुन आश्वस्त होतो. प्रयोजना च्या सार्थकतेचेच जाणणे मानणे होते. प्रयोजन जाणण्यात आणि मानण्याच्या क्रमामध्येच मानव सामाजिक होऊ शकतो, त्याशिवाय सामाजिक होऊ शकत नाही. सह - अस्तित्व प्रमाणित होत नाही. जाणण्या -मानण्याची संधी असूनही जाणणे, मानणे होऊ शकले नाही हे सुद्धा मानवाच्या प्रचंड दारिद्रयाचे कारण आहे. अशा स्थितित मानव स्वतः दरिद्री राहतो, इतरांना सुद्धा दरिद्री बनवतो. स्वतः दरिद्री असल्यामुळे पृथ्वीला सुद्धा माणसाने दरिद्री केले आहे. मला असे समजते की जाणण्या - मानण्याची जी क्रिया आहे तिला अजून प्रखर बनवायला हवं आहे. प्रत्येकामध्ये ह्या प्रखरतेची शक्यता आहे. प्रत्येकामध्ये ह्या प्रखरतेची आवश्यकता आहे, हे निकट आहे. समजदारीला प्रमाणित करणे आणि परंपरेच्या रुपात प्रवाहित करणे हाच विद्येचा अर्थ आहे.

'जीवन' क्रियांना मुळात पाच भागात पाहू शकतो. स्थिती आणि गती रुपात प्रत्येक भागात दोन-दोन क्रिया होतात. जसं प्रत्येक 'जीवनामध्ये' 'आशा' नावाची क्रिया होते, त्यात दोन क्रिया असतात - चयन (निवड) आणि आस्वादन. आस्वादनासाठी काय निवडतो, ही एक चयन क्रिया आहे. आस्वादन करतो ही पण एक क्रिया आहे. ह्या दोन्ही क्रिया जिथं होतात, त्या भागाला 'मन' म्हणतात. माझ्या आस्वादनासाठी चयन क्रियेमध्ये काय हवं आहे,

त्या सगळया गोष्टींची मानवाने कल्पना केलेली आहे, त्या सगळया गोष्टींना एकत्र केलं आहे आणि एकत्र करण्यात तो गुंतलेला आहे. आतापर्यंत आपण सुविधा संग्रह करण्यासाठी सगळे एकत्र केले आहे. सुविधा संग्रह करण्याचे प्रयोजन जाणण्यासाठी, मानण्यासाठी आपण जितके मागे राहिलो तितकेच सुविधा संग्रहासाठी आपण विवश होत गेलो, हेच ह्याचे कारण आहे. सुविधा संग्रहामध्ये कुठेही तृप्तिबिंदू मिळाला नाही. ह्या सोयींचे व्यवहारिक प्रयोजन पहायला गेलो तर असं समजतं की ह्या सोयी शरीराच्या पोषण, संरक्षणासाठी आहार, आवास, अलंकार (साधनं) ह्या आवश्यकतांच्या रुपात आहेत. समाजगतिसाठी दूरगमन, दूरश्रवण, दूरदर्शन ह्या आवश्यकता स्पष्ट होतात. ह्या सगळया गोष्टी आपल्याला मिळाल्या आहेत आणि त्या आधारावर मानव तृप्त झालेला नाही. ही एक मोठी थट्टा आहे.

जीवनाच्या आणखी दोन क्रिया आहेत - ‘विश्लेषण’ आणि ‘तुलन’. आपल्या स्वतःच्या बळावर जे काही शक्य आहे ती विश्लेषण क्रिया जीवन करतोच. सगळया विश्लेषणांमध्ये प्रयोजन ओळखणे हीच गोष्ट आहे. समाधान, समृद्धी, अभय, सह-अस्तित्व ह्यानुसार जगून प्रमाणित करणे हेच मुळात प्रयोजन आहे. ह्याच्या विपरीत भोग, अतिभोग जिथे आहे, तिथे मानव टिकू शकणार नाही.

विज्ञान आता असा निष्कर्ष काढत आहे की सगळे मानव काही वर्षांमध्ये मरतील आणि पृथ्वी नष्ट होईल, ते होईलच. पृथ्वीच्या तिच्या स्वतःच्या पद्धतीने विचार केला तर पृथ्वी सर्वांग समृद्ध झाल्यानंतरच, मानवाला राहण्यासाठी योग्य झाल्यानंतरच पृथ्वीवर मानव अवतरला.मानवाला हळूहळू जीव चेतना क्रमामध्ये जागृत होण्याची संधी दिली. पण जागृत होण्याऐवजी मानव भोग अतिभोगाकडे अग्रेसर झाला. भोग-अतिभोगालाच दिशा बनवल्यामुळे मानव सुविधेच्या अंतहीन संग्रहाकडे अग्रेसर झाला.

सगळयांसाठी सुविधा संग्रह पूर्ण करण्याच्या हव्यासासाठीची सामग्री ह्या पृथ्वीवर नाही, त्यामुळे कधी न कधी ही हाव मानवाला बुडवणारच, म्हणूनच सगळया सुविधा संग्रहाला प्रयोजनानुरुप बनवणं आवश्यक आहे. प्रयोजनाच्या अनुरुप काय आहे हे बघितलं तर शरीराचं पोषण, संरक्षण आणि समाजगती हेच समोर येतं. समाजगती काय आहे हे बघितलं तर अखंड समाजामध्ये भागीदारी करणे, सार्वभौम व्यवस्थेमध्ये भागीदारी करणे हेच कळते. ह्या प्रवर्तनांमध्ये मानव जगत राहिल्यानंतर समाधान समृद्धिपूर्वक सुख, शांती संपन्न होऊन जगू शकतो. ह्या विधिने अस्तित्वामध्ये जागृती प्रमाणित करणे हाच जीवनाचा उद्‌देश आहे. ह्यामध्ये सफल होण्याचा आधार, अद्‌भुत स्रोत हाच आहे की, प्रत्येक मानव व्यवस्थेमध्ये जगू इच्छितो. श्रमापर्यंत व्यवस्थेचं मूळ तत्त्व काय तर भय आणि प्रलोभन, जागृतिनंतर मूल्य, मूल्यांकन आणि उभयतृप्ती ह्यांना ओळखणे ह्यासाठीच समजदारी विकसित करण्याची आवश्यकता आहे.

# जीवनाचे स्वरुप

मन, वृत्ति, चित्त, बुद्धि, आत्मा ह्यांचे अविभाज्य स्वरुप म्हणजेच ‘जीवन’ आहे. हे कधी वेगळे होत नाहीत.

मनाची दोन कार्यरुपे आहेत – चयन (निवड) आणि आस्वादन. वृत्तिची दोन कार्यरुपे आहेत – विश्लेषण आणि तुलन. चित्ताची दोन कार्यरुपे आहेत–चित्रण आणि चिंतन, बुद्धिची दोन कार्यरुपे आहेत – ऋतम्भरा (संकल्प), बोध आणि आत्म्याची दोन कार्यरुपे आहेत – अनुभव, प्रमाणिकता.

ह्या दहा क्रियांच्या रुपात प्रत्येक ‘जीवन’ सतत कार्यरत आहे. ह्या दहा क्रिया करत भ्रम किंवा जागृतिरुपात ‘जीवन’ प्रमाणित होत असताना आढळतो. भ्रमित अवस्थेमध्ये संवेदनशीलतेने ‘जीवन’ अनुप्राणित राहतो आणि दहापैकी जीव चेतनावश साडेचार क्रियाच कार्यरत राहतात. बाकी क्रियांना समजण्याची वस्तू नसल्यामुळे जीवनामध्ये अंतर्विरोध कायमच असतो. ह्या साडेचार क्रिया अशा आहेत – चयन (निवड), आस्वादन, विश्लेषण, चित्रण आणि अर्धे तुलन. संवेदनशीलतेच्याच आधारावर चयन, आस्वादन होते. हात, पाय, नाक, कान, डोळे, जीभ ह्यांनाच चांगल्या वाटणाऱ्या वस्तुंना आपलेसे करुन न आवडणाऱ्या वस्तुंना सोडून देतो. संवेदनशीलतेच्याच अर्थाने तुलन नावाची क्रिया (जीवन) करतो – प्रिय, हित, लाभ रुपात. ह्याच अर्थी विश्लेषण करतो आणि ह्यासाठीच चित्रण क्रियासुद्धा संपादित करतो. एकूण काय तर इंद्रिय संवेदनांनाच ‘जीवन’ मानून, आपण जगण्यासाठी तत्पर झालेले आहोत, ह्यालाच म्हणतात, ‘भ्रमित जीवन’. ह्यामुळे अंतर्विरोध होतच राहतो. ‘हे ठीक आहे, हे चूक आहे, हे अधिक आहे, हे कमी आहे’, असे संकट मानवासमोर असतेच. आदिमानवासारखीच मानसिकता आहे, फक्त वस्तू

वाढल्या आहेत. मानवाच्या मानसिकतेसाठी अजून ज्या साडे पाच क्रिया आहेत त्या जागृत होण्याची आवश्यकता आहे आणि त्या समजदारीनेच जागृत होतात.

पाच संवेदनांना आणि चार विषयांना ओळखण्यासाठी आणि त्यांचा निर्वाह करण्यासाठी साडे चार क्रिया पुरेशा आहेत, त्यातच मानव पशुसारखा आणि राक्षसासारखा जगतोसुद्धा. मानवत्व रूपामध्ये जगणे केवळ साडेचार क्रियांच्या सहाय्याने शक्य नाही. त्याने संतुष्ट होत नाही. मूळ मुद्‌दा आहे, जीवनाच्या सगळया दहा क्रियांना व्यवहारामध्ये प्रमाणित करणे, हीच जागृती आहे. थोडासा भाग प्रमाणित करुन जागृती होत नाही. जसं शरीर स्वस्थ असेल तर पाच ज्ञानेंद्रिये आणि पाच कर्मेंद्रिये एकमेकांबरोबर अचूकपणे ताळमेळ ठेवून काम करतात. ह्यात जर हात काम करत नसेल, पाय काम करत नसेल तर आपण त्याला अपंगच म्हणू. त्याला स्वस्थ माणूस म्हणणार नाही.

जोपर्यंत जाणणे आणि मानणे ह्या क्रियांना आपण ओळखणे आणि निर्वाह करणे ह्या क्रियांबरोबर जोडत नाही तोपर्यंत जागृत होऊ नाही शकत. आतापर्यंत संवेदनांना ओळखणे आणि निर्वाह करणे ह्या क्रियांबरोबर साडेचार क्रियांना आपण सगळयांनी प्रमाणित केलेलं आहे. पुढच्या क्रिया व्यवहारामध्ये प्रमाणित होतात, तोच जागृतिचा आधार आहे. जाणणे आणि मानणे ह्या विधिनेच हे होईल. ओळखणे आणि निर्वाह करणे ह्या क्रमामध्ये मानवेतर सृष्टी नियमित राहते, नियमानुसार काम करते, ह्या विधिने व्यवस्था आहे.

संवेदनशीलतेने जगण्याची पराकाष्ठा जीवसृष्टिमध्येच पूर्ण होते. संवेदनशीलता हेच अंतिम लक्ष्य असले असते तर मानवाच्या असण्याची काही आवश्यकताच नव्हती. अस्तित्वामध्ये

कोणतीही गोष्ट प्रयोजनाशिवाय आहे, निष्प्रयोजन आहे, अशी अजिबात स्थिती नाही. संपूर्ण अस्तित्वामध्ये, संपूर्णतेमध्ये एक ताळमेळ, एकसूत्रता, संगीतमयता आहे, ह्या सगळयांनी युक्त व्यवस्थेचं स्वरुप आहे. प्रत्येक गती, प्रत्येक स्थिती, प्रत्येक अवस्था सार्थकतेच्या सूत्राने एकमेकांशी जोडलेली आहेच. सार्थकता काय आहे ? व्यवस्थेमध्ये आचरण असणे आणि समग्र व्यवस्थेमध्ये भागीदारी करणे. 'जीवन' जेव्हा जागृत होतो, तेव्हा अनुभव आणि प्रमाणिकतेच्या अनुसार आपला बोध आणि संकल्प असतो, त्यानुसारच चिंतन आणि चित्रण संपादित करायला सुरु करतो. त्याच आधारावर तुलन, विश्लेषण, चयन, आस्वादन होते. आता आपण संवेदनशीलतेलाच सर्वोच्च मूल्यवान मानून प्रत्येक विचार, प्रत्येक योजना बनवतोय, जागृतिमध्ये मूल्य आणि मूल्यांकनच होते. हेच जागृतिचे व्यवहारिक स्वरुप आहे. संवेदनशीलतेला आधार मानून आपण जगण्याच्या कलेला विकसित करण्याचे काम पूर्ण केले आहे. ह्या विधिने जगण्यासाठी मानवाला सोडून(सृष्टितील) बाकी सगळया वस्तू जगण्यासाठी आवश्यक आहेत, ज्यामध्ये जीवावस्था, प्राणावस्था, पदार्थावस्था आहेत. ह्या तिन्हींचा मानवाने कसा उपयोग केला हे सगळयांनाच माहिती आहे, ह्यात अधिकाधिक आपण कसे सफल झालो आहोत हे ही माहिती आहे. ह्या सफलतेसाठी कुणाला तरी विफल व्हावं लागेल असं आपण म्हणतो, ह्यानेच असंतुलन होते. आजपर्यंत आपण सुविधा संग्रह करण्याचे जे काम केले आहे, त्याने पृथ्वी त्रासून गेली आहे. पृथ्वीला वाचवणं शक्य आहे की नाही ह्यावर सुद्धा प्रश्नचिन्ह आहे, त्यामुळे पृथ्वीवर आपण जे काही अपराध करत आहोत त्यांना थांबवलंच पाहिजे आणि अपराधमुक्त विधी समजून घेतली पाहिजे. त्यासाठी आतापर्यंत विज्ञानाने जितके काही केले आहे किंवा कला आणि शिक्षेमध्ये ज्याचा प्रवेश झाला आहे त्याने अपराधमुक्ती होणे शक्य नाही. ह्यामध्ये बुडून जाऊ शकतो. ह्यामुळे पृथ्वीचा नाश होऊ शकतो, मानव एकमेकाला त्रास देऊ शकतो. आतापर्यंत आपण

सगळयांनी मोठया राज्यांना मिळून एक सभा बनवली आहे तिचे नाव संयुक्त राष्ट्र संघ. ह्या संघामध्ये खूप संमेलनं झाली, पण अजूनपर्यंत युद्धशक्तिचा अधिकार ह्या संघाकडे असला पाहिजे की राष्ट्रांकडे असला पाहिजे ह्यावर निर्णय होऊ शकलेला नाही. युद्ध व्हायला हवं की नको ? ह्याच प्रकारे शिक्षेसाठी सुद्धा प्रत्येक वर्षामध्ये चार वेळा समीक्षा होते. पुन्हा विचार, पुन्हा समीक्षा, पण मानवासाठी सुखद शिक्षा काय असली पाहिजे हे आजपर्यंत ठरलेलं नाही.

योग्य तेच करावं अशी प्रत्येक मानव संततीची इच्छा असते अशा वेद विचारांचं मी लहानपणापासून अध्ययन केलं आहे, न्याय मिळवण्याची आवश्यकता त्यांच्यामध्ये असते, (मुलं) सत्य बोलणारी असतात. मुलं जस- जशी मोठी होतात तसंतसं खोटं बोलायला लागतात कारण आपण वातावरणच असं बनवलं आहे की खोटं बोलल्याशिवाय राहवत नाही. व्यापारामध्येसुद्धा खोटं सामावलेलंच आहे. राज्य शासनामध्ये खोटं आहे, शिक्षेमध्ये सत्य उदय होत नाही. मग ह्या मार्गाने माणूस कुठे जाईल? त्यामुळे परिस्थितीने बाध्य होऊन मानव त्यानुसार आपली दिनचर्या आणि व्यवहार बनवतो. ह्या तऱ्हेने मानव कुठल्याशा लक्ष्यापर्यंत पोहोचलेला नाही आणि पोहोचणार नाही. सगळया मोठमोठया संस्थांमध्ये, राज्य संस्थानांमध्ये मोठमोठे प्रोजेक्टस् आहेत, पण आपण काही संकटातून सुटलेलो नाही.

ह्या संकटातून बाहेर पडायची आवश्यकता तर आहेच पण हे फक्त तेव्हाच होऊ शकेल, जेव्हा मानव समजदार होईल आणि हे जेव्हा केव्हा होईल तेव्हा एकाच विधिने जगावे लागेल, ते आहे मानवीयतापूर्ण आचरण. मूल्य आणि मूल्यांकन ह्यांचा संबंध सह-अस्तित्व स्वाभाविक विधिशी आहे, ह्यासाठी मला, आपल्याला कोणतीही प्रयोगशाळा बनवायची नाही किंवा युद्ध करायचे नाही,

संबंधासाठी प्रयोजनाला अखंड समाज व्यवस्थेच्या अर्थाने जाणणे, मानणे आवश्यक आहे, त्यानेच ओळखणे निर्वाह करणे होते. प्रयोजनालाच जाणणे मानणे होते. प्रयोजनाला जाणल्यावाचून, मानण्यावाचून ओळखणे आणि निर्वाह करणे ह्या क्रियांमध्ये दिशाभूलच होते. उदा. धरतीबरोबरच्या संबंधामध्ये प्रयोजनाला जाणण्यामध्ये चूक झाली. पर्यावरणाच्या प्रयोजनाला जाणण्यामध्ये चुकलो, त्यामुळे धरती आणि पर्यावरणाच्या समग्रतेला आपण समजू नाही शकलो आणि मानव जातीने धरतीचे दिवाळे वाजवले. जर ह्या धरतीवर मानव परंपरा रहायची असेल तर त्यासाठी आता कोणती पावलं उचलावी लागतील ह्या गोष्टीला बारकाईने समजून घेण्याची आवश्यकता आहे, त्याचसाठी हा प्रस्ताव आहे.

भ्रमित असल्यामुळे संवेदनशीलतेमध्ये मानव जगला, संज्ञानीयतेने जगणे झाले नाही त्यामुळे मानव तृप्त झाला नाही. जे जे करायचं ते ते अतृप्त मानव करतोच. अतृप्तिमधून तृप्तिकडे जाण्याचेच काम आहे, ज्याला मी दुसऱ्या भाषेत 'जागृती' म्हणतो. समजदारीने तृप्ती होईल हाच तृप्तिचा नित्य स्रोत आहे. 'जीवन' कधी मरत नाही, 'जीवन' समजदार झालं तर तृप्ती होते. ती तृप्ती निरंतर राहतेच , ह्या सगळया गोष्टी मी पाहिल्या आहेत.

ह्याच आधारावर हा प्रस्ताव आहे की समजदारी हा सगळया मानवांचा अधिकार आहे. मला असं वाटतं की, प्रत्येक व्यक्ती ह्याचा शोध घेऊ शकते. मानव जात, आपल्या भावी क्षणांची निर्माती, समाधानपूर्ण विधिने वैभवित होऊ शकते.

प्राणकोशिका जेव्हा मातीत मिसळतात, तेव्हा खत तयार होतं. आहाराची, आहारासाठी ही व्यवस्था प्रकृती स्वाभाविक आहे, प्राकृतिक स्वरुपात खत हीच वस्तू आहे. प्राणकोशिकांनी तयार झालेल्या रचना पुन्हा विरचित होऊन मातीमध्ये मिसळतात, त्यांना

खत असे म्हणतात. धरतीमध्ये (मातीमध्ये) जितका कस असायला हवा आहे, तो स्थापित झाल्यानंतरच ह्या धरतीवर मानवाला अवतरित होण्याची संधी मिळाली आहे. मानव जेव्हापासून जन्मला, जंगलावर तुटून पडला. जंगलावर तुटून पडता पडता विज्ञान युग आल्यानंतर खनिजांवर तुटून पडला. खनिजं आणि वनस्पतींच्या गुणोत्तरापेक्षा अधिक जेव्हा शोषण होऊ लागलं, तेव्हा मातीतील कस तयार होण्याचा जो स्रोत होता तो कमी झाला. आता शास्त्रज्ञांना वाटतं की रासायनिक खत तयार करुन आम्ही जगाचं कल्याण करत आहोत. ह्याविषयी मला असं वाटतं की, प्राकृतिक पद्धतीने खत तयार होण्याची जी व्यवस्था आहे, तिनेच ह्या धरतीचा सुपीकपणा वाचू शकेल. पृथ्वीच्या पृष्ठभागावर ज्या गोष्टींची आवश्यकता नाही त्यांना नद्या समुद्रामध्ये घेऊन जातात. तर मग समतोल कसा होईल ? पृथ्वीच्या पृष्ठभागावर झाडे, वेली, जेव्हा दाट रुपात असतील तेव्हाच ह्या गोष्टींचा समतोल राखला जाईल. आता आपण काय करत आहोत ? एक प्रश्न सोडवण्यासाठी आणखी एक दुसरा प्रश्न उभा करत आहोत. ह्या पद्धतीने प्रश्नांनी प्रश्न झाकला जात नाही. कोणत्याही एका छोट्या समस्येला कितीही मोठया समस्येने झाकले तरी समस्या झाकली जात नाही. ही काही तक्रार किंवा निंदा नाही. यथास्थिती व आवश्यकतेचे वर्णन आहे. घडलेल्या घटनांचे आकलन करुन पुनर्विचार करण्याचा हा प्रस्ताव आहे, अजून कोणतेही कारण नाही. एकूण ह्या प्रस्तावामध्ये 'जीवनाच्या' दहा क्रियांना परंपरेमध्ये प्रमाणित करायचं आहे. दहा क्रियांसाठी समजदारीला चेतना विकास मूल्य शिक्षेने प्रमाणित करायचं आहे. जाणणे, मानणे, ओळखणे आणि निर्वाह करणे आहे. जाणण्या-मानण्याचा तृप्ति बिंदू, जागृती व समाधान, समृद्धी, अभय, सह-अस्तित्व स्वाभाविक प्रमाण आहे. हेच अनुभव स्वाभाविक प्रमाण आहे, म्हणूनच अनुभवमूलक विधिने प्रत्येक मानव आपल्याला सार्थक बनवू शकतो, ह्या प्रस्तावाचा एक उपकार असाही आहे की, ह्या

प्रस्तावामध्ये पुरोहित वादाला काहीही स्थान नाही आणि शक्ती केंद्रित शासनाला.''मीच सगळयांना तारुन नेईन'' ह्या गोष्टीपासून सुद्धा मुक्त आहे. प्रत्येक मानव आपल्या समजदारीने भ्रममुक्त होऊ शकतो. एक व्यक्ती तरुन गेली तर सगळं जग तरेल ही गोष्ट पुरेशी नाही हे पाहिलं आहे. ह्या प्रस्तावानुसार जो समजेल तो तरुन जाईल. सगळया सद्‌ग्रंथांमध्ये आतापर्यंत आश्वासने तर खूप दिलेली आहेत, पण धरतीवर प्रमाण रुपात एकही माणूस उभा राहिला नाही. मग मी काय करणार? परंपरेमध्ये जी गोष्ट येत नाही तिला कुठेही स्थान नाही. एखाद्या माणसाने आधी खूप काही मिळवलं किंवा खूप काही गमावलं होतं ह्याला आपण कसे सत्यापित करणार? पण जी सुटायची पद्धत असेल ती परंपरेत येईलच. ह्याला असे पाहू शकतो की आतापर्यंत मानवाने खूपशा चुका व अपराध केले, त्याची कोणतीही परंपरा होत नाही, परंपरा जेव्हा असते ती समजदारीने सफल होणे स्वाभाविक आहे, मानवाने मानवीयतापूर्वक जगण्याची कला हीच परंपरा असते. समजदारीची परंपरा अध्ययन विधिने होऊ शकते. जगण्याची कला परिवार विधिने, समाज विधिने, व्यवस्था विधिने होऊ शकते. अशाच पद्धतीने माझ्या स्वतःच्या जगण्याची कलासुद्धा मी समजदारीच्या आधारावरच प्राप्त केली. समजदारीने जी जगण्याची कला येते ती निश्चितच समाधान व व्यवस्थेच्या रूपामध्ये जगणे ही आहे.

न्याय प्रमाणित झाल्याशिवाय मानव सामाजिक होऊ शकत नाही आणि न्यायाशिवाय मानवाने समुदाय बनवले तर ते वाद - विवादातून कधीच मुक्त होऊ शकत नाहीत. अशा समुदायांमध्ये द्रोह, विद्रोह, संघर्ष, युद्ध ह्या गोष्टी होतातच. शोषण हे होतेच आणि वाद-विवाद, द्रोह-विद्रोह, संघर्ष, शोषण हे असताना मानव सामाजिक झाला हे कसं काय मान्य करणार? समुदायांमधला संघर्ष योग्य आहे असं मानलं तर मग प्रत्येक मानवाने युद्ध करावं, मरावं, मारावं असं पण होऊ शकतं, ह्यासाठी मग सूट असायला हवी.

बांधून का ठेवलं आहे? ह्या मुद्यावर पुनर्विचाराची आवश्यकता आहे.ह्या सगळया गोष्टी जर नीटपणे आपण हृदयंगम केल्या तेव्हा लक्षात येतं की आतापर्यंत आपण जे काही केलं आहे, त्यामुळे आपण तरुन नाही जाऊ शकलो, म्हणून आपण विचार करण्यासाठी तयार झालो. मानव विचार करतोच, हा त्याचा नैसर्गिक स्वभाव आहे.

प्रत्येक मानव विचार करु शकतो. शोध करु शकतो. आपल्या शोधातून स्वतः तृप्त होणं सुद्धा आवश्यक आहे, दुसऱ्यांसाठी तृप्तिचा स्रोत बनणे सुद्धा आवश्यक आहे. इथून सुरुवात करण्यासाठी काय करावं? तर पहिला मुद्दा आहे, समजदारी स्वाभाविक शिक्षा-संस्कार विधिने सर्वसुलभ व्हावे. समजदारीबरोबर जगण्याच्या कलेचा अंगीकार करावा. जगण्याच्या कलेमध्ये पृथ्वीबरोबर व हवा- पाण्याबरोबर कसे जगावे, वनस्पतींबरोबर कसे जगावे? पशुंबरोबर कसे जगावे आणि मानवाबरोबर कसे जगावे? ह्यातल्या कुणाही एकाला सोडू शकत नाही. सगळयांबरोबर जगायचं तर आहेच. प्रत्येक व्यक्ती अनुभव करु शकते, मूल्यांकन करु शकते, असा दावा प्रत्येक मानव करतोच .प्रत्येक मानवामध्ये दावा करण्याची ही प्रवृत्ती स्वाभाविक आहे, थोपवलेले कोणी स्वीकारत नाही, प्रत्येकात ही मुळातच आहे, स्वयंस्फूर्त आहे, त्यामुळे उत्साह आहे. प्रत्येक मानवाची ही आवश्यकता आहे. इतका सहज स्रोत असताना सुद्धा आपण ही अपेक्षा तरी कशी केली की मी दुसऱ्यांना तारणार? ही एक आश्चर्यजनक घटना आहे आणि ह्यावर आपल्या सगळयांची आस्था आहे, आता असा विचार करायचा, आश्वासनावर आस्था ठेवायची की प्रमाणाच्या आधारावर विश्वास ठेवायचा. सुरुवातीपासूनच माझी अशी प्रवृत्ती झाली की प्रमाणांच्या आधारावर मी विश्वास ठेवण्याचा विचार केला. सहजच माझा उत्साह वाढला. प्रमाणांना शोधण्याच्या आधारावरच हा सगळा

पुनर्विचार करण्यासाठी मी प्रवृत्त झालो, त्याचा परिणाम म्हणून जे काही झाले ते मानवासमोर ठेवण्यासाठी मी प्रवृत्त आहे. जसे सातशे कोटी माणसांसमोरचा रस्ता बंद झाला आहे तसेच माझ्याबरोबर सुद्धा झाले असेल. तुम्ही अंदाज करु शकत असाल.

सगळया मानवांसारख्या स्थितिमध्येच मी सुद्धा होतो. ह्या जगातले प्रचलित शिक्षा - संस्कार, कर्मकांड - संस्कार ह्या सगळया जंगलामधून मी ही गेलेलो आहे. ह्यातून जाऊन सुद्धा मी ना मेकॉले शिक्षा स्वीकारु शकलो ना परंपरागत आदर्शवादी संस्कार. माझी आस्था ह्यामध्ये स्थिर होऊ शकली नाही. संपूर्ण उद्‌देशांच्या दिशेने धाव घेण्याचा हा आधार व कारण झाले. शिक्षा परंपरेमध्ये, संस्कार परंपरेमध्ये माझी आस्था झाली नाही म्हणून मी कदाचित रिक्त झालो आणि हाच आपल्या पद्धतीने धावण्याचा आधार झाला. दोन घटना तर घडल्या होत्या. ह्यापैकी एक महत्त्वाची घटना होती –'जीवनाला' समजणे. जीवनामध्येच समजदारी सामावलेली आहे आणि समजदारीपूर्ण विधी माझ्या हाताला लागली. मान्यता आणि आस्था ह्यांच्या आधारावर आपण साडे चार क्रियांमध्ये जगतो. आस्था म्हणजे काय, न जाणताच मानणे. जाणून घेतल्यानंतर ज्याला मानतो त्याला विश्वास म्हणतात. विश्वासाने जगून दहा क्रिया प्रमाणित होतात. मी दहाही क्रियांना प्रमाणित करतो, तुम्ही सुद्धा करु शकता. सह-अस्तित्वाला प्रमाणित करायचंच आहे. ह्याच क्रमामध्ये हे अणू, रेणू एकमेकांना ओळखून व्यवस्थेमध्ये असतात. ग्रह-गोल, वनस्पती, पदार्थ हे सगळे सह-अस्तित्वाला प्रमाणित करत व्यवस्थेमध्ये आहेत. सह - अस्तित्व प्रमाणित करण्याच्या क्रमामध्येच आणखी शुद्ध रुप हेच आहे की सगळी एकके स्वतःमध्ये ऊर्जा संपन्न आहेत. ऊर्जा संपन्न राहण्याची अस्तित्वाची ही अनुपम अभिव्यक्ती आहे. सगळे अणुअंश (परमाणुअंश), सगळे अणू (परमाणु), सगळे रेणू (अणु) स्वतःमध्ये व्यवस्थेकडे उन्मुख आहेत. मानवाला प्रेरित करण्यासाठी हाच मुख्य मुद्‌दा आहे, ह्यावर माझं अनुमान असं आहे

की प्रत्येक ज्ञानी, विज्ञानी, अज्ञानी मानवाला सह-अस्तित्ववादी मानसिकतेची आवश्यकता आहे. ही मानसिकताच आपल्याला मानव बनवू शकेल. मानवा– पेक्षा कमी स्तरावर आपला ऐश्वर्य उदय अजिबात होणार नाही. आपल्यासमोर असलेली जंगले, पर्वत, खनिजे, जीव ह्यांनी  सह-अस्तित्वाच्या आधारावरच आपल्या वैभवाला प्रकाशित केलेलं आहे. सह-अस्तित्व विधिने समृद्ध आहेत.  सह-अस्तित्व नसलं असतं तर कुणालाही संरक्षण मिळालं नसतं. सत्तेमध्ये (व्यापक किंवा शून्यामध्ये) एक एक वस्तू किंवा एकक संरक्षित, नियंत्रित आणि ऊर्जा संपन्न आहे, जे रेणू (अणु) व प्राणकोशिका रुपात कार्यरत आहेत, त्यांची सीमा तेवढीच आहे. ह्यामध्ये सुद्धा  सह-अस्तित्व वैभवित आहे. एक कोशिका दुसऱ्या कोशिकेबरोबर सह-अस्तित्वात असल्यामुळे बहुकोशिका विधिने  निश्चित रचना करु शकली आहे. कोशिकेमध्ये असलेल्या प्राणसूत्रामध्ये ही रचना विधी सामावलेली असते. ह्याचं नाव आहे रचना विधी. ह्यात निरंतर शोध चालू राहतो. त्याचा पुरावा म्हणून अनेक प्रकारच्या रचना आपल्या समोर आहेत, म्हणूनच आपण आश्वस्त होतो, प्राणसूत्रामध्ये आणि अणू (परमाणु) अंशांमध्येही शोध कार्यक्रम आहे.

मानवाच्या शोध कार्याचा जो स्रोत आहे तो म्हणजे कल्पनाशीलता आणि  कर्मस्वतंत्रता. त्यानंतर विचार शक्ती, इच्छा शक्ती, संकल्प, अनुभव प्रमाण शक्ती. ह्या सगळया शक्ती स्वतःमध्येच अनुसंधान, शोध करण्यासाठी तत्पर राहतात. ह्या तत्परतेनेच दहा क्रियांबरोबर जगण्याची क्रिया, जगण्याचे वैभव प्रमाणित होऊ शकते. ह्या दहा क्रियांमध्ये मुख्य मुद्दा आहे, अनुभव होणे आणि अनुभवमूलक विधिने जगू शकणे. अनुभवमूलक विधिने जगण्यासाठी स्वाभाविक स्रोत आहेच. अनुभव होण्याची इच्छा 'जीवनामध्ये' आहेच. तो समजदार होऊ इच्छितोच. स्वतःला समजदार, अनुभवशील, न्याय जाणणारा, चिंतनशील मानतोच.

अस्तित्वामध्ये सगळीकडे संबंध पसरलेला असतो. त्यांना जाणणे, मानणे आणि निर्वाह करणे, त्याने उभयतृप्ति होणे हेच न्यायी होण्याचे प्रमाण आहे. समजदार बनायचं आहे किंवा नाही ह्याचा निर्णय करायला मानव स्वतंत्र आहे. जर समजदार बनायचं आहे तर, सह - अस्तित्वामध्ये समजदार बनण्याची परिस्थिती निकट (समीचीन) आहे. समजदार बनण्याची सगळी सामग्री आहे आणि समजदार होऊ इच्छित नसेल, त्यासाठी सुद्धा सामग्री आहे, पण दोन्ही परिणाम भिन्न आहेत. समजदारी नसेल तर शुभ, सुख घडणार नाही. माझ्या अनुभवानुसार कुणाशी बांधले जाऊन, कुणावर ओझं होऊन, कुणाशी भांडून माझी जगण्याची इच्छा झाली नाही. तसेच कोणत्याही वस्तुबरोबर बांधले जाऊन, कुणावर ओझं होऊन, कुणाशी भांडून दुसरा कुणीही जगू इच्छित नाही अणि कुणीही अडकून जगू इच्छित नाही. अशा प्रकारे प्रत्येक मानव कोणत्या न कोणत्या पद्धतीने समजदारच होऊ इच्छितो. न्याय समाधानामध्ये एकसूत्रतेने जगू इच्छितो.

सगळयांशी संबंध आहेतच. भ्रमामुळे त्यांना आपण ओळखत नाही हाच मूळ प्रश्न आहे. ज्या क्षणी मी संबंधांना जाणायला, ओळखायला सुरुवात केली त्या क्षणापासून माझामध्ये 'जीवन' स्वाभाविक मूल्यांची निष्पत्ती व्हायला सुरुवात होते. जसं आपण संबंध ओळखायला सुरु करु, मूल्यं आपोआप वहायला लागतात, त्यामुळे त्यांचा निर्वाह होतो. मूल्यांकन झाल्यानंतर उभयतृप्ती होते. अशा प्रकारे न्याय प्रमाणित होतो. संबंधांना ओळखण्याची स्थिती, ओळखण्याची विधी प्रयोजनाच्या आधारावर होऊ शकते. 'पोषणाच्या' अर्थाने आईला ओळखतात. 'संरक्षणाचा' स्रोत वडिलांना म्हणतात. प्रमाणाचा स्रोत हा 'गुरु' आणि जिज्ञासेच्या स्रोताला 'शिष्य' म्हणतात. प्रचलित परंपरा तर असं सांगते की आपल्याला यंत्रासारखे रहायचे आहे, यांत्रिकतेमध्ये प्रवीण व्हायचं आहे, पण मानव एक यंत्र आहे का? ह्याचं उत्तर

देणारा कोणी माय बाप आहे? मी म्हणतो, मानव यंत्र नाही. सगळया यंत्रांची निर्मिती मानवानेच केली आहे. आतापर्यंत जितक्या यंत्रांची निर्मिती झालेली आहे, ती सगळी यंत्रे मानवानेच बनवलेली आहेत, म्हणून यंत्रे माणसापर्यंत पोहोचू शकत नाहीत. यंत्रांचा दर्जा मानवापेक्षा कमीच आहे, म्हणून यंत्र मानवाचे अध्ययन करु शकत नाही. दुसरे असे, सगळी यंत्रे जड प्रकृतिपासून बनतात. आतापर्यंत बनवलेली सगळी यंत्रे पदार्थावस्थेतील वस्तुपासूनच बनलेली आहेत. प्राणावस्थेतील वस्तुपासून एकही यंत्र बनवू शकलेले नाहीत ही लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे. मानव तर खूप दूरची गोष्ट आहे. अजूनपर्यंत एकही यंत्र प्राणकोशिकांपासून बनवू शकलेले नाहीत आणि शेखी मिरवतात की मानव एक यंत्र आहे. मानव परंपरेसाठी हे कितपत योग्य आहे? अभ्युदयाचा अर्थ कसा पूर्ण करणार ? आतापर्यंत ही गोष्ट खूप खोलवर रुजलेली आहे की मानव एक यंत्र आहे, भोगण्यासाठी वस्तू आहे. आतापर्यंत असाच विचार केला गेला, पण असं नाही. कुणीही मानव जेव्हा आपल्या मुलांबरोबर जगतो, तेव्हा मी यंत्रवत नाही असंच त्याला वाटतं.

संचेतनेसहित मला मानव समजलाय. संज्ञानशीलता आणि संवेदनशीलतेचे संयुक्त रुप म्हणजेच संचेतना होय. संवेदनांना ओळखत नाही तेव्हा यंत्र होऊन जातो. यांत्रिकतेमध्ये मला आतापर्यंत तर अजिबात तृप्ती मिळालेली नाही. आपण यंत्रासारखे काम करावे आणि आपल्याला तृप्ती मिळावी असा मार्ग काही मला मिळालेला नाही. असा कोणी गुरु असेल तर मी त्यांना आमंत्रित करतो. वंशानुषंगीय विधिने समजावणाऱ्या लोकांचं म्हणणं मी ऐकलं आहे, ते पण मला समजावू शकले नाहीत. ह्याच प्रकारे भौतिकवादी तसेच सापेक्षवादी सिद्धांतसुद्धा मानवाला परिभाषित करु शकले नाहीत.जर ह्या तीन सिद्धांतांनी मानवाचे विश्लेषण होऊ शकले तर त्याचा स्वीकार करावा नाही तर मानवाला

मानवाच्या अर्थाने ओळखावे. मानवाला मानव अर्थाने ओळखण्यासाठी हा प्रस्ताव प्रस्तुत आहे.

ह्याच्या आधी आदर्शवादी विधिविषयी बोलणे झाले, ज्यामध्ये ईश्वराला तारुन नेणाऱ्या रुपात प्रस्तुत केले गेलेले आहे. ईश्वराला मी पाहिलेले आहे, त्याच्याजवळ तारुन नेता येईल असा कोणताही कारखाना नाही. ईश्वराला कोणत्या रुपात पाहिलं आहे? ईश्वराला व्यापक रुपात पाहिलं आहे. साम्य ऊर्जेच्या रुपात पाहिलं आहे, ज्याने प्रत्येक एकक ऊर्जित आहे. व्यापकामध्ये प्रत्येक एकक सह-अस्तित्वामध्ये आहे ह्याला पाहिलेलं आहे. ईश्वरामध्ये अजून काय पाहणं शिल्लक आहे? जर काही शिल्लक असेल तर तुम्ही पहा आणि संपूर्ण जगाला दाखवून द्या. अनुसंधान करण्यास तुम्ही स्वतंत्र आहात. मी जे पाहिलं, समजलं ते तुमच्यासमोर प्रस्तुत करतोच आहे. ना संवेदनांनी ना यांत्रिक पद्धतीने मी पूर्ण झालो. संवेदनशील विधिने इंद्रिय सापेक्षतेला आपण केन्द्रस्थानी आणतो, त्यामुळे इंद्रिय सापेक्ष जगण्याची माझी योग्यता व अपेक्षा आणि माझ्या भावाची योग्यता व अपेक्षा ह्यात अंतर आहे. ह्या तऱ्हेने मानवाला विविधतेमध्ये विभागण्याची आवश्यकता होतेच, त्यामुळे संवेदनशील पद्धतीने माणूस व्यक्तिवादी होतोच. दुसरी भोगवादी पद्धत, तिने मानव व्यक्तिवादी होतोच, तिचा मी अनुभव घेतलेला आहेच. आपल्या पूर्वजांनी सांगितलेली तिसरी पद्धत, भक्तिवादी - विरक्तिवादी, ह्यामध्ये सुद्धा व्यक्तिवादिता संपत नाही, म्हणून मानवाने आतापर्यंत जितके घोर परिश्रम घेतले आहेत , अथक प्रयत्न केलेले आहेत, प्रचंड आशावादी होऊन भरभरुन प्रयत्न केलेले आहेत, सगळे प्रयत्न निष्फळ का झाले हे पाहिले तर त्याच्या मुळाशी व्यक्तिवादी असणे हेच सिद्ध झाले आहे. व्यक्तिवाद हा सहअस्तित्वाचा विरोधी आहे. मानव मोडून पडण्याचा हा आधार झाला. व्यक्तिला जगायचं कुठं आहे? सह - अस्तित्वामध्ये. सह-अस्तित्वामध्ये जगण्याचा सरळ उपाय आहे– मानवाबरोबर

सह-अस्तित्वाला जाणावे, मानावे, ओळखावे. ह्याला ओळखल्यानंतरच तो व्यवस्थेमध्ये जगू शकतो. समग्र व्यवस्थेमध्ये भागीदारी करु शकतो. ह्याचे पुढे अध्ययन करु. ह्याच प्रकारे आपण जीव, वनस्पती, जगताबरोबर सुद्धा सहअस्तित्वामध्ये जगतो. वनस्पतींकडून आपण काही घेतो तर वनस्पतींना देण्यासाठी तरी काही असावे. काहीही न देता जर केवळ घेऊ इच्छितो तर त्याचं नाव आहे शेखचिल्ली. ह्या शेखचिल्ली पद्धतीने दुःखी होण्याशिवाय काही होऊ शकत नाही. दुःखामध्ये अंत होणे हाच ह्याचा शेवटचा भाग होत चाललेला आहे.

वर्तमानात ज्या घटना घडत आहेत, त्या ह्याच गोष्टीला घोषित करत आहेत. सह-अस्तित्वामध्ये जगण्यासाठी जंगले, झाडं, वेली आणि पदार्थ अवस्थेबरोबर आपण सह-अस्तित्व निश्चित करणे आवश्यक आहे. जर ह्यांच्या - बरोबर आपल्या सह-अस्तित्वाला आपण निश्चित करु शकत नसू, तर आपण ज्ञानी नाही, विज्ञानी नाही, विवेकी नाही, म्हणजेच आपलं ज्ञान पूर्ण नाही, विज्ञान पूर्ण नाही, विवेक पूर्ण नाही. मानव झाडं वेलींना सोडून कुठे जगणार? पृथ्वी, डोंगर खनिजांना सोडून, जीव जगताला सोडून कुठे जगणार? ह्या सगळयांबरोबर आपल्याला जगायचंच आहे, ही सगळी आपल्याबरोबर राहणारी द्रव्ये आहेत, संपदा आहे, ऐश्वर्य आहे. आपल्याला ह्यांच्याबरोबर रहायचं आहे, त्यांनाही रहायचं आहे. ह्या निश्चयामध्ये मानव हाच मुख्य मुद्दा आहे. ह्या सगळयांमध्ये मानवच भ्रमित होऊन, दुःखी होऊन जगलेला आहे. आता बदलण्याची आवश्यकता आहे. जागृत होण्याची आवश्यकता आहे. सगळयांबरोबर सह-अस्तित्व ओळखण्याची आवश्यकता आहे. सह-अस्तित्वाला ओळखायच्या विधिमध्ये मला असं समजलं की सगळया गोष्टी सत्तेमध्येच आहेत. ही सह-अस्तित्वाची पहिली साक्ष आहे. पदार्थावस्थेमधूनच क्रमाने प्राणावस्था उद्गमित, प्रभावित झालेली आहे आणि निरंतर

वैभवात आहे, प्राणावस्था आपल्यामध्येच व्यवस्था रुपात प्रभावित आहे, प्रमाणित आहे, वैभवात आहे. जीवावस्थासुद्धा आपल्या त्व सहित व्यवस्थेमध्ये प्रमाणित आहे. मानव आपल्या 'त्व'ला कसा समजेल ? 'स्व' ला कसा समजेल? 'स्व' आणि 'त्व' सुद्धा कसे राहतील हा मुख्य मुद्दा आहे .

जीवन विद्येने 'स्व' आणि 'त्व' समजतात. जीवनाला मी 'स्व' रुपात ओळखतो. तुम्हीसुद्धा ओळखू शकता. शरीराला 'स्व' रुपात ओळखेपर्यंत भ्रमित राहतो. जीवनाला ज्या क्षणी 'स्व' रुपात ओळखलं, त्या क्षणापासून मी व्यवस्थेमध्ये जगतो. तुम्हीसुद्धा तसेच जगू शकाल. त्याच्याआधी व्यवस्था होणार नाही. किती प्रकृती स्वाभाविक, अस्तित्व स्वाभाविक, परिपूर्ण प्रक्रिया आहे. समजणारी वस्तू सुद्धा 'जीवन' आहे, जो समजेल तो सुद्धा 'जीवन' आहे. आदर्शवादी लोकांच्या म्हणण्यानुसार दृश्य, दर्शन आणि द्रष्टा तिन्ही जेव्हा एक होतात तेव्हाच मुक्ती मिळते. त्यांच्या म्हणण्यानुसार ईश्वर हेच दृश्य आहे, ईश्वर हाच बघणारासुद्धा आहे, ईश्वर हेच दर्शन आहे. ह्याच आधारावर बरेचसे वाङमय रचले गेले, त्यानंतर सुद्धा ईश्वर कसा आहे? कुठे आहे? का? कशासाठी आहे हे समजलेले नाही, तरीसुद्धा ईश्वर आधारित गोष्टी मानव ऐकतो, त्याला चांगलं वाटतं. चांगलं वाटणं आणि चांगलं असणं ह्यामधील अंतर आहे तसेच आहे. ही गोष्ट मला समजली. ह्यानंतर मानवाला यंत्र म्हणू लागले, ते पण होऊ शकले नाही, तरीही सांगतच राहिले. ईश्वराला जसं सांगू नाही शकले तरीसुद्धा त्याच्याबद्दल सांगतच राहिले. अशाप्रकारे आपण अडकून बसलो आहोत. ह्याला  सोडून काही विचारच करु शकत नाही. ह्यातून सुटायचं कसं? 'जीवन' नित्य आहे. 'जीवनासाठी' शरीर ही एक वारंवार घडणारी घटना आहे. गर्भाशयात शरीर रचना होते. अस्तित्वामध्ये स्वाभाविक पद्धतीने अणू विकसित होऊन 'जीवन' पदामध्ये येतो. शरीर वारंवार रचित आणि विरचित होते.

प्राणावस्थेची एक सीमा आहे, त्यानंतर ते विरचित होते. शरीरसुद्धा प्राणकोशिकांनी बनलेले एक एकक आहे. शरीर रचनेमध्ये जितका समृद्ध मेधस (मेंदू) असू शकतो तो मानव शरीरामध्ये आहे. ह्या आधारावर मी ही गोष्ट सत्यापित करतो आहे की संपूर्ण अस्तित्वाबद्दल मानव दुसऱ्याला संप्रेषित करु शकतो. ह्यापेक्षा अधिक मेधसचे काहीच प्रयोजन नाही. ह्या आधारावर मानव शरीर रचना (प्राणसूत्र रचना विधिच्या आधारावर अनुसंधान होत बनलेली) श्रेष्ठतम झालेली आहे. अजून कुठली गोष्ट राहिलेली असेल ती सुद्धा पुढे पूर्ण होईल, मग शरीर यात्रेदरम्यान आपल्याला काय करायचं आहे? 'जीवन' जागृतिला प्रमाणित करायचं आहे. ह्या क्रमाने मी जेव्हा सुरुवात केली, संवेदना लपण्याचे काम झाले नाही, ना वैज्ञानिक पद्धतीने, ना आदर्शवादी पद्धतीने. संवेदनांच्या विरोधात खूप तप करायला सांगितले आहे. ह्या पृथ्वीवर खूप तपस्वी झाले पण ह्या तपस्यांचा परिणाम म्हणून एक निश्चित समजदारी, ज्यासाठी मानव व्याकुळ झाला आहे ती व्यवहारामध्ये, परंपरेमध्ये आली नाही. तपस्व्यांनी काय गमावलं, काय कमावलं हे तर तेच सत्यापित करणार. सामान्य लोकांनी अशा तपस्व्यांकडून सिद्धि - चमत्कारांची अपेक्षा केली. फिदा होऊन त्यांच्यामागे फिरत राहिले. मी सांगतोय ना की अस्तित्वामध्ये सिद्धि नाही ना चमत्कार आहे, अस्तित्वामध्ये निश्चित व्यवस्था आहे, निश्चित परिणाम आहे, निश्चित निरंतर प्राप्ती आहे, मुक्कामाची निश्चित जागा आहे, त्याची निरंतरता आहे, हे मी पाहिलं आहे, समजलं आहे. अशा निश्चित मुक्कामाच्या जागेचे तुम्ही - आम्ही उमेदवार आहोत. निश्चित विधिनेच ते निश्चित लक्ष्य मिळणार आहे. मानवाचे अध्ययन सोडून, झुरळाला विकसित प्राणी म्हणून, रासायनिक खतं बनवून, कीटक नाशके बनवून आपल्याला मानवाची मुक्कामाची जागा मिळणार नाही. मानवाच्या मानसिकतेला धनरुपात, शोषण रुपात उपयोग करुन सुद्धा आपले अंतिम लक्ष्य मिळवू शकणार नाही.

ह्यालाच ''इंटलेक्चुअल प्रॉपर्टी राइट'' असे नाव दिलेले आहे. जगातल्या सर्वोच्च संस्था आणि न्यायालयेसुद्धा ह्याला स्वीकारु इच्छितात. 'जीवनाच्या' ज्या अक्षय शक्ती आहेत त्यांना कुठे सामील करणार ? भोगद्रव्यरुपात त्यांचा कसा उपयोग करावा ह्याचं उत्तर कोणी देणार? 'जीवनाला' समजून असा प्रस्ताव पुढे ठेवला आहे काय ? हे कितपत मानव जातीसाठी उपकारी आहे? माझा अनुभव असा आहे की मानवाने 'जीवन' शक्तिचा कितीही उपयोग केला तरी त्या कमी होत नाहीत. त्यांना तुम्ही अनुभवा. कित्येक कोटी अनुभवू शकतात. 'जीवन' शक्तिंचा जितका उपयोग करु, त्या अजूनच ताज्या आणि प्रखर होतात. जितका आज उपयोग केला उद्या त्यापेक्षा अधिक प्रखर होतात. ह्या विधिने जीवन शक्तिंचा कितीही उपयोग केला तरी त्या संपत नाहीत. त्यांना आपण संख्येमध्ये बांधू नाही शकत. बांधायला गेलं तर बांधणाराच विकृत होऊन जाईल. त्यामुळे बुद्धिवादाकडूनसुद्धा आपण गहाण टाकले जाऊ शकतो, दास बनतो, शोषणाचा आधार बनवतो ह्याचा हा नमुना आहे. मी समजतो हे मानव विरोधी, सहअस्तित्व विरोधी आहे, बुद्धिला शोषणाचा आधार बनवून, द्रोह – विद्रोहाचा आधार बनवून, आमच्या बुद्धिसाठी तुम्हाला टॅक्स द्यायचा आहे हे सांगून आपण समाज बनवण्याच्या, घडवण्याच्या घोषणा करतो. हे खरे होऊ शकेल काय? हा विचार करण्याचा मुद्दा आहे. मला वाटतं ही शुद्ध फसवेगिरी आहे. बुद्धिला मर्यादित करु शकत नाही आणि सगळया मानवांची बुद्धी अक्षय आहे, त्यामुळे तिला सीमेमध्ये, पुस्तकामध्ये बांधू शकत नाही. मी जितकं वाङमय लिहिलेलं आहे, त्याहून मी फार मोठा आहे, हा अनुभव मी स्वतः घेतलेला आहे. जितकी यंत्रं बनलेली आहेत, त्याहूनही मी मोठा आहे. संपूर्ण मानव जात मोठी आहे. मानवानेच सगळी पुस्तके लिहिलेली आहेत आणि सगळया पुस्तकांपेक्षा मानव मोठा आहे. हे समजल्याशिवाय आपण आपल्या सद्बुद्धिचा उपयोग करु असं मला दिसत नाही. कदाचित ह्या सगळया चर्चांबद्दल विचार करुन सगळे जण आपल्याच उपयुक्ततेला स्वीकारतील.

स्वीकारण्यामध्ये हीच अंतिम गोष्ट कळते की आपल्याला समजदार बनायचंच आहे. समजदार बनण्यामध्ये काही त्रास नाही. समजदारी नसण्यामध्येच त्रास आहे. असं पहा, ही पृथ्वी स्वतः अखंड आहे. आपणच तिला वेगवेगळया खंडांमध्ये विभागून वेगवेगळया राष्ट्रांच्या रुपात पाहतो. एवढेच नाही तर प्रत्येक खंडाच्या चारही दिशांना सेना उभी करतो, हवं तेव्हा मारामाऱ्या करतो, झडप घालतो. पृथ्वीचे तुकडे तर नाही होऊ शकत ? झाल्यानंतर आपण कुणीही वाचू शकणार नाही.तिला तुकडाच मानून काय आपण योग्य करतो आहोत ? तो तुकडा नाही हा एक विचार करण्याचा मुद्दा आहे. खोट्या गोष्टींनी कसं आपल्यामध्ये घर केलं आहे त्याचं उदाहरण आहे. हे दुसरं उदाहरण, जनावरांसारखे रंग आणि वंशाच्या आधारावर मानवाला सुद्धा वेगळं करण्याचा आपण विचार केला. काय ह्याला बुद्धिमत्ता म्हणायचं ? मानवाचे मूल्यांकन समजदारीच्या आधारावर होते, वंश आणि रंगाच्या आधारावर नाही. ही बाब आपण ह्या आधीसुद्धा वेगवेगळया चांगल्या घटनांच्या रुपात पाहिली आहे. उदा. दासयुगाचा विरोध, राजयुगाचा विरोध, राजयुगाकडून लोकशाहीकडे मानव संक्रमित झालेला आहे, पण समाजवादी किंवा मानववादी व्यवस्थेच्या आधारावर व्यवस्थेमध्ये आपण अजून निष्णात झालेलो नाही, पण आपण मानतोय की आपण निष्णात झालो आहोत. खोटे इथे आहे. आपल्याला वाटतं की आपल्याला मिळालं. काय मिळालं ? सुविधा मिळाल्या, युद्ध, द्रोह, शोषण तर आहेच, मग खोट्या गोष्टींचा स्रोत कुठे कुठे आहे? राष्ट्र ह्या गोष्टीचा विचार (पृथ्वी तुकड्यांमध्ये आहे असा विचार करणे) संविधान आणि शक्ती केन्द्रित शासन . राष्ट्र सर्वोच्च आहे, संविधान सर्वोच्च आहे हे मानले गेले. संविधानाचे मर्म काय आहे? शक्ती केंद्रित शासन. शक्ती केंद्रित शासन म्हणजे काय? चुकीला चुकीने थांबवणे, अपराधाला अपराधाने थांबवणे. युद्धाला युद्धाने थांबवणे. सामान्य सोयींचा उपक्रमसुद्धा काही संविधानांमध्ये

केलेला आहे. सगळयांजवळ पैसा असेल तर ते जगतील, लढतील असा विचार ह्यापाठीमागे आहे.

संघर्ष करुन, झगडूनच जगायचं आहे, संघर्षानेच अस्मिता टिकून राहते अशा घोषणा सगळेच करतात. ह्या घोषणांमध्ये काही खरेपणा आहे ? सगळया खोट्या गोष्टींचे मूळ ह्याच घोषणांमध्ये आहे. ह्यावर आधारित परिवार, व्यापार, शिक्षा इ. सगळे ह्या खोट्या गोष्टींच्या ढिगाखाली दबलेले आहेत. काही ह्यातून बाहेर पडायचा प्रयत्न करतात, काही तसेच दबलेले राहतात. माझी शिक्षेत बदल करण्याची इच्छा आहे.

'जीवनाच्या' दहा क्रियांना प्रमाणित करण्यास मी तत्पर झालो आहे. 'जीवनाच्या' असण्याची स्वीकृती प्रत्येक मानवामध्ये आहेच. प्रत्येक व्यक्ती स्वतःच म्हणते की (मी) जीवित आहे, जिवंत आहे. पण 'जीवन' काय आहे? 'जीवनाचे' प्रयोजन काय आहे? 'जीवनाचे' अध्ययन कोण करते? 'जीवनाच्या' दहा क्रिया मला समजलेल्या आहेत, मी त्या जगलो आहे, त्या माझ्यामध्ये प्रमाणित झाल्या आहेत. त्या दहा क्रियांची नावे आधी समजू या.

१. आत्मा – 'जीवनाचा' हा भाग सह-अस्तित्वामध्ये अनुभव करतो. जीवनाच्या मध्यांश रूपात मी ह्या भागाला पाहिलेलं आहे. घडणपूर्ण अणुच्या (परमाणुच्या) मध्यांश रूपात हा स्वतःच क्रियाशील राहतो. त्याच्या प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ परिवेश (कक्षांच्या) रूपात बाकी सगळया क्रिया संपादित होतात. 'जीवन' अणुच्या (परमाणुच्या) मध्यांशामध्ये (आत्मा) दोनच क्रिया आहेत - अनुभव आणि प्रमाणिकता.

२. बुद्धि – प्रथम परिवेशामध्ये अनुभव प्रमाण बोध आणि ऋतम्भरा

(संकल्प) ह्या दोन क्रियांना होत असलेलं पाहिलं आहे. प्रमाणाला प्रमाणित करण्याची संकल्प क्रिया प्रकट होते तिचे ऋतंभरा नाव आहे.

३. चित्त – द्वितीय परिवेशामध्ये चिंतन आणि चित्रण ह्या दोन क्रिया होतात.

४ वृत्ति – तृतीय परिवेशामध्ये तुलन आणि विश्लेषण ह्या दोन क्रिया होतात.

५. मन – चतुर्थ परिवेशामध्ये चयन (निवड) आणि आस्वादन ह्या दोन क्रिया होतात.

जीवनामध्ये संपूर्णतेमध्ये ह्याच दहा क्रिया आहेत.

आतापर्यंत मानव साडेचार क्रियांमध्ये प्रमाणित झाला आहे. तुलनमध्ये प्रिय, हित, लाभ आहे. प्रिय, हित, लाभ ह्यांच्या आधारावर संवेदनशीलतेवर आधारित काम करता आलं. संवेदनशीलता ही इंद्रियमूलक, शरीर मूलक असते. इंद्रियांना जिवंत ठेवण्याचे काम 'जीवनच' करतो. शरीराला 'जीवन' मानणं हाच मूळ भ्रम आहे. शरीराला 'जीवन' मानल्यामुळे शरीराच्या अनुसारच आपण चालतो, हाच मान्यतेचा आधार आहे, काहीही जाणणे होत नाही. काय व्हायला हवं आहे ? 'जीवनाला' 'जीवन' मानावं आणि शरीराला शरीर. प्रयोजनाच्या आधारावर 'जीवन' आणि शरीराचं मूल्यांकन होणं स्वाभाविक आहे. असं झालं तर मानव चेतनेने जगता येते. व्यवस्थेमध्ये जगता येते. ह्यांचं मूल्यांकन झालं नाही तर अव्यवस्था होईलच. जीवनाचं मूल्यांकन प्रयोजनाच्या आधारावर आणि शरीराचं मूल्यांकन उपयोगितेच्या

आधारावर होणे हे व्यवस्थेमध्ये जगण्यासाठी आवश्यक आहे. ‘जीवनाने’ आपल्या जागृतिला मानव परंपरेत प्रमाणित करण्यासाठी शरीराची उपयोगिता आहे. मानव शरीर रचनेला मानवाने बनवलेले नाही. मानव शरीर तयार झाल्यानंतर जेव्हा बाळ समोर येतं, तेव्हा ते जिवंतच असतं. जिवंत बाळ मिळाल्यानंतर आपण असं मानतो की हे शरीर म्हणजेच ‘जीवन’ आहे. थोड्या दिवसानंतर ते बाळसुद्धा हेच मानतं, त्यामुळे परंपरेमध्ये अशा पद्धतीने आपण अडकलेले आहोत आणि ह्यातून बाहेर पडण्यासाठी अभिभावकांना (पालकांना) समजदार व्हावेच लागेल.

शिशुचे शरीर गर्भात तयार होते आणि त्याला कुठले न कुठले ‘जीवन’ चालवतो. ‘जीवन’ प्रकृतिमध्ये असतोच. चौथ्या – पाचव्या महिन्यात शरीर चालवायला ‘जीवन’ सुरुवात करतो, त्यामुळे शरीर आणि ‘जीवनाचे’ संयोजन गर्भाशयातच होते. ‘जीवन’ शरीर नाही हे असे आपण ओळखू शकतो. शरीराच्या कोणत्याही अंग, अवयवामध्ये न्याय, धर्म, सत्य ह्यांची प्रतीक्षा किंवा अपेक्षा नाही, पण आपण प्रत्येक मानवाकडून न्याय, व्यवस्था, सत्य ह्यांची अपेक्षा, प्रतीक्षा करतोच. ह्या अपेक्षा पूर्ण होणे म्हणजेच ‘जीवनाच्या’ दहा क्रियांना प्रमाणित करणे आहे. शरीर जिवंत राहण्यासाठी शरीरामध्ये ‘जीवन’ असणं आवश्यक आहे.

स्वतःहूनच ‘जीवन’ सतत बाल्यावस्थेपासूनच मनाच्या दोन क्रिया–चयन आणि आस्वादन ह्या सुरु करतो. विश्लेषण आणि तुलन ह्यामधील विश्लेषण तर करतोच. तुलनमध्ये फक्त प्रिय, हित लाभाच्या आधारावर करतो. चित्त मधील एक क्रिया चित्रण आपण करतोच. चित्रण क्रियेमुळेच मानवाने आपल्या सामान्य आकांक्षा आणि महत्त्वाकांक्षेच्या सगळया वस्तुंचे चित्रण करुन त्यांना प्राप्त केलेले आहे. प्राप्त करुनसुद्धा आपण व्यवस्थेपर्यंत पोहोचलेलो नाही. आदर्शवाद, शुभकल्पना अनेक प्रकारांनी प्रस्तुत केल्या.

भौतिकवादी आणि तीन उन्मादांनी सुविधा-संग्रह प्रवृत्तीच्या शिक्षण - प्रशिक्षण कार्याच्या लोकव्यापीकरण कार्यक्रमामध्ये सफल झालो तरी सगळयांना सुविधा - संग्रह सुलभ झाला नाही. ह्या ज्या गोष्टी आपल्याला मिळाल्या, तेव्हा आपण विचार केला की सर्वश्रेष्ठ मानवतेच्या गोष्टी आपल्याला प्राप्त झाल्या आहेत. मानव अधिकार मिळालेले आहेत, शोषण, संघर्ष प्राप्त झालेले आहेत. ह्या गोष्टी ऐकल्यानंतर हसू सुद्धा येतं आणि पश्चात्तापसुद्धा होतो. आपण कसं काय हे मान्य केलं की आपण मानवासाठी सगळं काही प्राप्त केलेलं आहे, मानवाचं अध्ययन केलेलं आहे. हा विचाराचा, पुनर्विचाराचा मुद्दा आहे. शरीर शास्त्राच्या नावाखाली जे सांगितलं जातं त्यात फक्त शरीर रचना, प्रकियांचं अध्ययन केलं जातं, पण म्हणतात कसं की मानवाचं अध्ययन करवलं जातं? तुम्हीच विचार करा, शरीर कापून, मांसपेशी आणि हाडं मोजून मानवाचं अध्ययन होऊ शकतं का? जिवंत मानव शरीरामध्ये डोळे, कान इत्यादी गोष्टीचे अध्ययन केले तरी मानवाचे अध्ययन कसे होईल? परंपरेमध्ये अशा पद्धतीने मानवावर खोट्या गोष्टींचे ढीग लादले जातात. मानवाचं अध्ययन न करता शेखी मिरवतात की आम्ही मानवाचं अध्ययन केलं आहे. अस्तित्वाचे अध्ययन केले नाही आणि त्याच्यावर शासन करण्याच्या गप्पा मारतात. ह्या प्रकारे मानव परंपरा ओझ्याखाली दबलेली आहे. आता दोनच विकल्प आहेत. एकतर ह्यातून बाहेर पडणे नाहीतर दबून मरणे. आपल्याला हे सुद्धा शिकवलं जातं की, नियती स्वतःला संतुलित करते. मानवाने अति टोकाच्या गोष्टी केल्यानंतर प्रकृतिच अशी परिस्थिती बनवेल की मानव ह्या पृथ्वीवर शिल्लकच राहणार नाही. पर्यावरणाबद्दल आपण चर्चा नेहमी ऐकतो, किती लोक वाचतील, किती जातील ह्या विषयी उपाययोजना केल्या जात आहेत. काही देशातील लोक विचार करतात की, आमचा देश वाचावा, काही धर्माचे लोक विचार करतात की, आपल्या धर्माचे लोक वाचावे. कुणातरी एकाचं नाव घेऊन वाचवणारा हाच आहे

असं म्हणतात. रहस्यमयी ईश्वर, परमात्मा, देवी-देवता, अवतार, देवदूत ह्यांपासून त्यांना काल्पनिक आश्वासन मिळते असे म्हणतात. काही धार्मिक संप्रदाय असं म्हणतात, बाकी सगळयांचा अंत होणार आहे. हे सगळं बोलून कुठं जाऊ इच्छिता? असा विचार करुन काय होईल? ह्यावर माझा असा विचार आहे की धर्म, राज्य, शिक्षा हे सगळे चांगल्या प्रकारे आपला रस्ता चुकलेले आहेत. धर्मगददी्मध्ये धर्माची कोणतीही सार्वभौमता नाही. धर्म गद्दीच्या नावाखाली जितके काही धर्म आहेत त्यांच्यामध्ये सार्वभौम धर्माचा आकार नाही, शिक्षा नाही, प्रमाण नाही. धर्म कुठून आला? राज्यगद्दीमध्ये राज्याची कोणतीही अवधारणा नाही.

आपल्याला राज्य वाचवण्यासाठी काम करायचं आहे. काय करणार? संघर्ष करणार. संघर्षाचा मसाला काय आहे तर विद्रोह, द्रोह, शोषण, युद्ध. हे चारही मसाले बनवतं कोण? प्रकृती की मानव ? ह्याला बघितले गेले, अध्ययन केले गेले. त्यानंतर कळालं की, हा मसाला मानवच बनवतो, भ्रमामुळे बनवतो. दोनच दिग्गज संस्था आहेत - धर्मगद्दी, राज्यगद्दी. ह्याच दोहोंकडे सगळी ताकद, सगळया सोयी, साधने आहेत. ह्या शक्तिशाली पण आहेत, त्यामुळे ह्या दोहोंकडे (सार्थक) काहीच नाही. व्यापारगद्दीबाबत तर काही विचारायलाच नको. ते तर आधीपासूनच शोषण करत आहेत. शिक्षागद्दीला विचारलं तर त्यांच्याकडे दिशादर्शन, मार्गदर्शनाची कोणतीही व्यवस्थाच नाही. चिन्हित लक्ष्य ओळखण्याची कोणती व्यवस्था नाही. मग आता सांगा, सामान्य माणूस काय करणार? ह्या ज्या चार परंपरा आहेत (धर्म, राज्य, व्यापार, शिक्षा) त्यांच्याकडून कोणताही मार्ग आपल्याला मिळणार नाही. मग रस्ता शोधण्यात, बनवण्यातच साहस आहे. समजदारी, इमानदारी, जिम्मेदारी आणि भागीदारी हाच तो रस्ता असेल. कोणाला मारुन कोणतेही लक्ष्य साध्य होत नाही. मारुन कोणत्याही आवश्यकता पूर्ण होत नाहीत, तरीसुद्धा आपण त्याची परंपरा कायम ठेवली. हा सुद्धा मोठा भ्रम

आहे की नाही? आपण समजदार होणे हीच गोष्ट योग्य आहे. समजदारीची तपासणी स्वतःमध्येच आहे. मला तपासून तुम्ही समजदार होऊ शकत नाही . तुम्ही स्वतःला जेव्हा तपासाल, तेव्हा तुम्ही समजदार व्हाल. तीस वर्षे जगाला तपासण्यासाठी मी डोकेफोड केली, मला समजदारीचा एक अंशसुद्धा मिळाला नाही. जेव्हा पंचवीस वर्षे प्रयत्न करुन मी स्वतःला तपासले, तेव्हा कुठे मला समजले. मागच्या माझ्या प्रयत्नांतून मला जे काही मिळाले त्याला मी अध्ययन पद्धतीने तुम्हा सगळ्यांपर्यंत पोहोचवू इच्छितो. त्यातलाच हा एक प्रयत्न आहे.

सह - अस्तित्व हेच परमसत्य आहे हा इशारा आतापर्यंत तुम्हांला लक्षात आला असेल, सह-अस्तित्वामध्ये जगणे हाच आपला परमधर्म आहे हे जर कळलं तर मग त्यासाठी सगळी समजदारी समीचीन आहे. हे खूप सुलभ आहे. मला वाटतं की, खोटं वागणं अधिक कठीण आहे. खरेपणाने जगणे अधिक सोपे आहे, सुगम आहे, मी जगलो आहे. आधी जेव्हा वेगवेगळया प्रश्नांनी वेढलो गेलो होतो, जगायला खूप त्रास होत होता. जेव्हा समाधान झाले, तेव्हा प्रश्नांतून मुक्त झालो आणि जगणं सोपं झालं, जर तुम्हाला सुद्धा ही गोष्ट योग्य वाटते तर माझा विश्वास अजून वाढेलच. माझ्या साथीदारांनी ही गोष्ट तपासली आहे, तुम्हाला वाटत असेल तर तुम्हीही तपासा. चिंतनाने तपासणी सुरु होते ,व्यवहाराने न्याय सुरु होतो. संबंध काय आहेत हे मला समजलंय का? संबंधांचा मी निर्वाह करु शकतो /शकते का? संबंधांमध्ये सामावलेल्या मूल्यांचे मूल्यांकन करु शकतो का? उभयतृप्ती होते किंवा नाही? हे सगळे तपासाचे मुद्दे आहेत. हे जर तपासायला सुरु केलं तर प्रिय, हित, लाभ ह्यामध्ये आपण ठाम होऊ शकत नाही. मला जे आवडतं, ते तुम्हांला आवडणार नाही. मला जे हितकर वाटेल, ते तुम्हाला वाटणार नाही. जितक्या लाभाने तुम्ही संतुष्ट झाला, तितक्याने मी नाही होणार.

ह्यातच सगळे मानव अडकलेले आहेत, त्यामुळे प्रिय, हित, लाभ ह्यामध्ये समानतेचा आधार होऊ शकत नाही. ह्यातून बाहेर पडायचं असेल तर काय करावे? तुलनातील ह्या तीन गोष्टींच्या ऐवजी (प्रिय, हित, लाभ) दुसऱ्या तीन गोष्टी आहेत (न्याय, धर्म, सत्य,). न्याय दृष्टिने जेव्हा आपण तुलन करायला लागतो, त्याला चिंतन म्हणतात. संबंध ओळखल्यानंतरच न्याय आपल्याला समजतो. संबंध ओळखला की मूल्यांचा निर्वाह होतो, मूल्यांकन होते आणि उभयतृप्ती होते, त्याला न्याय म्हणतात. दोन्ही बाजूंना संतुलित रुपात जो संतुष्ट करु शकतो, त्यालाच न्याय म्हणतात. जर दोन्ही बाजू संतुष्ट नाहीत तर तो न्याय नाही. ह्या बाबतीत एकाने मला विचारले, कोणी काही चूक किंवा अपराध केला तर त्याचे काय करावे ? कोणी चूक किंवा अपराध करतो कारण आपण त्याला समजदार बनवत नाही. तुम्ही अपराध्यांनाच बरोबर घेऊन जायचा का विचार करता, जे ठीक आहेत त्यांना का नाही घेऊन जात? ज्यांनी कोणताही अपराध केलेला नाही असे खूप लोक आहेत, त्यांच्याबरोबर काहीही प्रश्न नाही. आपण परस्परांचे मूल्यांकन करतो आणि उभयतृप्ती मिळतेच. ह्याला कसं विसरु शकतो? हा एक पुरावा तुमच्यासमोर आहे. तुम्हाला त्याची आवश्यकता आहे की नाही? मी समजतो सगळे लोक ह्याचीच वाट पाहत बसले आहेत. माझ्या, तुमच्यामध्ये इतकाच फरक आहे की मी त्रासामुळे एक पाऊल पुढे टाकले. मला ही गोष्ट मिळाली, तिला मी सत्यापित करु शकतो. समजल्यानंतर तुम्हीसुद्धा हेच सत्यापित कराल. ह्यात इतके सुख, तृप्ती आहे. ह्या विधिने सगळे लोक समजदारीनंतर सत्यापित करण्यायोग्य होतील. समजदारी कुठे मिळेल? अध्ययन विधिने शिक्षा संस्थांमध्ये. शिक्षा संस्था म्हणजे काय तर, सगळया अभिभावकांची संयुक्त, एकत्रित अभिव्यक्ती आहे.

समजदारी, बोध ह्या गोष्टींना प्रमाणित करण्याच्या कामाचं नावच आहे शिक्षा. समजदारी प्रमाण बोध झाल्याशिवाय शिक्षेचे

काम होऊ शकत नाही. समजदारीसाठी, शिक्षा संस्था आणि प्रत्येक अभिभावक (पालक) जबाबदार आहे. प्रत्येक परिवार शिक्षेसाठी सूत्र आहे. शिक्षा संस्थांचे एकीकरण, सरकारीकरण, खाजगीकरण (निजीकरण) ह्याविषयी विचार करण्याने काहीही होणार नाही, काहीही झाले नाही. अभिभावकांनाच शिक्षा संस्थांच्या रुपात पाहिलं पाहिजे. त्यानेच मानवाचे कल्याण होईल. समजदारीनंतर हेच रुप दिसतं. आपल्याला न्याय प्रदान करण्याच्या क्षमतेमध्ये निष्णात झालं पाहिजे. न्याय प्रदान करण्याची क्षमता स्वतःमध्ये प्रमाणित व्हायला हवी. ह्या दोन्ही गोर्ष्टीनी आपण परिपूर्ण असू, तेव्हाच आपण समजदार होऊ. समजलं नाही तर न्याय कसा करणार ? मोठया न्यायालयांमध्येसुद्धा ज्यांना न्याय समजला नाही असे न्यायमूर्ती आहेत तर, बाकी लोक काय करणार ? जगण्यात कमीत कमी न्याय तर झालाच पाहिजे. त्याचा पुरावा आहे, मानवीयतापूर्ण आचरण. मानवीयतापूर्ण आचरण नसेल तर न्याय होऊच शकत नाही. ह्यापेक्षा अधिकाची गरजच नाही. चिंतनाबरोबर 'जीवनाच्या' सहा क्रिया पूर्ण होतात. प्रिय, हित, लाभ ह्यांना धरुन खूप विश्लेषण केलं आहे. शरीराच्या आवश्यकतेसाठी सामान्य आकांक्षा आणि महत्त्वाकांक्षेसंबंधी वस्तुंचे खूप उत्पादन केलेले आहे. ह्याशिवाय मानवाला निरुपयोगी अशा सुद्धा काही वस्तू आहेत उदा. बॉंब तयार करणे, मिसाइल बनवणे, विमानवाहक नौका (लढाऊ जहाजे) इ. बनवणे. हे निरर्थक आहे आणि आपल्या नाशाचे कारण आहे.तर्कविधी आणि घटना विधिने हे सिद्ध होते. तात्विक विधिने, तर्काने, व्यवहार विधिने मानवासाठी वस्तुंचा उपयोग सिद्ध होतो. तात्विक विधिने आपण सुखी होऊ इच्छितो. आपण सुखी होतो, तात्विक विधिने आपण व्यवहारी होतो, त्याला प्रमाणित करण्यासाठी आपण व्यवहारी होतो हीच तर्क विधी आहे, म्हणून अशा तर्क, तत्व आणि व्यवहारी विधिने मानव प्रमाणित होतो. आपण जे काही बोलतो, वाचतो, लिहितो ते

तर्क विधिच्या आधारावर करतो. तात्विकतेच्या अर्थाला तर्क स्पर्श करतो हाच संप्रेषणाचा महिमा आहे.

आपण जे संप्रेषित करतो, त्यामध्ये तात्विकतेने जर समोरच्या व्यक्तिला स्पर्श केला तरच माझी संप्रेषणा सार्थक आहे, जर तेच तत्त्व व्यवहाराच्या सार्थकतेकडे इशारा करत असेल आणि बोध करुन देत असेल तर व्यवहार ज्ञानाचा अनुभव होतो. (व्यवहारामध्ये सार्थकता आहे. मानवाचे प्रयोजन समाधान, समृद्धी, अभय, सह-अस्तित्व ह्या चारही गोष्टींचा इशारा करणे) ह्यामध्ये तात्विक ज्ञान झाले. तात्विक ज्ञानासाठी सुद्धा तर्क हवा आहे आणि व्यवहार ज्ञानासाठी सुद्धा तर्क हवा आहे. पहिली निरंतर प्राप्ती हीच आहे, आपलं आणि परिवारातील लोकांचं मूल्यांकन कोणत्या आधारावर होईल ? मूल्यांच्या आधारावर, संबंधांच्या आधारावर, उभयतृप्तिच्या आधारावर. व्यवहारामध्ये आपण न्यायी झालो हेच प्रमाणित करु शकतो, तेव्हा माणूस मानव होईल. आधी मानव होईल आणि नंतर समजदारीच्या आधारावर स्वायत्त होईल आणि त्याच्यामध्ये सहा गुण येतील :-

१. स्वतःमध्ये विश्वास २. श्रेष्ठतेचा सन्मान (सम्मान)
३. प्रतिभेमध्ये संतुलन ४. व्यक्तित्वामध्ये संतुलन
५. व्यवहारामध्ये सामाजिक ६. व्यवसायामध्ये स्वावलंबी

ह्या सहा अर्हता जेव्हा मला समजल्या, तेव्हा मी स्वायत्त झालो आहे असा मला अनुभव झाला, तसेच मी आपल्या परिवारामध्ये समजदारी, समृद्धिला प्रमाणित करण्यात समर्थ झालो. ह्याच सत्यतेमुळे तुमच्यासमोर प्रस्तुत झालो. प्रत्येक माणूस सज्जन होऊ इच्छितच असेल, सज्जन होण्यासाठी न्यूनतम अर्हता न्याय आहे, संबंध, मूल्य, मूल्यांकन आणि उभय तृप्ती ह्यातच मी न्याय पाहतो, नंतर मला असं समजलं की जन्मापासूनच प्रत्येक व्यक्ती न्यायाची

याचक आहे, योग्य कार्य व्यवहार करु इच्छितेच, सत्य बोलणारी असतेच. ह्या आधारावर शिक्षेमध्ये काय असलं पाहिजे? प्रत्येक मानव संततीला सत्य बोध व्हायला हवा, योग्य कार्य व्यवहारासाठी अभ्यास (सराव) पाहिजे. विधी असायला हवी, न्याय प्रदान करण्याची क्षमता स्थापित व्हायला हवी. ह्या तिन्ही गोष्टी शिक्षा संस्थेमध्ये होऊ शकतात आणि तेव्हा मानव परंपरा आपोआप बनते. मानव परंपरेची सुरुवात न्यायानेच करावी लागेल. न्यायासाठी प्रमुख मुद्दा आहे, नैसर्गिक संबंध जे शाश्वत आहेत आणि मानव संबंध निरंतर आहे, जेव्हा एखादा मानव चूक करतो तेव्हा मार्गदर्शनासाठी तो कुठे जातो? मी पाहिलंय की परिवारामध्ये ज्या व्यक्तिने न्याय सत्यापित केला आहे तो मार्गदर्शन देईल. परिवारामध्ये नसेल, गावात तर कुणी असेल जो मार्गदर्शन करेल. गावात जरी नसला तरी देशात, पृथ्वीवर प्रयत्न करेल, ही सहज प्रवृत्ती आहे. प्रत्येक माणसामध्ये कुठे न कुठे सुधार करण्याची प्रवृत्ती आहे. जगात परिवर्तन हवं आहे ह्याची साक्ष तर मिळाली आहे. कुठलं परिवर्तन हवं आहे हे कळत नाही, त्यासाठी हा प्रस्ताव आहे. शिक्षा - संस्कारानेच लोकव्यापीकरण होईल . शिक्षेमध्ये सुद्धा मानवीय शिक्षेची तरतूद व्हायला हवी. प्रत्येक व्यक्तिला न्यायाने जगून प्रमाणित होण्यासाठी आपल्याला समजदारी द्यावीच लागेल, त्यासाठी शिक्षेमध्ये विज्ञानाबरोबरच चैतन्याचेसुद्धा अध्ययन करायला लावायला हवं, जर चैतन्य ही गोष्ट आपल्याला समजली नाही तर अस्तित्व आपल्याला समजणार नाही आणि अस्तित्व समजलं नाही तर व्यवस्था कशी समजणार? अस्तित्वाला समजणारा ‘जीवनच’ आहे (चैतन्य), त्यामुळे चैतन्य वस्तुच्या अध्ययनाचा सुद्धा शिक्षेत समावेश होणे आवश्यक आहे.

मनोविज्ञानामध्ये संस्कार (समजदारी) ह्या गोष्टीचा समावेश व्हायला हवा, मानव संचेतनेचा समावेश, ओळख

व्हायला हवी. मानव संचेतनेमध्ये संवेदनशीलता, संज्ञानशीलता ह्या दोन्ही गोष्टी वैभवात आहेत.दर्शनशास्त्राला प्रमाणिकतेबरोबर शिकवायला हवं, जेव्हा प्रमाणिकतेबरोबर शिकवलं जाईल, तेव्हा मानवता विधिच समोर येईल, भौतिक आणि आध्यात्मिक विधी नाही, त्यामुळे मानव समजदार होऊ शकतो, समजदारीसाठी अस्तित्व स्वाभाविकपणे निकट आहे. प्रमाणांविषयी मी जो अनुभव केला आहे, तो असा की मला जे समजलंय, मी जे शिकलो आहे, मी जे केलं आहे, ते समजावण्यात, शिकवण्यात आणि करवून घेण्यात मी प्रमाणित होतो. ह्या तिन्ही पद्धतींमध्ये आपल्याला प्रमाणित होणं आवश्यक आहे, अजून चौथा असा कोणताही प्रकार नाही. समजण्यात परिपूर्ण होणे आवश्यक आहे. शिकण्यात, करण्यात थोडंसं कमी पडलं तरी चालू शकतं. आतापर्यंत आपण शिकण्याचं, करण्याचं, करवण्याचं काम खूप छान पद्धतीने केले आहे, पण समजण्याच्या क्रमात मात्र आपण शून्य राहिलो. शिकणे - शिकवणे, करणे – करवून घेणे ह्या गोष्टींना आपण सर्वोच्च मूल्य सांगतो, त्याने आपल्याला काहीही समाधान मिळाले नाही किंवा मानवाला कुठला दिलासा मिळालेला नाही, कुठं न कुठं आपण अडकलेले आहोतच.

आता मानवाचे अध्ययन करायची आवश्यकता वाटायला लागली. मानवाच्या अध्ययनानंतरच समजदारीमध्ये प्रमाणित होऊ शकतो. आदर्शवादी आणि भौतिकवादी विधिमध्ये मानव कुठे न कुठे मागे पडला .आदर्शवादी विधिमध्ये देव, देवी, ईश्वर ह्यांना सर्वोच्च मानले आणि मानव मागे राहिला. देव, ईश्वर ह्यांना समजण्याच्या नादात मानवाच्या अध्ययनाला तिलांजली दिली गेली. भौतिकवादी विधिमध्येसुद्धा मानवाला सोडले, यंत्र पकडले म्हणजेच यंत्र प्रमाण झाले. आदर्शवादामध्ये ग्रंथ, पुस्तक, वाङमय हे प्रमाण झाले आणि भौतिकवादामध्ये यंत्र हे प्रमाण झाले. ह्या तऱ्हेने माणसाचे अवमूल्यन झाले आणि भ्रमात अडकून माणूस भ्रमालाच पूरक झाला, त्यामुळे

भ्रमातच अडकून कुंठित झाला, त्रासला गेला, प्रताडित झाला, मग मानवाचा उद्धार कसा होणार? उद्धार करण्याचे आश्वासन तर आधीसुद्धा सगळया गाद्या देत राहिल्या पण उद्धार होण्याचे प्रमाण मिळाले नाही, तर असं किती दिवस चालणार?

इथं मानवाच्या उद्धाराचा मूळ स्रोत आहे समजदारी. सगळयांत मोठी गादी म्हणजे शिक्षा संस्था होय, त्यामध्ये विज्ञानाबरोबर चैतन्याचे सुद्धा अध्ययन झाले पाहिजे. चैतन्याचे अध्ययन झाल्याशिवाय सह-अस्तित्वाचे अध्ययन कसे होईल? हे दोन्ही भाग शिक्षा संस्थानांमध्ये, शिक्षा वाङ्मयामध्ये, शिक्षा प्रक्रियेमध्ये नाहीत. दुसरे, मनोविज्ञानामध्ये मानवाच्या अध्ययनासाठी मानव संचेतना समजते, प्रमाणित होते, आवश्यकतासुद्धा समजते, म्हणून मनोविज्ञानामध्ये संस्काराचे अध्ययन झाले पाहिजे. तिसरं, दर्शन शास्त्राबरोबर प्रमाणिकता असायला हवी, आतापर्यंत आपण असं मानत आलेले आहोत की, मानवाने वाचलं आणि त्याने दुसऱ्यांना वाचून दाखवलं म्हणजे तो विद्‌वान झाला. खरं तर तो विद्‌वान होत नाही. विद्‌वान असणं हे समजदारीचं स्वरुप आहे आणि विद्या स्वतःच अस्तित्व स्वाभाविक आहे, त्यामुळे अस्तित्वाला समजल्याशिवाय, ‘जीवन’ समजल्याशिवाय, मानवीयतापूर्ण आचरणाशिवाय कोणी विद्‌वान होत नाही. हे समजल्यानंतर विचार शैलीसुद्धा तयार होते, योजना, कार्ययोजनासुद्धा ठरते, त्यामुळे प्रमाणितसुद्धा होतो. आपल्याला जर समजलंच नाही तर विचारशैली कुठून आणणार ? न समजताच जी विचार शैली तयार झालेली आहे, त्यातली एक आहे, सुविधा – संग्रह आणि दुसरी आहे, त्याग, अपरिग्रह, विरक्ती, भक्ती. कित्येक कोटी लोकांनी ह्यामध्ये स्वतःला समर्पित केले आणि आपले धैर्य, साहस, निष्ठेचा परिचय दिला. ह्या दोहोंकडून अखंड समाजाची कोणतीही रुपरेषा पहायला मिळाली नाही. मानव नेहमीच अथक परिश्रम करत आला आहे, पण तो

लक्ष्य व दिशाविहीन होता. मी जो प्रयास केला तो फक्त माझ्या प्रश्नांच्या उत्तरासाठी होता. मला स्वर्ग मिळेल, पैसे मिळतील, संग्रह मिळेल असं कोणतंही माझं लक्ष्य नव्हतं. एकच गोष्ट होती, माझ्याकडे शंका आहे, तर त्याचं उत्तर मिळेलच. मी योग आणि संयोग ह्या शब्दांचा अर्थ सांगतो. योगाचा अर्थ आहे मिलन. जसं आपण कुठे जात आहोत, रस्त्यावर दगड, माणूस भेटला तर त्याला योग म्हणायचं. संपूर्णतेच्या अर्थाने मिलन म्हणजे संयोग. पूर्ण ह्याचा अर्थ आहे मानवाचे व्यवस्थेमध्ये जगणे, परमपूर्ण ह्याचा अर्थ - मानवाचे प्रमाणिक होणे. व्यवस्थेमध्ये जगणे आणि प्रमाणिक होणे ही मानवाची इच्छा आहे, पण ती गोष्ट जर मिळाली नाही तर इलाज नाही, जे मिळालं आहे त्यानुसार पुढे जाऊन परंपरेनुसार साचेबद्ध होऊन जातो. योग-संयोग सतत असतोच. पूर्णतेसाठी खूप प्रयास झाले (सफल झाले की नाही ही एक वेगळी गोष्ट आहे) मानवाने पूर्णतेसाठी खूपदा आत्मबलिदान दिलेले आहे. आत्मबलिदानाचा परिणाम तर होतोच. जेव्हा कोणत्याही गोष्टीला आपण तोडतो, तेव्हा शेवटच्या ठोश्यानंतर आपल्याला वाटतं की, ह्या ठोश्यामुळे आपण सफल झालो, पण त्याच्याआधी जर सगळे ठोसे लागले नसते तर तो शेवटचा ठोसा सफल झाला नसता. सफल होण्यामध्ये सगळया ठोश्यांचा हात आहे. मला सफलता मिळाली त्यामध्ये ह्या दिशेने जे प्रयत्न झाले होते त्यांचेसुद्धा योगदान आहे, त्यामुळे सगळया मानवांच्या योगदानामुळे ही घटना घडली असे मी समजतो.

ह्याच्यामुळे एका मोठा फायदा असा झाला की माझ्यामध्ये अहंकार नाही आला. अहंकाराने बोलणारे लोक सुद्धा माझ्याजवळ कमीच आले. कितीही अहंकार घेऊन लोक आले तरी दोन, तीन पावलं पुढे गेल्यानंतर त्यांच्या अहंकाराचे शमन होताना मी पाहिले आहे. मला जितके लोक भेटले, साधेपणाने, सज्जनपणाने, सहजपणे भेटले, पण मला भेटलेल्या प्रत्येकाने माझी गोष्ट

स्वीकारली असे नाही. खूप लोक स्वीकारत नाहीत त्यांचा पण मी सन्मान करतो. ह्यात त्यांची काही चूक नाही, परंपरेला त्यांच्यावर लादले गेले आहे, त्यामुळे कुणी स्वीकारले काय किंवा नाही काय, मी खूष राहतो. प्रत्येकासाठी सद्‌बुद्धि अंकुर आहेच कालक्रम संयोगाने. तो केव्हा फुटेल, पल्लवित होईल हे आपण सांगू शकत नाही. प्रत्येक माणूस शुभ इच्छितोच. ह्या शुभाकांक्षेच्या मुळाशी ज्या शक्यता आहेत, त्यांना अजून निकट करावे अशी माझी इच्छा आहे. जेव्हा संयोग होतो तेव्हा माणसं समाधान, व्यवस्था, अखंड समाज ह्या अर्थाने भेटतात. एकाच विचाराच्या, एकाच अपेक्षेच्या लोकांच्या एकत्र येण्याने, भेटण्याने संयोग होत नाही. जसं दोन चोर, दोन डाकू, दोन अपराधी लोक ह्यांचे एकत्र येणे हे समाधान, व्यवस्थेच्या अर्थाने नाही त्यामुळे हा संयोग नाही.

मला जेव्हा न्यायाने जगता आलं तेव्हा माझा परिवारच माझ्या प्रमाणिकतेचं ठिकाण झालं. मी योग्य मार्गाने जात आहे हे कुटुंबियांच्या डोळयातून समजतं. परिवारामध्ये न्यायाने जगत असताना जितके माझे मित्र संबंधातील परिवार आहेत, त्यांच्यामध्ये माझी ओळख मी अचूकपणे पाहू शकतो, नंतर न्यायासहित जगणे ही माझ्या अधिकारातील गोष्ट झाली तर आमच्या घरी येणाऱ्या पाहुण्यांवरसुद्धा मी आपली छाप पाडण्यात समर्थ होऊ शकलो.

प्रत्येक मानवाला आपण सार्थक आणि सफल व्हावे अशी इच्छा आहेच. आपल्या प्रामाणिक इच्छेचा स्रोत आपली समजदारीच आहे. हा स्रोत आपण कधी विसरु शकत नाही. प्रत्येक व्यक्ती शुभ स्वीकारते आणि शुभ घडावं ह्याची आपण सगळेच वाट पाहत आहोत. वाट पाहताना संबंधाचा मुद्‌दा येतो. संबंधांची ओळख म्हणजे त्यातील प्रयोजनाची (मूल्यांची) ओळखच आहे, हेच अध्ययन आहे. प्रयोजन ओळखल्यानंतर

मानव स्वाभाविकपणे निष्ठावान होतो आणि नंतर पारंगत होतो. पारंगत झाल्यानंतर फळ मिळतेच. हीच सफलतेची साधी, सोपी विधी आहे. सगळया संबंधांबरोबर अभ्युदय जोडलेला आहेच. समाधान आणि सुखाच्या अर्थाने संबंधांचे प्रयोजन म्हणजे अभ्युदय होय. समाधानासाठीच आपण प्रेम करतो, समाधानासाठीच आपण कृतज्ञ होतो, मैत्री करतो, विश्वास ठेवतो, मानवाबरोबर व्यवहारामध्ये प्रशस्त होऊन सुख अनुभवतो. मूल्यांचे स्वरुप आहे - ममता, वात्सल्य, विश्वास, स्नेह, कृतज्ञता, गौरव, प्रेम, श्रद्धा, सन्मान (सम्मान), माझ्या अभ्युदयासाठी कुणाकडूनही, कुठूनही मदत मिळाली असेल तर त्याचा स्वीकार करणे म्हणजे कृतज्ञता. कृतज्ञतेबरोबर बाकीची मूल्ये आपोआप सार्थक होऊ लागतात. कृतज्ञतेनंतर स्नेह, प्रेम, विश्वास सार्थक होतो. असा एकही माणूस आपल्याला सापडत नाही की त्याच्याकडून कुठं न कुठं, कोणत्या ना कोणत्या रुपात मदत मिळाली नाही. सगळयांच्या मदतीनेच माणूस मोठा होतो, समर्थ होतो आणि प्रमाणित होतो. ह्या क्रमाने जितके काही संबंध आहेत (सात संबंध) त्यांच्यामध्ये मूल्यांचे मूल्यांकन झाल्यानंतरच संबंध निरंतर होतात. संबंधांमध्ये मूल्यांचे मूल्यांकन झाले नाही तर संबंध निरंतर होत नाहीत. सामान्यपणे आतासुद्धा ज्यांना आपण आपले संबंधी (नातलग) मानतो, त्यांच्याबरोबर आपण व्यवस्थित ढंगाने प्रस्तुत होतोच. संबंधांना आपण पारंपारिक पद्धतीनुसार बल, धन, बुद्धी, वय ह्यांच्या आधारावर ओळखतो, पण संबंध आधी अभ्युदयासाठी आहेत, दुसरे पोषणासाठी, तिसरे संरक्षणासाठी, चौथे उपयोगिता - पूरकतेसाठी, पाचवे सदुपयोगितेसाठी, सहावे प्रयोजनासाठी. संबंधांना सर्वोच्च प्राधान्य प्रमाणिकतेच्या अर्थानेच आहे. प्रमाणाच्या आधारावर प्रत्येक जण संतुष्ट होतो. 'जीवनाच्या' स्वाभाविक पद्धतीनेच मूल्ये उद्‌गमित होतात. उदा. मी आणि तुम्ही जेव्हा भेटतो तेव्हा स्वाभाविकपणे मूल्ये प्रवाहित होतात, त्यामुळे तुमच्या – माझ्यामध्ये विश्वास मूल्य सुरु होते. ह्या विधिने

आपण संबंधांमध्ये मूल्य ओळखणे, मूल्यांकन करणे आणि उभयतृप्ती मिळवण्यात सक्षम होतो. ह्यापेक्षा अजून मोठा लाभ (फायदा) काय झाला? आतापर्यंत भय आणि प्रलोभनाच्या आधारावर संबंधांना ओळखत राहिलो; त्याऐवजी मूल्य आणि मूल्यांकन, समाधान, समृद्धिच्या स्थितिमध्ये आपण येतो, भय आणि प्रलोभन ही मूल्ये नाहीतच, तर मूल्यांकित काय करणार ?

भयाबरोबर प्रलोभन, प्रलोभनाबरोबर भय (म्हणजे) थोड्या काळासाठी मूक होणे आहे. रोग तर तिथल्या तिथंच आहे. न्यायालयामध्ये सुद्धा न्याय पूर्ण झाला नाही, कारण भय आणि प्रलोभन न्यायाचा आधार होऊच शकत नाही. शेकडो वर्षांपासून भय आणि प्रलोभनाच्या आधारावरच एकमेकांना राजी करत आलो आहोत, पण अजूनपर्यंत कोणतीही व्यवस्था देऊ शकलेलो नाही, त्यामुळे ह्या गोष्टीवर आपण सहमत होतो की भय आणि प्रलोभन ही कोणतीही मूल्ये नाहीत आणि हे संबंधांमध्ये मूल्यांकित सुद्धा होऊ शकत नाही.

अजूनपर्यंत मानव मूल्यांपर्यंत पोहोचलाच नाही. मूल्यांपर्यंत पोहोचलो असतो, तर मूल्ये अभिव्यक्त झाली असती, प्रमाणित झाली असती, मूल्यांकित झाली असती आणि स्वाभाविकपणे न्याय झाला असता. न्यायालयांमध्ये निर्णय होतो, न्याय नाही. ह्या निर्णयामध्ये एक बाजू भयामुळे आणि दुसरी प्रलोभनामुळे सहमत होते. ह्यामध्ये उभयतृप्ती कधी झाली नाही, होऊच शकत नाही. न्याय मिळवण्यात आपण पूर्णपणे असमर्थ राहिलेले आहोत, तरीसुद्धा विकासाचा दावा आपण करतोय. विकासाचा काय अर्थ आहे, तुम्हीच विचार करा. भय आणि प्रलोभनापासून प्रत्येक मानव दूर जाऊ इच्छितो, हे नियतिनुसार आहे. त्याने मानवाचे सुद्धा कल्याण आहे. नैसर्गिकतेचेसुद्धा कल्याण आहे. ह्या प्रकारे प्रयोजनाच्या आधारावर संबंध आहेत.

समाधान, समृद्धी, अभय, सह-अस्तित्व हे प्रयोजन आहे. व्यवस्थेमध्ये जगणे हीच ह्यासाठी प्रक्रिया आहे. व्यवस्थेमध्ये जगणे म्हणजे पाच आयामांमध्ये भागीदारी करणे. पाच आयाम असे आहेत-

१)शिक्षा - संस्कार २) न्याय -सुरक्षा ३) स्वास्थ्य- संयम
४) उत्पादन - कार्य ५) विनिमय -कोष

ह्या विधिने आपण परिवारामध्ये, व्यवस्थेमध्ये जगून, पाच आयामांमध्ये भागीदारी करुन समग्र व्यवस्थेमध्ये भागीदार होतो. मानवासाठी अशा पद्धतीने निरंतर उत्साह (उमंग), खुशी, दुर्दम्य साहस ही स्थिती तयार होते. न्यायानंतर येतो धर्म. धर्माचा अर्थ आहे अनुभव प्रमाण बोध जो बुद्धिमध्ये होतो म्हणजेच समाधान. समाधानाचा अर्थच मानव धर्म आहे. व्यवस्थेमध्ये जगणे हाच मानव धर्म आहे, हाच अभ्युदय आहे. अव्यवस्थेमध्ये मानव जेव्हा जगतो, तेव्हा प्रश्नांनी ग्रासून जातो, व्यवस्थेमध्ये जगतो तेव्हा समाधानित राहतो. माणसाला समस्येने ग्रस्त राहण्याची इच्छा नाही म्हणून माणूस समाधानित राहू इच्छितो. समाधान = सुख. मानव सुखधर्मी आहे. समस्या = दुःख. मानवाला समस्या नको आहेत. भय आणि प्रलोभनाच्या आधारावर समाधान होत नाही आणि सगळं जग असा प्रयत्न करत आहे की भय आणि प्रलोभनाच्या आधारावर समाधान होईल. भय आणि प्रलोभनाच्या आधारावर व्यवस्थेचे समीकरण बनवण्यासाठी आपण आजही शिकतो प्रशिक्षण घेतो, पण त्याने व्यवस्था होऊ शकत नाही. कुठेही एखाद्या ठिकाणी भय आणि प्रलोभनाच्या आधारावर काही उभं राहतं, त्या क्षणापासूनच ते मोडून पडायला सुरुवात होते, त्यामुळे मूल्य आणि मूल्यांकनाच्या आधारावरच व्यवस्था होईल. परिवार व्यवस्था, टेक्नॉलॉजी, प्रशासन, राज्यव्यवस्था सगळया स्तरांवर ह्याच पद्धतीने व्यवस्था होईल. व्यवस्थेचा अर्थ हाच आहे की मानव आपली प्रमाणिकता

प्रस्तुत करु शकेल, न्यायाचा निर्वाह करु शकेल आणि व्यवस्थेमध्ये भागीदारी करु शकेल.

परिवारामध्ये, प्रत्येक मानवाला, प्रत्येक मुलाला समजदारीचे सूत्र देणे हीच शिक्षा - संस्कार व्यवस्था आहे. ह्याला समजदारीचे लोकव्यापीकरण करणे हे सुद्धा म्हणू शकतो. आधी तुम्हाला दर्शन सांगितलं, दर्शनानंतर विचार, विचारानंतर शास्त्र, शास्त्रानंतर योजना. योजनांमधली एक 'जीवन विद्या योजना' आहे, ज्यामध्ये मानव परिवाराने मानव चेतना संपन्न होण्याची पूर्ण जागा, सोय आहे. ही समज आल्यानंतर मानव, परिवारामध्ये व्यवस्थेच्या रुपात जगू शकतो. दुसरी योजना कोणती तर मानवीय शिक्षा- संस्काराचे मानवीकरण. ह्यामध्ये मुलांसाठी शिक्षेची व्यवस्था आहे. अशा शिक्षेचे आम्ही एका शाळेमध्ये (बिजनौर, उत्तर प्रदेश) प्रयोग केलेले आहेत. हा पाच वर्षांचा अनुभव आहे. 'जीवनविद्येच्या' आधारावर शिक्षेचे मानवीकरण केल्याने त्याचा काय प्रभाव पडला हे तिथे पाहिले गेले. लोक म्हणतात की विद्यार्थ्यांवर वातावरणाचा प्रभाव पडतो, ज्याला मी नाकारत राहिलो, जर वातावरणाचा प्रभाव पडत असता तर मी अनुसंधान कसे काय करु शकलो असतो? ह्या शाळेमुळे असे प्रमाण मिळाले की मुलांचा प्रभाव कुटुंबात आणि त्यांच्या कुटुंबियांचा प्रभाव वातावरणावर पडायला लागला आहे. 'जीवन' रुपात मुलं आपल्याला ओळखायला लागली आणि व्यवस्थेमध्ये जगणे अति आवश्यक आहे हे स्वीकारायला लागली. ह्यामुळे बरीच मुलं टी. व्ही., व्यर्थ गप्पागोष्टी इ. मध्ये अरुचि दाखविल्या जाणाऱ्या गोष्टींचं मूल्यांकन करायला लागली आणि ह्यात काहीही तथ्य नाही हे समजायला लागली. त्याबरोबर गावामध्ये एका कुटुंबाचे दुसऱ्या कुटुंबाबरोबर जे भांडण, तंटे, मारामाऱ्या, खटले होत होते ते सुद्धा हळूहळू कमी व्हायला लागले. माझ्या माहितीप्रमाणे आता त्या गावांमध्ये भांडण, तंटे कमी झाले आहेत.

ह्यालाच मी म्हणतो की मुलांचा वातावरणावर प्रभाव पडला आणि ह्यानुसारच मी म्हणतो की ह्या शिक्षेमध्ये प्राण आहे, ही शिक्षा मजबूत आहे.

शिक्षेच्या मानवीकरणामध्ये आम्ही विज्ञानाबरोबर चैतन्याचे सुद्धा अध्यापन करु. चैतन्याचे अध्ययन म्हणजेच 'जीवन'. 'जीवनाचे', 'जीवन जागृतिचे' अध्यापन करु, रासायनिक, भौतिक रचना -विरचना ह्यांचे अध्यापन करु.

रचना - विरचना ह्यांची मानवासाठी पूरकता आणि मानव ह्या जगासाठी कसा पूरक होईल, उपयोगी होईल ह्या सगळयांचं अध्यापन करणार. ह्यानंतर विकल्पात्मक दर्शन शास्त्रामध्ये क्रियेचे अध्यापन करु. क्रियेचा अर्थ आहे–मानवाच्या समजदारीसाठी दर्शन आहे. समजदारीचे प्रमाण असले पाहिजे. समजदारीने आपण आपली ओळख बनवत असतो. तेव्हा सहअस्तित्वच कळते, मूल्यांचा निर्वाह करता येतो आणि मूल्यांकनानंतर उभयतृप्तिच स्वाभाविकपणे होते. व्यवस्था ही सह - अस्तित्वामध्ये एक शाश्वत सत्य आहे, कोणत्या अर्थी शाश्वत सत्य आहे ?अस्तित्वामध्ये प्रत्येकाची आपली 'त्व' सहित व्यवस्था आहे, जसं बेलाच्या झाडामध्ये बेलत्व समाविष्ट असते. पिंपळाच्या झाडाचे आचरण तसेच असते. पिंपळाच्या झाडाला पिंपळाची फळं आणि पिंपळाच्या बिया असतील, त्याचेच गुण धर्म असतील, हेच त्याचे आचरण आहे. ह्याप्रकारे संपूर्ण वनस्पती सृष्टी आणि जीव सृष्टी ह्यांचे आचरण निश्चित आहे आणि आपआपल्या आचरणाने ते प्रकाशित आहेत. ह्यालाच म्हणतात, 'त्व' सहित व्यवस्था. मानवाचे आचरण अजूनपर्यंत निश्चित होऊ शकले नाही कारण मानव अजूनपर्यंत व्यवस्थेमध्ये जगू शकला नाही. आतापर्यंत आपल्याला व्यवस्था मिळालेली नाही पण व्यवस्था आवश्यक आहे इथपर्यंत आलेले आहोत. व्यवस्था मिळवण्यासाठी आपल्याला आपल्या 'त्व' सहित

व्यवस्थेमध्ये जगावे लागेल. ‘त्व’ काय आहे? मानवीयतापूर्ण आचरण. मानवीयतापूर्ण आचरणामध्ये मूल्य, नैतिकता आणि चरित्र आहे. मूल्याचे प्रमाण काय आहे तर संबंध, मूल्य, मूल्यांकन आणि उभयतृप्ती जी परिवारात होणारच आहे. उभयतृप्ती नसेल तर तो परिवारच नाही. त्यापेक्षा अधिक आवश्यकताच नाही. हेच मानवत्व आहे. हे घडण्यासाठी स्वयंस्फूर्त विधिने मानव मूल्यांमध्ये जगेल. व्यवस्थेमध्ये जगण्याने चरित्र (चारित्र्य) येईल. स्वधन / स्वनारी - स्वपुरुष, दयापूर्ण कार्य व्यवहार ह्या रुपामध्ये चारित्र्याला (चरित्राला) ओळखलं आहे. नैतिकतेने (तन, मन, धन रुपी अर्थाचा सदुपयोग आणि सुरक्षा) अभयता येते. ह्या प्रकारे हे मानवीयतापूर्ण आचरण आहे. ह्याने मानव चांगल्या तऱ्हेने आश्वस्त होऊन जगू शकतो.

ह्यानंतर येते ती मानवाची परिभाषा - ‘‘मनाकाराला साकार करणाऱ्याला मानव म्हणतात’’, म्हणजे मानवाच्या मनात जे येतं (यंत्र बनवणे, घर बनवणे इ.) त्याला साकार करणारा आणि मनःस्वास्थ्याचा आशावादी आहे म्हणजेच सुखाच्या आशेतच प्रत्येक मानव जगत राहतो. मानव सुखधर्मी आहे. ह्या पद्धतीने मूल्य, नैतिकता आणि चारित्र्याचे (चरित्राचे) स्वरुप समजते. परिभाषेच्या अनुसार मनाकाराला साकार करण्याची गोष्ट मानवाने प्राप्त केली आहे. मनाकाराला साकार करण्याची क्रिया दोन पद्धतीने होते. एक सामान्य आकांक्षा (आहार, आवास, अलंकार) आणि दुसरी महत्त्वाकांक्षा (दूरश्रवण, दूरदर्शन, दूरगमन). शिक्षेमध्ये, संविधानामध्ये आचरणाविषयी काही मिळत नाही. मानवीयतापूर्ण आचरणाला मूल्यांकित करण्याची संविधानामध्ये कोणतीही व्यवस्था नाही. कोणत्याही शक्ती केंद्रित संविधानामध्ये मानवीयतापूर्ण आचरणाला प्रमाणित करण्याची तरतूद नसतेच, कारण हे मानवीय संविधान नसतेच. त्यामुळे त्यामध्ये मानवतेचे आचरण होऊच शकत नाही. मानवीयतापूर्ण

आचरणाला कोणी प्रमाणित करु शकले नाही, असं मूल्यांकन करण्याचं साहस मिळवू शकले नाही, अशी समजदारी मिळवू शकले नाही. ह्या त्रुटींना पूर्ण केल्याशिवाय मानव सुखाने जगू शकणार नाही आणि भांडण, तंटे करतच राहील. ह्या कचऱ्यातून बाहेर पडण्यासाठी समजदारी हा एकच उपाय आहे. ह्यासाठी शिक्षेचे मानवीकरण करणे अति आवश्यक आहे. शिक्षेमध्ये विज्ञानाबरोबर चैतन्य प्रकृतिचा, दर्शनाबरोबर क्रियेचा, मनोविज्ञानाबरोबर संस्कारांचा, भूगोल आणि इतिहासामध्ये मानव आणि मानवतेचा समावेश करु, अशा पद्धतीने शिक्षेमध्ये मानवतेचा समावेश झाल्यामुळे मानवाची सहजतेने व्यवस्थेमध्ये जगण्याची, स्वतःला प्रमाणित करण्याची प्रवृत्ती होईल. आपल्या ओळखीबरोबर समाधान, समृद्धी, अभय, सहअस्तित्वामध्ये जगण्याची संधी मिळेल, आवश्यकता वाटेल आणि आपण सफल होऊ, त्यामुळे मानवीयतेबरोबरच शिक्षा - संस्कार पूर्ण होतो, दुसऱ्या विधिने होत नाही. आता आपण ज्या संस्कारांबद्‌दल बोलतो, ते आपल्या मान्यतांवर आधारित आहेत, त्यामध्ये सार्वभौम असे काही नाही.

तिसरा बिन्दू आहे ‘सत्य’. ‘सत्य’ काय आहे? सहअस्तित्व रुपात अस्तित्व समजणे हेच सत्य आहे. सत्य समजल्यानंतर व्यवस्था समजते, सत्तेमध्ये (शून्यामध्ये) संपृक्त प्रकृतिच्या रुपामध्येच अस्तित्वाचे अध्ययन केले जाते. मानवेतर प्रकृती आणि मानव एकमेकांसाठी पूरक आहेत. ह्या विधिने जगण्याच्या कलेला विकसित केल्यानंतर मानवतेची व्यवस्थाच होते. हे समजल्यानंतर आपण न्यायानेच जगू, व्यवस्थेमध्येच जगू. परिवारामध्ये, व्यवहारामध्ये प्रमाणिकतेलाच प्रमाणित करु अन्यथा शक्ती केंद्रित शासन काहीच करणार नाही.

ह्या रीतीने आपण आश्वस्त, विश्वस्त, समृध्द होतो. जी

काही आहे ती अव्यवस्था आहे, अनिश्चितता आहे हे सांगून आपल्याला विज्ञान शिकवलं जातं. हे शिकल्यानंतर प्रत्येक विद्यार्थी ''मी अव्यवस्थेमध्ये आहे'' ह्याला स्वीकारतो आणि त्यामुळे अव्यवस्था पसरवण्यात भागीदारी करतो, ही संपूर्ण धरती हे ह्याचे उदाहरण आहे. ह्या पृथ्वीचे तापमान वाढत आहे, का बरे? पृथ्वीच्या आतून कोळसा, पेट्रोलियम काढल्यामुळे तापमान वाढत आहे. कसे वाढले, का वाढले हे ते पण जाणतात, आम्ही पण जाणतो. कोळसा, पेट्रोलियम पदार्थ असे आहेत की जे तापमान आपल्यामध्ये पचवतात. तापमान पचवणारे पदार्थ पृथ्वीच्या आतून बाहेर काढले तर पृथ्वीचे तापमान वाढणारच. तापमान वाढल्यामुळे काय झाले? समुद्रातील जलस्तर (पाण्याची पातळी) वाढायला लागला. पाण्याची पातळी किती वाढू शकेल? जिथं आपण बसलेले आहोत तिथून दोनशे ते तीनशे फूट पाणी उंच चढू शकेल. काही पर्वतांची शिखरं वाचू शकतील, अशा पद्धतीने आपण अडकलेले आहोत. हे सगळं व्यवस्थित, ठीक करण्यासाठी बलाढ्य देश मिळून आवाहन करतात की सगळे मिळून ठीक करु या. सुरुवात कुणी केली हे इतिहासातून कळतेच. काही समजून न घेता इंधनासाठी कोळसा आणि पेट्रोलियम पदार्थांचा उपयोग केला गेला हा पृथ्वीवर केलेला अत्याचारच होय. त्याची भरपाई पुढे होणार की नाही, हे अत्याचार थांबल्यानंतरच त्याचं परीक्षण होईल. हे कसं थांबेल ह्याविषयी पुढे बोलू या. पृथ्वीवर माणसे अधिक तापमानात (५० डिग्री सेल्सियस) सुद्धा राहतात आणि कमी तापमानात सुद्धा (-२० डिग्री सेल्सियस). जवळ जवळ ७० डिग्री सेल्सियसचा हा फरक आहे. तापमानामध्ये इतका फरक असताना राहणाऱ्या माणसांच्या शरीराचे तापमान एकच असते. असे का? बाहेरचे तापमान कमी जास्त झाले तरी शरीराच्या तापमानाला संतुलित ठेवण्यासाठी शरीरामध्ये सगळी द्रव्ये आहेत. अशाच प्रकारे पृथ्वीच्या तापमानाला संतुलित ठेवण्यासाठी तिच्या आत कोळसा आणि पेट्रोलियम पदार्थ आहेत.

मग आता मुद्दा असा आहे की कोळसा आणि पेट्रोलियम पदार्थ बाहेर काढणं थांबवता कसे येईल? एक उपाय आहे, आपल्या पृथ्वीवर जितक्या नद्या वाहतात, त्यांच्या प्रवाह शक्तिच्या मदतीने पृथ्वीवर जितक्या विजेची आवश्यकता आहे, त्याच्या ५० पट वीज उपलब्ध होऊ शकते. ह्यासाठी प्रवाह बलापासून वीजनिर्मिती करणाऱ्या संयंत्राला बनवण्याची आवश्यकता आहे. काही यंत्रं अशी आहेत की जी तेलावरच चालतील, त्यामुळे वनस्पती तेलाच्या मदतीने चालणारी इंजिने बनवावी लागतील. पृथ्वीवर तेल देणारी झाडे आहेत आणि अधिकाधिक संख्येने त्यांना उगवू शकतो असा मी विचार करतो. सौर इंधनाकडे लोकांचं लक्ष आहेच, अजून अधिकाधिक आतुरतेने लक्ष देण्याची गरज आहे. रोजच्या वापरातल्या आणखी यंत्रांमध्ये, संयंत्रांमध्ये सौर इंधनाचा वापर करायची आवश्यकता आहे. अशा तऱ्हेने धरतीवर जितक्या ऊर्जेची आवश्यकता आहे त्यापेक्षा अधिक ऊर्जा पृथ्वीच्या पृष्ठभागावर उपलब्ध आहे हे समजते. ह्या पद्धतीने कोळसा आणि पेट्रोलियम ह्यांचा उपयोग बंद केला जावा, त्याऐवजी वनस्पती तेलं, प्रवाह शक्ती आणि सौर ऊष्मा ह्यांचा उपयोग करु शकतो. आतापर्यंत जे खड्डे केलेले आहेत ते बुजवायला पृथ्वी स्वतःच किती सक्षम आहे हे त्यानंतरच परीक्षण होऊ शकेल.

अजून एक तिसरी तलवार माणसाच्या मानेवर लटकते आहे. जेव्हा ह्या पृथ्वीवर पाणी तयार होण्याची घटना झाली असेल तिच्या मुळाशी शोध केला तर असेच लक्षात येईल की, ब्रह्मांडातील किरणांच्या संयोगाने ही  घटना घडलेली आहे. ब्रह्मांडातील किरणे हाच ह्या घटनेचा एकमेव स्रोत आहे, तो आता निरंतर झालेला आहे. आता पृथ्वीच्या वातावरणाचा क्षय झालेला आहे. ह्यामुळे अशीही शक्यता आहे की त्याच ब्रह्मांडातील किरणांनी जर विपरीत पद्धतीने प्रभाव टाकला तर पृथ्वीवर पाणी संपू शकते. ज्या ज्या स्रोतांनी पृथ्वीचे आवरण खराब झालेले आहे, ते शास्त्रज्ञांना

माहिती झालेले आहे. पण फक्त स्रोत माहिती झाला म्हणून बिघाड ठीक होईल असे नाही, तर त्याला ठीक करण्याची आवश्यकता आहे. ठीक कसं करायचं, तर पृथ्वीवर जे जे अत्याचार केलेले आहेत, त्यांना थांबवायला हवं. खनिज तेल, कोळसा, विषारी गॅस आणि विषारी पातळ पदार्थांना मानवाने युद्धसामग्री रुपात बनवलेले आहे. त्यानेच पृथ्वीचे संरक्षण कवच खराब झाले आहे, असे पेपरमध्ये वाचण्यात येते. जर हे खरे आहे तर पृथ्वीचे वातावरण खराब करणाऱ्या ह्या सगळया प्रक्रियांना थांबवावं लागेल. बिघाड झाल्यानंतर त्याला ठीक करण्याचा सुद्धा मानव विचार करतो, हा एक खूप मोठा गुण (त्याच्यापाशी) आहे. बाकी जीवांमध्ये असे होत नाही. पण पृथ्वीच्या बिघाडाला ठीक करण्यासाठी मानवाने अजूनपर्यंत काही केलेले तर नाहीच, शिवाय रोज आणखीनच अधिक बिघडलेलं दिसतं. कुठपर्यंत करणार? हा बिघाड ठीक करण्यासाठी काही करणार की नाही?

मानवाला सुरक्षित पद्धतीने जगण्यासाठी पृथ्वी उपाय करत आली आहे, पण मानवाने आपल्या बुद्धिने पृथ्वीबरोबर विद्रोह केला, आक्रमण केलं आणि शोषण केलं. आदिकाळापासून मानवाने पृथ्वीच्या वातावरणाला बिघडवण्याचे काम केले आहे, विज्ञान युग आल्यानंतर अधिक बिघाड झाला आणि आपण संकटात सापडलो. एखादा माणूस नदीत बुडाला तरी तो वर येऊ शकतो ही शक्यता आहेच, त्यामुळे हे आपल्या विचारांवर अवलंबून आहे की आपण पृथ्वीला वाचवण्याची शक्यता आचरणात आणतो की नाही.

विचारांनीच परिस्थिती निर्माण होते, इच्छा असेल तर परिस्थिती अनुकूल होते, नसेल तर प्रतिकूल होते. आपली बुद्धी भ्रमित झाल्यामुळे वास्तविकतेचे, निसर्गातील वातावरणाच्या महिमेचे मूल्यांकन करण्यात आपली चूक झाली, त्यामुळे आपण

विविध प्रकारांनी क्षतिग्रस्त झालो आणि प्रकृतिला क्षतिग्रस्त केले. क्षतिग्रस्त करेपर्यंत आपण खुशीने राहू पण स्वतःची तीच स्थिती होणार ह्या शक्यतेने आपण घाबरतो सुद्धा. हे झाले मागचे विश्लेषण. मानव संचेतनेने जर मानव व्यवस्थेमध्ये जगायला तत्पर झाला तर 'जीवन विद्या' एकाकडून दुसऱ्याकडे पोहोचते ह्याचे प्रमाण मिळेल. एका शाळेमध्ये आम्ही ह्याला तयार केले आहे. ह्याचे शुभ परिणाम पाहिल्यानंतर वाटते की ह्याच्या लोकव्यापीकरणाची आवश्यकता आहे.

अपूर्ण समज असल्याशिवाय कुणीही मानव कुकृत्य करत नाही. मला वाटतं की प्रत्येक मानव शुभाकांक्षी आहे आणि शुभ होण्यासाठी जबाबदार आहे, त्यामुळे कधी न कधी सर्वशुभ व्हावे ह्यासाठी आपली जबाबदारी त्याला जाणवेल. सर्वशुभ गोष्टीची जाणीव करण्याच्या अर्थानेच 'जीवनजागृती' आहे. सुविधा संग्रह करण्यातून मुक्त व्हावे आणि भक्ती, विरक्तिऐवजी स्वस्थ समाज रचनेसाठीच समजदारी, 'जीवनजागृती' ह्या विषयांवर चर्चा करावी असे वाटले. बुद्धिमध्ये होणाऱ्या बोध आणि संकल्प क्रियांचे प्रमाणीकरण तेव्हाच होईल जेव्हा बुद्धिमध्ये न्यायबोध, सत्यबोध, धर्मबोध होईल. जेव्हा हे तिन्ही बोध होतात, तेव्हा बुद्धिला सद्‌बुद्धी म्हणतात, त्यामुळे सर्वशुभ होण्याची जबाबदारी मानव स्वीकारतो. अस्तित्व काय आहे हे समजल्यानंतर सह - अस्तित्व रुपात ते नित्य वर्तमान आहे ह्याचा आपल्याला बोध होतो, ह्याचंच आम्ही अध्यापन करतो. ह्याची एक झलकः- गणिती पद्धतीने आपल्याला विखंडन पद्धत कळाली. त्या पद्धतीचा उपयोग करुन आपण अधिकाधिक शक्तिशाली अणुबॉंब कसे बनवायचे हे शिकलो. नाश करण्या शिवाय अणुबॉंब बनवण्याचे आणखी काही प्रयोजन असूच शकत नाही. जितका नाश करायचा होता, तितका केला (उदा. हिरोशिमा) त्याच्याशिवाय नाश करण्यासाठी वारंवार जे प्रयोग केले गेले, त्याने वातावरण अजूनच  खराब झाले आहे. मूठभर

लोकांनी केलं हे, पण भोगणारे मात्र सातशे कोटी. नाश करण्यासाठी जे काही केलं, त्यामुळे सामान्य माणसाचे नुकसान झाले, ते कसे? गणिती पद्धतीने ‘वर्तमान’ शून्य होऊन जाते आणि वर्तमानाची गणती करता येत नाही, पण आहे ह्याच्या उलट, नित्य वर्तमान आहेच. वर्तमानाशिवाय काही असतच नाही. अस्तित्वाचे सगळे वैभव म्हणजे नित्य वर्तमान असणे हे आहे, पण विखंडन पद्धतीने वर्तमानच नाही. अशा तऱ्हेने खोट्या गोष्टींच्या थप्पी इतक्या बनवल्या आहेत की त्यातून वर यायला मानवाला स्वतःवर विश्वास ठेवावा लागेल. जोपर्यंत अणुबॉंबवर, तलवारीवर, झेंडयावर, दगडावर माणूस विश्वास ठेवेल तोपर्यंत माणूस माणसावर विश्वास ठेवणार नाही, हे खरे आहे आणि स्वतःवर तेव्हाच विश्वास होईल जेव्हा स्वतःला समजून घेईल. स्वतःला समजण्यासाठी प्रत्येक नर, नारीला न्याय, धर्म, सत्य ह्या गोष्टींना अचूकपणे समजून घ्यावे लागेल, हे ‘जीवन’ प्रकाशन आहे. न्याय कुठून समजतो, संबंधांच्या आधारावर. धर्म कुठून येतो, व्यवस्थेतून येतो. सत्य कुठून येते, अस्तित्वामधून. सह - अस्तित्व ढंगाने अस्तित्व नित्य प्रभावी आहे. मानवाला सोडून बाकी तिन्ही अवस्थांचे संपूर्ण वैभव व्यवस्थेमध्येच आहे.

व्यवस्थेमध्ये असण्याची व्याकुळता कुठल्या न कुठल्या अंशाने मानवा मध्ये पण सामावलेली आहेच. भ्रमित (प्रचलित) पाठ्यपुस्तकांना वाचून व्यवस्थेचा बोध होत नाही. व्यवस्थेचा बोध झाल्यानंतर व्यवस्थेमध्ये जगण्याबरोबरच मानव, धर्माचे पालन करण्यास योग्य होतो. ‘व्यवस्थेमध्ये’ जगणे हाच मानव धर्म आहे. अस्तित्वामध्ये प्रत्येक वस्तुचे व्यवस्थेमध्ये राहणे, व्यवस्थेमध्ये भागीदारी करणे हेच धर्माच्या रुपाने दिसते. पदार्थावस्थेचा धर्म अस्तित्व (असणे) हा आहे. पुष्टिसहित अस्तित्व हा प्राणावस्थेचा धर्म आहे. जगण्याची आशा, पुष्टिसहित अस्तित्व रुपामध्ये जीवावस्थेचा धर्म प्रकाशित आहे. ज्ञानावस्थेचा (मानव) धर्म

निरंतर अस्तित्व, पुष्टी, आशेसहित सुखधर्मी असणे पाहिले आहे. सुख हाच मानव धर्म आहे. सुख कसे मिळेल? समाधानाने. व्यवस्थेमध्ये जगून समाधान मिळेल. व्यवस्थेमध्ये जगणे माणसाच्या समजदारीवर अवलंबून आहे आणि समजदारी म्हणजे काय तर अस्तित्व, 'जीवन' आणि मानवीयतापूर्ण आचरण ह्यांचा बोध होणे.

व्यवस्थेचा बोध झाल्यानंतर स्वाभाविकपणे व्यवस्थेमध्ये निष्ठा, संकल्प होतो. निष्ठा, संकल्प झाल्यानंतर मानव व्यवस्थेमध्ये जगतो. अशा प्रकारे जगून आपण चांगली परिस्थिती निर्माण करु शकतो, म्हणून मानवीय शिक्षा विधिचा अंगीकार करावा लागेल जेणेकरुन सद्‌बुध्दी उदयाला येईल. ह्या पृथ्वीला सर्वनाशापासून वाचवण्याचा ह्याशिवाय अजून कोणताही उपाय नाही. ही गोष्ट आपल्याला समजायला हवी, ह्याची आवश्यकता आहे. जर समजली नाही तर परिस्थितीच आपल्याला समजायला बाध्य करेल, त्यामुळे धर्मानुसार जगणे म्हणजे सार्वभौम व्यवस्थेमध्ये जगणे, अखंड समाजामध्ये जगणे. ह्या पद्धतीने मानवाच्या अखंडतेला मी पाहिलं आहे.

मानव जात एक, कर्म अनेक, मानव धर्म एक. सुखी राहण्यासाठी मानव अनेक प्रकारचे कर्म करु शकतो, अनेक कर्म ह्याचा अर्थ वेगवेगळी कामे. उदा. कपडयाचं काम, मातीचं काम, पिकांचं काम इत्यादी. जोपर्यंत मानव जात एक आहे हे ओळखणार नाही तोपर्यंत मानवाबरोबर शुभ काम तरी कसे करु शकतो? मानव अनेक कामे करेल, त्याच्यासाठी हे स्वाभाविक आहे. अनेक कामे म्हणजे उत्पादनाची कामे. मानव जात एकच आहे हे आपण अशा पद्धतीने स्वीकारु शकतो की सुखी होणं हाच मानवाचा एकमेव उद्‌देश आहे. समृद्ध होणे, समाधानित होणे, अभय असणे आणि सह-अस्तित्वाला निरंतर प्रमाणित करणे ह्या उद्‌देशांना पूर्ण करण्यासाठी जे कार्यक्रम बनवू त्याचा आधार

‘‘मानव जात, मानव धर्म एक’’ हाच आहे. सुखी होण्याचा जो मार्ग आहे त्याचंच नाव आहे धर्म (व्यवस्था). एका देशात, काळात समजदार होऊन व्यवस्थेला प्रमाणित करु शकत असू तर ह्याला प्रत्येक देशात, काळात प्रमाणित करु शकू हेच ह्या प्रस्तावाचे गमक आहे.

‘‘जय होओ, मंगल होओ, कल्याण होओ’’.

भौतिक वस्तुचे उपयोगिता मूल्य निश्चित आहे. शंभर वर्षांपूर्वी एक किलो गव्हामध्ये जे उपयोगिता मूल्य होते तेच आजही आहे. मानवाने जेव्हा ह्यात हस्तक्षेप केला, तेव्हा त्याचे मूल्य कमीच केले (उदा. रासायनिक खत घातले). रासायनिक खतांचा उपयोग करुन माणूस आळशीसुद्धा झाला अणि शेणखत बनवणे बंद केले, हे कितपत खरे आहे, कितपत व्यवहारिक आहे, कितपत माणसासाठी शुभ आहे, कोण उत्तर देणार? समृद्धिसाठी भौतिक वस्तुचे मूल्य आवश्यक आहे. माणसाच्या श्रम नियोजनाचे हे फळ आहे. तीन ठिकाणी भौतिक वस्तुंचा उपयोग होतो, शरीर पोषण, संरक्षण आणि समाजगतिसाठी. सगळया वस्तुंचा उपयोग करायचा आहे त्याशिवाय मानवाला संपूर्ण सुख मिळूसुद्धा शकणार नाही.

सगळे मानव सुखधर्मी आहेत. हे स्पष्ट व सर्वसुलभ न झाल्यामुळेच अनेक मते आहेत. मी जितका व्यवस्थेमध्ये जगतो, ज्या खुबीने आज जगतो उद्या त्यापेक्षा अधिक खुबीने जगू शकतो, उत्तरोत्तर अधिक सुखाने जगणे हाच ‘धर्म’ आहे. प्रश्न असताना सुखी होऊ शकत नाही, समजदारीनेच समाधानाच्या आधारावर सुखी होऊ शकतो. भौतिक वस्तुंच्या आधारावर समाधान मिळवून मग सुखी व्हावे असे होत नाही. समाधान, समजदारी ही अनुभवमूलक विधिने आपल्या बुद्धिमध्ये सामावलेली आहेच. समजदारीच्या आधारावर भौतिक वस्तुंचे उत्पादन करु शकतो आणि सदुपयोग करायचा आहे.

आपल्याजवळ कोणतीही भौतिक वस्तू नसताना आपण समाधानी होऊ असं नाही होऊ शकत. समाधानाबरोबर भौतिक वस्तू सुद्धा आपल्या समृद्धीच्या अर्थाने समाविष्ट असतात. ह्या संतुलित पद्धतीने आपण सुखी होण्याचा मार्ग प्रशस्त करतो. ह्या आवश्यकतांना धार्मिक आवश्यकता म्हणतात. कोणत्याही संप्रदायातल्या रुढी आतापर्यंत सार्वभौम झाल्या नाहीत आणि पुढे

होणार नाहीत. मानवाचे व्यवस्थेमध्ये जगणे, सर्वशुभ सुख ही एकच गोष्ट सार्वभौम होऊ शकेल. मानवाचे व्यवस्थेमध्ये जगणे आणि समग्र व्यवस्थेमध्ये भागीदार होणे मला समजते. माझ्याकडून कुणाला काही त्रास होत नाही. ह्या पद्धतीने आपण ह्या निष्कर्षापर्यंत येतो की समाधानपूर्वक सुख हाच मानव धर्म आहे. व्यवस्थेमध्ये जगणे हेच समाधान आहे. व्यवस्थेमध्ये जगल्यामुळे आपण निरंतर समाधानी आणि सुखी राहतो. 'जीवनच' सुखी होतो, तेव्हा व्यवहारामध्ये समाधान प्रमाणित होते, व्यवहारामध्ये प्रमाणित झाल्यामुळेच हे स्वीकारु शकतो की मानव सुखी आहे.

समाधानासहित अखंड समाज सूत्र व्याख्या रुपामध्ये मानव स्वाभाविकपणे काळा असो की गोरा, बलवान असो की दुबळा, श्रीमंत असो वा गरीब, सगळे लोक सुखी होऊ इच्छितात. ह्यामध्ये अजिबात दुमत नाही. सुखी होण्याच्या प्रक्रियेबद्दल सांगितले गेले. आदिकाळापासून आतापर्यंत इंद्रिय संवेदनांमध्ये सुख शोधण्याचा प्रयत्न झाला, पण त्याने शक्य झाले नाही, त्यामुळे समजदारीच्या आधारावर सुखी होण्याची गोष्ट स्पष्ट झाली आहे. मानवाने स्वतःला आणि सह-अस्तित्वाला समजणे हीच समजदारी आहे.

अस्तित्व एक शाश्वत सत्य आहे. ना कमी होते ना वाढते. ह्याचे प्रमाण काय आहे? आपल्यासमोर आता जितके काही आहे ते वर्तमान आहे. वर्तमान कधी संपत नाही, वर्तमान निरंतर असतेच. ह्या पृथ्वीवर चारही अवस्था राहोत किंवा एक अवस्था. कमीत कमी एक अवस्था कायम राहतेच.भौतिक वस्तू निरंतर असतातच. ह्यांचा कधी नाश होत नाही. भौतिक वस्तू ह्याच रासायनिक वस्तुंमध्ये प्रकाशित होतात, ज्याला रासायनिक उर्मि म्हणतात. दोन प्रकारच्या वस्तुंनी स्वतःचे आचरण सोडून तिसऱ्या प्रकारच्या आचरणात येणे ह्याला रासायनिक उर्मि म्हणतात. रासायनिक

उर्मिमुळेच प्राणावस्थेतील सगळया वस्तुंची निर्मिती झाली आहे. रासायनिक वस्तुंपासून प्राणकोशा (प्राणपेशी) प्राणसूत्र, रचना विधी तिन्ही आपोआप संपन्न होतात. ह्या गोष्टी तयार करण्यात जगातल्या कुठल्याही इंजिनिअर, डॉक्टर, बुद्धिमान माणसाचे योगदान नाही. ह्यामुळे कळते की अस्तित्वामध्ये विकासक्रमाच्या पायऱ्या आहेतच. मानव शरीरसुद्धा विकास क्रमातील एक पायरी आहे, हे तुम्हा आम्हाला समजते. जर मानव आपल्याच क्रमानुसार, क्रियांनुसार, विचारानुसार व्यवस्थेमध्ये जगू शकत नसेल, तर मानवाच्या जगण्यासाठी अनुकूल ही पृथ्वी जर राहिली नाही तर मानव संपूर्णपणे संपून जाईल. बाकी सगळे आहे तसेच राहील. भौतिक रासायनिक वस्तू तशाच राहतील, मानव जात फक्त संपून जाईल. अस्तित्वामध्ये लाभ, हानी असे काही नसते, म्हणजेच अस्तित्व कमी होत नाही किंवा वाढतही नाही. अस्तित्वामध्ये चारही अवस्था निरंतर असतातच. ही अस्तित्वातील स्वाभाविक क्रिया आहे. चारही अवस्था ह्या पृथ्वीवर नाही राहिल्या तर दुसऱ्या पृथ्वीवर असतील. ह्या पृथ्वीला मानवाच्या वसतीसाठी योग्य न राहू देणे ह्यालाच जर मानव विकास समजत असेल तर ह्यापेक्षा अधिक मूर्खपणा काय असेल? ह्या प्रकारच्या अडचणी उभ्या करणारी माणसे, देश, समुदाय ह्यांना बहुतेक लोक विकसित मानतात. ह्यात सुद्धा विचार करण्याचा मुद्दा आहे. आज जिथं आपण पोहोचलो आहोत, त्या ठिकाणी आपल्याला हे तर कळलं आहे की आपल्याच कर्तृत्वाने आपण अडकलेलो आहोत. अडकल्यानंतर बाहेर पडायची आवश्यकता तर आहे. त्याचा प्रस्ताव तुमच्यासमोर आलेला आहे. ह्यावर विचार करायची आवश्यकता आहे. तुमची सौजन्यता ह्याचा आधार आहे. मानव स्वयंस्फूर्त विधिने शुभ इच्छितो, पण भ्रमवश अशुभ प्रवृत्तींच्या मागे पळत राहतो. शुभ प्रवृत्तींकडे मार्ग न मिळाल्यामुळे अशुभ प्रवृत्तींकडे पळतो. शुभ प्रवृत्तींकडे पळण्याचा हा प्रस्ताव आहे, त्याला तपासायची आवश्यकता आहे.

पहिला - मानवीय चारित्र्य (चरित्र) एकच असते. मानवीय चरित्राचे स्वरुप स्वधन, स्वनारी/ स्वपुरुष, दयापूर्ण कार्य व्यवहार ह्या रुपामध्ये असते.

दुसरा- संबंध ओळखल्यानंतर मूल्यं प्रवाहित होतात. संबंधांची ओळख, मूल्य निर्वाह, मूल्यांकन, उभयतृप्ती मिळाल्यानंतर मूल्यांचा निर्वाह झाला असे मला समजले आहे.

तिसरा - तिसऱ्या विधिमध्ये आपण नैतिक तेव्हाच होतो जेव्हा आपण आपल्या तन, मन, धन रुपी अर्थाचा सदुपयोग करतो, सुरक्षा करतो.

ह्या पद्धतीने नैतिक मानव, मूल्यसंपन्न मानव, चरित्रसंपन्न मानव ह्या तिन्ही गोष्टी एकत्र होऊन मानवीय आचरण होते. व्यवस्थेमध्ये जगण्यासाठी हेच तीन आधार आहेत. हेच सूत्र आहे, परिवारामध्ये, समाजामध्ये, व्यवस्थेमध्ये. व्यवसायात, प्रकृतिमध्ये सगळीकडे ह्या आचरणाला व्याख्या दिल्यानंतर, लागू केल्यानंतर मानवीय संविधान माझ्या हाताला लागले राष्ट्रीय चरित्र रुपात मानवीय आचरणच वैभवामध्ये असते. इतिहासात धार्मिक राजनीती, आर्थिक राजनीती ह्याविषयी आपण खूप विचार केला, पण त्या सगळयांचा पराभव झालेला आहे. कुठं न कुठं आपल्यालाच विकल्प शोधावाच लागेल. ह्यासाठी प्रस्ताव हाच आहे की राष्ट्रीय चरित्राचा आधार मानवीयतापूर्ण आचरण हेच असेल. हे समजण्यासाठी कोणत्याही देशात, काळात मानवाला अजिबात त्रास होणार नाही. मानवीयतापूर्ण आचरण सुखाचे एकदा आस्वादन करायची आवश्यकता आहे, त्यामुळे मानवीयतापूर्ण आचरण, मानवीय आचार संहितेच्या रुपातील संविधानाची आपण व्याख्या करतो, तेच समाजशास्त्राच्या रुपात आपल्याला प्राप्त झाले आहे. मानवीयतापूर्ण समाजशास्त्राला

शिक्षेमध्ये समाविष्ट करण्याची आवश्यकता आहे. मानव समजदार कसा होईल, मानवीयतापूर्ण मानवाचे काय वैभव आहे? मानवीयतापूर्ण मानव कुटुंबात, समाजात व्यवस्थेमध्ये कसा जगतो ? हे संपूर्ण समाजशास्त्र आहे, त्याचे वेगळे अध्ययन करण्याची गरज आहे. खूप चांगल्या पद्धतीने मानव वर्तमानामध्ये विश्वास ठेवून जगू शकतो. सह -अस्तित्व वाढत नाही आणि कमीही होत नाही, ह्या परम सत्याच्या रुपात आपण सह-अस्तित्व ओळखू शकतो. सत्तेमध्ये संपृक्त प्रकृती हेच अस्तित्व आहे.

वर्तमान कधीच नष्ट होणार नाही. आपल्या बुध्दिमुळे आपण वर्तमानात असंतुष्ट होतो–राहतो कारण आपण व्यवस्थेमध्ये जगू शकत नाही, त्यामुळे भूतकाळात जातो, कुंठित होतो, त्रासून जातो. भविष्याचा विचार करतो, तेव्हा कुंठित होतो, त्रासून जातो. अव्यवस्था नावाची कोणतीही गोष्ट अस्तित्वामध्ये नाही. अस्तित्व संपूर्ण व्यवस्थाच आहे. मानव जेव्हा कोणतीही वस्तू बनवतो तेव्हा ती बिघडतेच. उदाः यंत्र बनवतो, ते बिघडतेच, घर बनवतो, खराब होतेच, पण मूळ वस्तुचा नाश होत नाही, त्यामुळे घर मोडते, पडते. तेव्हा पुन्हा बनवले तर श्रम नियोजनासाठी आपल्याकडे वस्तू आहेच. 'जीवन' अक्षय बलसंपन्न आहेच, आपल्या अक्षय शक्तींना शरीराचे पोषण, संरक्षण आणि समाजगतिसाठी आपण नियोजित करतो, ह्यालाच मी समृध्दी म्हणतो. दिवसातून एकदा फोन करणे ही माझी आवश्यकता आहे, पण फोन चोवीस तास चालू असतोच हीच समृध्दी आहे. आपल्याला दिवसातून एकदा कुठे जायचे आहे. घरात सायकल दिवसभर आहेच, ह्याला समृध्दी नाही तर काय म्हणणार? एक क्विंटल धान्य खायचं आहे, २० क्विंटल धान्य आपण पिकवलं आहे, हीच समृध्दी आहे. ह्या उदाहरणांनी कळते की स्रोत कायम ठेवल्यामुळे साधने अधिक आहेत, कमी आवश्यकता आहे. सगळया आयामांमध्ये आपण समृद्धी अनुभवू शकतो. समृद्धी अनुभवणे ही आवश्यकता आहे. समृद्धी

अनुभवण्याची एकच पद्धत आहे. परिवाराच्या आवश्यकतेपेक्षा आपण अधिक उत्पादन करावे. हीच समजदारी, समाधान आहे. समृद्धिबरोबर व्यवस्थेमध्ये जगण्याने समाधानाची निरंतरता राहते. समजदारीनंतर, आपल्यामध्ये समाधान निरंतर असतेच. ह्यासाठी कुठे पळावे लागत नाही. हाच सुखास्वादनाचा आधार आहे. जेव्हा समस्येकडे लक्ष जाते, सुखास्वादन करु शकत नाही. ह्याप्रकारे समाधानाच्या अर्थाने समजदारी, श्रम नियोजनाच्या आधारावर समृद्धी तसेच सह-अस्तित्वाबरोबर व्यवस्थेमध्ये जगण्याने अभयाचा अनुभव होतो. ह्या प्रकारे मी पाहिलं आहे, समजलं आहे, जगलो आहे आणि तुम्हांला समजावण्यात समर्थ आहे.

प्रमाणिक होण्याचा अर्थ आहे की मी जे समजलो आहे, त्याला दुसऱ्यांनासुद्धा समजावू शकतो. समजदारीसाठी एकमेव सूत्र आहे– व्यवस्थेमध्ये जगणे, समजणे, न्याय समजणे आणि मानवाला समजायचंच आहे. ह्या समजण्याच्या विधिमध्ये मी सफल व्यक्तिंपैकी आहे. अनुभवामुळे प्रमाणिकता प्रमाणित होते. अनुभव काय आहे? आपण मानलेले असते, जाणलेले नसते, त्यामुळे तृप्ती मिळत नाही. जाणलेले असते, मानलेले नसते तरी सुद्धा तृप्ती मिळत नाही. जाणणे आणि मानण्यामध्ये तृप्ती मिळाल्यानंतर ओळखणे आणि निर्वाह करण्यामध्ये तृप्ती मिळते. आतापर्यंत आपण ओळखले आणि निर्वाह केला, पण आपल्याला तृप्ती मिळाली नाही कारण आपण जाणले आणि मानले नाही. तृप्तिबिंदू कसा काय ओळखणार? समजदारीमध्ये पारंगत होणे म्हणजेच अनुभवमूलक विधिने बोध व चिंतनाने प्रमाणित होणे. त्याच्याबरोबर प्रमाण साक्षात्काराची क्रिया आपल्यामध्येच सहज निरंतर चालू होण्यास सुरू करतो, ह्या क्रमाने त्याचा तृप्तिबिंदू मिळतोच आणि प्रमाणिकतेबरोबर तृप्तिबिंदू मिळतोच, म्हणून प्रमाणिकता हेच स्वतःमध्ये एक प्रमाण आहे. ह्या प्रकारे

अनुभवाला संप्रेषित करण्यामध्ये समर्थ होतो, त्यामुळे अनुभवाला मानव परंपरेमध्ये संप्रेषित करून, अभिव्यक्त करून आपल्याला तृप्ती मिळते, हेच आपले स्वत्व आहे. जेव्हा मी माझा अनुभव तुम्हाला संप्रेषित केला, तेव्हा मी तृप्त झालो हेच माझे अनुभव स्वाभाविक प्रमाण आहे. जर तुम्हाला समजलं तर ही अजूनच उत्सवाची गोष्ट आहे आणि जरी तुम्हांला नाही समजलं तरी माझी तृप्ती माझ्यापाशी आहेच. अनुभवाला मी नित्य संप्रेषित करू शकतो. आतापर्यंत आदर्शवादी विचारांनी काय सांगितलं, तर आपण  अनुभवाला सांगू शकत नाही. 'जीवनाला' ओळखण्याच्या आधारावर हे समजले की, अनुभव ही 'जीवनातील' एक अनुस्यूत (निरंतर) क्रिया आहे. अनुभवाला प्रमाणित करणे हे मानव परंपरेमध्येच शक्य आहे. जाणण्या-मानण्याची क्रिया ही 'जीवनगत' आहे. व्यवस्थेमध्ये जगण्याच्या रूपाने ओळखणे आणि निर्वाह करणे येते. ओळखणे, निर्वाह करण्याच्या क्रमामध्ये आपण मानवाबरोबर असतो. अनुभवामध्ये शरीराचे कोणतेही नियोजन नसते. सरळ मनाचा उत्सव असतो. अनुभवाने उत्सवित होऊन मन सगळया जगाला सांगते, त्यामुळे उत्सवित राहण्यासाठी मूळ तत्त्व तर आत्म्यामध्ये होणारा अनुभवच आहे. मुग्ध होणे, उत्सवित होण्याची वस्तुच आहे, आत्मा. हाच त्याचा महिमा आहे. अनुभवाची वस्तू राहतेच त्यामुळे मन मानवाला अर्पित करते. इतके ते खुशीत असते, त्यामुळे ते अर्पण करतेच. आपल्याला सुध्दा जेव्हा खूप वस्तू मिळतात, तेव्हा आपण त्या अर्पित करतोच. ह्याप्रकारे अनुभव ही इतकी मोठी संपदा आहे की, ती मनात सामावू शकत नाही, सांभाळू शकत नाही, त्यामुळे अनुभवाला व्यक्त करायला सुरूवात करतो.

असं मी पाहिलं आहे, समजलं आहे, अनुभवलं आहे, पण भूतकाळातील वडील मंडळी तर असं म्हणत होती की अनुभव सांगता येत नाही. आता ह्यातली कोणती गोष्ट मानावी ह्याचं

अध्ययन करावं लागेल. मानवाच्या इच्छेने अनुभव सांगता येऊ शकतो, प्रकाशित करू शकतो हेच निष्पन्न होते. घटना रुपात समोर आहे.

अनुभवानंतर येते ते अनुभवाला प्रमाण रुपात प्रस्तुत करणे.आतापर्यंत प्रमाण रूपात यंत्र प्रमाण आणि पुस्तक प्रमाण प्रस्तुत झालेले आहेत. सत्य प्रमाणित केलं गेलेलं आहे असं अजूनपर्यंत झालं नाही. यंत्र प्रमाण हे परिवर्तनशील, बदलणारे आहे, हेच खरे आहे. वैज्ञानिक स्वतःच असं म्हणतात की, हे अंतिम सत्य नसेल, त्यामुळे अंतिम सत्य, पहिले सत्य, मधले सत्य, जवळचे सत्य, दूरचे सत्य हे सगळं कसं समजावं हा मोठा गोंधळ उडाला आहे. सत्य असते किंवा असत्य असते. असत्याचा अर्थ आहे, मानव भ्रमात राहतो. असत्य नावाची कोणतीही वस्तू अस्तित्वामध्ये बनलेली नाहीच. आपल्या अपूर्ण समजेला, भ्रमाला असत्य म्हणू शकतो. सत्याचे अस्तित्व हेच सर्वस्व आहे. सत्य कधी कमी होत नाही आणि वाढत नाही. सत्य सह– अस्तित्व रुपामध्ये आहे. समजदारीबरोबरच सत्य समजते. सह – अस्तित्व हेच परम सत्य आहे.

अस्तित्व समजण्याचं फळ हेच आहे की अस्तित्व स्वतः व्यवस्था आहे. जेव्हा अस्तित्व स्वतः व्यवस्था रुपात आहे, तेव्हा मानव व्यवस्थेमध्ये असण्यासाठी प्रवर्तनशील होणे स्वाभाविक आहे, तेव्हा मला कळलं, मानव धर्म एकच आहे. व्यवस्थेमध्ये जगणे हीच सार्वभौमता आहे. व्यवस्थेमध्ये जगणे हाच मानव धर्म आहे. वर्तमानामध्ये विश्वास करणे हेच सुखी होणे आहे, पण आधी आदर्शवादामध्ये सुखी होण्याचे भक्ती- विरक्तिमध्ये जे उपाय सांगितले त्याचे प्रमाण होत नाही. विरक्ती अवस्थेमध्ये साधनेच्या शेवटी समाधी अवस्थेत पोहोचतो. समाधिमध्ये मी सुखी आहे की दुःखी, हे सांगू शकत नाही. सत्यापित करु शकत नाही, त्यामुळे

असे म्हणतो की सुख दुःखाच्या पलीकडचे आहे. जर तुम्हीसुद्धा समाधी अवस्था प्राप्त कराल, तेव्हा तुम्हीसुद्धा हेच पहाल. समाधी ही एक विचारमुक्त अवस्था आहे, मी हे स्वतः पाहिलं आहे. समाधी होणे ही काही निश्चित घटना नाही, शक्यता आहे. कुणाला केव्हा समाधी होईल हे कोणी सांगू शकत नाही. कशी होईल हे पण ठामपणे सांगू शकत नाही कारण ह्यासाठी खूप विधी आहेत, साधना विधी, योग विधी, ध्यान विधी, पूजा विधी , जप विधी, आगंतुक विधी इ.

व्यवस्थेमध्ये जगायला सुरुवात केल्यानंतर व्यवस्थेमध्ये आपली भागीदारी होते. शिक्षा – संस्कारात भागीदारी करतो, तेव्हा निरंतर उपकार पद्धतीने आपण शिक्षा – संस्कार पार पाडू शकतो. उपकार विधिनेच शिक्षा –संस्कार सार्थक होतो. प्रतिफळाच्या विधिने सार्थक होत नाही. प्रतिफळाच्या विधिने शिक्षा - संस्कार देऊन आपण सत्य बोध, यथार्थतेचा बोध करवू नाही शकत.

मी ह्या विधिने शिक्षा - संस्कार संपन्न करतो. प्रतिफळ (भौतिक वस्तू) मिळण्याचा खाका कधी मनात आलाच नाही. समजदारीला समजावण्यासाठी भौतिक द्रव्याची आवश्यकता नाही. शिक्षा कार्यक्रमात जे अध्यापक आहेत ते स्वतः स्वायत्त, स्वावलंबी राहण्याची आवश्यकता आहे. समजदारीमुळे हे होतं की जो मानव स्वायत्त असेल, त्याचे स्वावलंबी राहणे स्वाभाविक आहे. समजदार मानव परिवार आवश्यक वस्तुंना उत्पादित करेलच, समर्थ राहील आणि उपकार करेलच. प्रत्येक मानवामध्ये सहयोग, उपकार करण्याची प्रवृत्ती असते, ह्याचं सर्वेक्षण करु शकतो. उपकारवादी विधिचे हेच मूळ आहे. लहानपणच्या सहयोग करण्याच्या स्वाभाविक प्रवृत्तिला सुदृढ करत गेलं तर प्रौढावस्थेमध्ये ते मूल उपकारी होतेच. आपल्याला इतकंच करायचं आहे की, शिक्षेमध्ये ह्या स्रोताला सार्थक बनवण्याची आवश्यकता आणि तरतूद हवी आहे.

ह्याला मानवीय शिक्षाच सार्थक बनवेल. यांत्रिक शिक्षा आणि व्यावसायिक शिक्षा ह्याला सार्थक बनवणार नाही. इकडे ध्यानाकर्षण केल्यानंतर हे शक्य आहे की व्यवहार आणि व्यवस्था शिक्षेकडे, प्रमाण शिक्षेकडे आपली प्रवृत्ती होईल. प्रमाणाचा आधार मानवाला व्हायचं आहे. यांत्रिक शिक्षेमुळे, व्यावसायिक शिक्षेमुळे मानव सामाजिक तर नाही होणार. ह्यामुळे मानवाबरोबर अनाचार, अत्याचार होतील न होतील पण पृथ्वीवर अनाचार, अत्याचार नक्कीच होतील. यांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षेमुळे ही पृथ्वी खराब झाली आहे, त्यामुळे त्याचा विकल्प म्हणून मानवीय शिक्षा, व्यवहार शिक्षा, समाधानाने संपन्न शिक्षा, प्रमाण परंपरा स्वाभाविक शिक्षा हवी आहे. अशा शिक्षेसाठी मानवीयतापूर्ण आचरणाला मध्यस्थानी ठेवावे. मानवीयतापूर्ण आचरणाला संरक्षित करण्यासाठी, मानवाला समजदार बनवण्यासाठी प्रस्तुत विकल्पाचे अध्ययन करावे.

आवेश आणि उत्तेजना असलेल्या कामांना मानव लगेच करतो हे मी पाहिलं आहे. जिथे कुठे समाधान, विवेक आहे, कुठल्या प्रयोजनासाठी काम आहे, ते करण्यासाठी दहा वेळा विचार करतो, तेव्हा करतो. लहानपणी अशी प्रवृत्ती नसते. लहानपणानंतर जसजसे प्रौढ होत जाऊ तसतसे आपल्यामधील भयामुळे सहयोग करण्याच्या प्रवृत्तिबद्दल शंका होऊ लागते आणि प्राधान्य क्रमामध्ये ती प्रवृत्ती खाली येते, त्यामुळे उशीर होतो आणि जी निकट परिस्थिती होती, ती बदलते. बदलल्यानंतर अजूनच शंका होऊ लागते, त्यामुळे योग्य गोष्टी होऊच शकत नाहीत ह्या ठिकाणी माणूस आला आहे. आपण योग्य करुच शकत नाही हा मानवाने निर्णय घेतला आहे. दुसरीकडे मानवाला व्यवस्था हवी आहे. व्यवस्था कशी सर्वसुलभ होऊ शकेल, तिचं लोकव्यापीकरण कसं होऊ शकेल ह्यासाठी हा प्रस्ताव आहे. ह्यासाठी मानवाला समजदार व्हावंच लागेल.

मानवाने स्वत:मध्ये मानवीयता पूर्ण आचरणाला प्रत्येक आयाम, कोन, दिशा, परिप्रेक्ष्यामध्ये प्रमाणित करणे हीच व्यवस्था आहे, त्यामुळेच समाधान, समृद्धी, अभय, सह - अस्तित्व फळाला येते. हेच फळ मिळण्यासाठी मानव अनंत काळापासून त्याची वाट पाहतो आहे.

आता मानवाने आपल्या आवश्यकतेला उपयोगी मानले आहे, दुसऱ्याच्या आवश्यकतेला उपयोगी मानलेले नाही, त्यामुळेच एक माणूस दुसऱ्या माणसाचे, एक परिवार दुसऱ्या परिवाराचे, एक समुदाय दुसऱ्या समुदायाचे, एक देश दुसऱ्या देशाचे शोषण करतो. ह्या गोष्टी साक्षीला असताना हे समजतं की मानव धर्माला, मानवीयतापूर्ण आचरणाला आपल्याला लगेच समजून घेण्याची, ओळखण्याची गरज आहे आणि ह्याच शरीर यात्रेमध्ये त्याला चरितार्थ करण्यासाठी निष्ठा आणि साहस ह्यांना जमवावं लागेल. प्रमाणित होण्यासाठी निष्ठेची जोड देणे ह्याला संकल्प म्हणतात. व्यवस्थेमध्ये जगण्याची निष्ठा, प्रमाणिकतेला अभिव्यक्त, संप्रेषित करण्यासाठी निष्ठा. निरंतर न्यायप्रदायी क्षमतेला नियोजित करत राहणे, न्यायाने राहणे, न्यायासाठी जगणे ही झाली तिसरी निष्ठा. ह्या प्रकारे न्याय, धर्म, सत्यासाठी निष्ठा असेल. पूजा, अर्चा, ध्यान ह्यासाठीची जी निष्ठा आहे, हे सगळे ज्या आवश्यकतेसाठी करतो आहे त्या गोष्टीला पुष्ट करते, मजबूत करते, तिलाच मोठं बनवते. ह्यानंतर आहे तीव्र जिज्ञासा. सर्वमोक्षासाठीसुद्धा हेच सगळं केलं जातं असं म्हटलं जातं. अनादिकाळापासून ह्यालाच शुभ कार्य मानलं जातं. लोक परंपरमध्ये ह्याला स्वीकृती दिली गेली, सन्मान दिला गेला. खूप लोकांना ह्याच्यामुळे बरं वाटतं. तात्कालिक स्वरुपात बरे वाटले तरी आपण व्यवस्थेमध्ये जगलो असे होत नाही.

पूजा, अर्चा, ध्यान ह्या गोष्टींवर मला विश्वास वाटतो असे

नाही पण एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच त्यांचा प्रभाव आहे. त्याच्यानंतर जी मोक्षाची इच्छा आहे, त्याचे शेवटचे ध्येय समाधी हेच आहे, समाधिमध्ये ना काही मिळवायचे असते ना काही गमावायचे असते, त्यामुळे मी असा निष्कर्ष काढला की भक्ती-विरक्ती पद्धतीने, संग्रह करण्याच्या पद्धतीने कोणतीही व्यवस्था निर्माण होत नाही. मग मानवाने जगायचे कसे? समाधान, समृद्धी, अभय, सह-अस्तित्वाने जगावे हेच मानवीयतापूर्ण जगण्याच्या कलेचे स्वरुप आहे. हे मी जगलेलो आहे, हे सार्थक आहे, तुम्हीसुद्धा जगू शकता. प्रत्येकाला ह्याला जगून प्रमाणित करायचे आहे ह्या जागी मी आलो आहे. सार्थक गोष्टींचा सगळे जण स्वीकार करतात, सगळे पूज्य मानतात, त्यामुळे मानवीयतापूर्ण आचरण मानव जातीसाठी स्वत्व, सार्थक आहे. अस्तित्वामध्ये प्रत्येक मानव व्यवस्थेमध्ये जगू इच्छितो, हाच त्याचा धर्म आहे. त्या आधारावर मानवत्वाला तो स्वीकार करतो. त्याला प्रमाणित करणे हेच जागृतिचे प्रमाण आहे. मानवीयतापूर्ण आचरणाला जेव्हा मी प्रमाणित केलं तेव्हा मला बोध झाला की मानवत्व हेच आपलं स्वत्व आहे, वैभव आहे आणि त्याचे सुख भरभरुन वहायला लागले. मी असे समजतो की, संपूर्ण मानव जात सुद्धा मानवत्वासाठी तहानलेली आहे. मानवत्व हे मानवाचे स्वत्व आहे, त्याला सोडून तो कुठेही पळून जाऊ शकणार नाही, आज नाहीतर उद्या त्याठिकाणी यावेच लागेल. प्रत्येक मानवामध्ये मानव परंपरेसाठी मोठी संपदा सामावण्याची अपार शक्यता आहे. प्रत्येकाची इच्छा, आवश्यकता आणि उत्सवाच्या आधारावर प्रमाण आहे.

गादीवर कुणी न कुणी बसलेला होताच, त्यालासुद्धा सुख, स्वराज्य, स्वतंत्रता मिळाली नाही. गादीकडे टक लावून पाहणाऱ्यांना सुद्धा सुख, स्वराज्य मिळाले नाही, त्यामुळे असे लक्षात येते की आतापर्यंत सगळयांचे हात रिकामे आहेत. हा

रिक्तपणा भरुन काढण्यासाठी प्रत्येकामध्ये मानवत्व समाहित आहेच. मानव जागृत होण्यासाठी मानवीय शिक्षा हाच विकल्प आहे.त्यासाठी मी प्रयत्न केला आहे, खुशीसाठी केला आहे. कुणावर उपकार करण्यासाठी, उपकार लादण्यासाठी केलेला नाही. अनुभव बोध होण्याच्या आधारावर बुद्धिचे प्रवर्तन होते. (अनुभव प्रमाणिकता आहे- प्रमाणिकतेचा बोध बुद्धिमध्ये होतो) त्यालाच संकल्प म्हणतात. संकल्पाच्या आधारावर अभिव्यक्त, संप्रेषित होण्याची इच्छा होते, प्रमाणित करण्याची प्रवृत्ती होते. मी प्रमाणित करुन पाहिलं आहे, हे सगळयांसाठी आवश्यक आहे. हे जाणून घेऊन पुढचा कार्यक्रम प्रस्तुत करण्यास सुरुवात केली.

पहिल्या प्रयत्नात 'जीवन विद्या' योजना होती, ज्यामध्ये चिंतनापासून सुरुवात करुन संकल्पापर्यंत 'जीवन क्रियांना' स्पष्ट केले. संकल्पापर्यंत जो पोहोचला आहे, त्यानुसार जगण्याच्या कलेसाठी स्वाभाविक पद्धतीने चित्रण होते. ह्याआधी संवेदनांच्या आधारावर जगण्यासाठी चित्रण होत होते. आता त्या जागी प्रमाणिकतेने जगण्याच्या कलेसाठी चित्रण सुरु होते. उपकार विधी हे त्याचे स्वरुप आहे. उपकार विधिने जेव्हा आपण आपल्या सामान्य आकांक्षा, महत्त्वाकांक्षा ह्यांचे चित्रण करतो तेव्हा हेच दिसून येते की जेव्हा आपण स्वतः स्वायत्ततेने समाधान, समृद्धी ह्यांना प्रमाणित करतो, तेव्हाच आपण उपकार करण्यायोग्य होतो. अशी योग्यता आपण कुठेही लपवू शकत नाही. स्वाभाविकपणे ती उपकारासाठी नियोजित होते. ह्या उपकार विधिने आपल्या सामान्य आकांक्षा, महत्त्वाकांक्षा मर्यादित होतात. ह्या सूत्रामध्ये आवर्तनशील अर्थशास्त्र सामावलेलेच आहे, समीचीन (निकट) आहे. मानव त्याला समजू शकतो. जागृतिनंतर समजतेच. अशाप्रकारे आवर्तनशील अर्थव्यवस्थेबरोबर (अर्थ=तन, मन, धन,) आपण धार्मिकतेमध्ये (धर्मनीती) (व्यवहार, उत्पादन, व्यवस्था) नियोजित होतो. शिक्षेमध्ये नियोजित करतोच. अशाप्रकारे

मानवाला सगळीकडे नियोजित होण्याची संधी असतेच आणि ही संधी, नियोजित करण्याची पद्धत आपोआप (स्वयंस्फूर्त) येते.

आधुनिक परंपरेमध्ये शिक्षा झाल्यानंतर मानव उत्पादनापासून दूर जायला लागतो आणि अधिकाधिक सुविधा संग्रह करण्यासाठी तहानलेला असतो. जेव्हा जागृतिनंतर व्यवस्थेमध्ये मानवीयतापूर्ण विधिने चित्रण करतो तेव्हा आपल्या सामान्य आकांक्षा आणि महत्त्वाकांक्षा सदुपयोगाच्या आधारावर सीमित होतात आणि थोडयाशा साधनांनी आपल्या आवश्यकता पूर्ण होतात. ह्या विधिनेच व्यवहारिक चित्रण सुरु होते. ह्या पद्धतीने आपण आपल्याच 'जीवनाच्या' महिमेमुळे व्यवस्थेमध्ये जगण्याचे चित्रण करतो, त्यामुळे निरंतर सुखाने जगण्याचा क्रम चालूच राहतो. जोपर्यंत शरीर काल आहे, तोपर्यंत सुखाने जगण्याची सगळी व्यवस्था, सगळे नियम, विधी, नीती इ. वर्तमान होतात. ह्यावरुन चित्रणाची सार्थकता समजते. चिंतनाची सार्थकता न्याय, धर्म, सत्यामध्ये साक्षात्कार चिंतन करणे हीच आहे. चित्रणानुसार सार्थकतेच्या अर्थाने विश्लेषण होतेच. त्या आधारावरच चयन होते. खूष होतोच आणि आस्वादन होते. मूल्यांचेच आस्वादन होते. 'जीवन' मूल्य, स्थापित मूल्य, शिष्ट मूल्य, वस्तू मूल्य ही मूल्ये आहेत.

वस्तू मूल्य नेहमी एकसारखेच असते. उदा. १ किलो तिळामध्ये जे उपयोगिता मूल्य आहे, ते नेहमी एकसारखेच असते. ह्या प्रकारे औषध, तांदूळ, गहू, वनस्पती ह्यांच्यामध्ये त्यांच्या उपयोगाचे मूल्य कायमच असते. त्याला उपयोगिता मूल्य म्हणतात. त्यानंतर मानव जे उत्पादन करतो त्यामध्ये उपयोगिता, सुंदरता मूल्य जोडले जाते. उपयोगितेबरोबर सुविधेच्या अर्थाने सुंदरता जोडली जाते तर सार्थकता आहे. ह्या पद्धतीने विश्लेषणाचे स्वरुप तयार होते. आपण उपयोगी, सार्थक होतो,

सुंदर सुद्धा होतो. ‘जीवन’ मूल्ये, सुख, शांती, संतोष, आनंद आहेत. ही ‘जीवनाच्या’ स्वाभाविक तारम्यतेचीच नावे आहेत. मन आणि वृत्तिमध्ये संगीत असल्यानंतर सुख, वृत्ति आणि चित्तामध्ये संगीत असल्यानंतर शांती, चित्त आणि बुद्धिमध्ये संगीत असल्यानंतर संतोष आणि बुद्धि व आत्म्यामध्ये संगीत असल्यानंतर आनंद आहे, एकूण हे ‘जीवन’ संगीत आहे. जेव्हा आपण अनुभवमूलक पद्धतीने जगतो तेव्हा ‘जीवन’ संगीत स्वाभाविक आहे, ‘जीवन’ स्वाभाविक अपेक्षा आहे, ‘जीवन’ स्वाभाविक उपलब्धी, सार्थकता आहे. जेव्हा आपण सार्थकतेबरोबर संबंधांना ओळखतो, तेव्हा ‘जीवनामधून’ मूल्ये प्रकट व्हायला लागतात. उदा. आई जेव्हा आपलं मूल ओळखते, तेव्हा ममता आपोआप स्रवायला लागते. त्यासाठी कोणत्या पंचवार्षिक योजनेची आवश्यकता नाही, मूल्यं शोधायची किंवा एकत्र करण्याची आवश्यकता नाही. ‘जीवनामध्ये’ मूल्ये समाहित आहेतच, संबंधांना ओळखल्यांनतर ती नियोजित होतील. संबंधांची ओळख कुटुंबाच्या, समाजाच्या, व्यवस्थेच्या, सह - अस्तित्वाच्या अर्थाने आहे. ह्या चारही प्रकारच्या संबंधांच्या खुंट्या आहेतच. आपल्याला पारंगत होण्याची आवश्यकता आहे. जितके आपण पारंगत होऊ तितक्या विशाल रुपात आपण स्वतः प्रमाण प्रस्तुत करण्यामध्ये, सार्थकता प्रस्तुत करण्यामध्ये समर्थ होतो. ह्याप्रकारे मूल्यांचे आस्वादन करायला लागतो. आपल्यामधून निष्पन्न झालेल्या मूल्यांचे मूल्यांकन ‘जीवन’ करतोच. वस्तू मूल्य सगळीकडे पसरलेले आहेच, पण ‘जीवन’ मूल्य, मानव मूल्य, स्थापित मूल्य ‘जीवनामध्येच’ आहे आणि ‘जीवन’ स्वतःच त्याचं मूल्यांकन करतो. किती सहज आणि मोठं काम आहे. ह्यासाठी बाहेरुन कुठूनही संयंत्र लावण्याची आवश्यकता नाही. स्वतःला, स्वतःपासून, स्वतःसाठीच परीक्षण करायचे आहे. ह्याची सगळयांना गरज आहे. सगळयांसाठी ह्याची सुलभ शक्यता बनवण्यासाठी विधी कोणती असावी हा विचार येतो. नियम,

नियंत्रण, संतुलन, न्याय ह्या मुद्यावरच शिक्षा- संस्काराचे कार्य संपादित होते. जेव्हा हे व्यवस्थितपणे होते, संपादित होते, तेव्हा 'जीवन' जागृत होतो, त्यामुळे संबंध ओळखण्यात समर्थ होतो. संबंधांना प्रयोजनाच्या  अर्थाने ओळखतो, त्यामुळे माणूस सुखी होतो. ह्या विधिने आपण मूल्य आस्वादनापर्यंत पोहोचलो. नंतर येते ते तुलन. प्रिय, हित, लाभ ह्या विधिने प्राणी, जीव तुलना करतात. मानवाची तुलन करण्याची विधी न्याय, धर्म, सत्य ही आहे. हा ध्रुव बिन्दू आहे. ह्याला पकडून ठेवायची, स्वीकारण्याची आवश्यकता आहे जेव्हा आपण ह्यांना स्वीकारतो, तेव्हा आपले प्रयत्न ह्या दिशेने होतात. आतापर्यंत जे काही शिक्षा - संस्कार, मूल्यांकन मानवाने केले ते सगळे संवेदनांच्या आधारावर केले ते अपुरे झाले, त्यामुळे सार्वभौम परंपरा तयार झाली नाही, म्हणून तुलनमधील प्रिय, हित, लाभ ह्यांचा न्याय, धर्म, सत्यामध्ये विलय करण्याची आवश्यकता आहे, म्हणजेच न्यायपूर्ण प्रिय, न्यायपूर्ण हित आणि न्यायपूर्ण समृद्धी.

न्यायाच्या दृष्टिने लाभाच्या ऐवजी समृद्धी येते. न्यायाने उत्पादन करुन आपण समृद्धिपर्यंत पोहोचतो आणि संग्रह विधिने आपण शोषणापर्यंत पोहोचतो. शोषणामुळे आपल्या स्वतःची आणि सगळया जगाची क्षति होते.ह्याचे अचूकपणे अध्ययन करण्याची आवश्यकता आहे, स्वीकारण्याची आवश्यकता आहे, ह्यावर दृढ संकल्पाला स्थापित करायची आवश्यकता आहे, म्हणून मानवीय शिक्षेची आवश्यकता आहे, त्यामुळे प्रत्येक मूल स्वायत्त होईल अणि सहा सद्‌गुणांनी पूर्ण होईल–

| | |
|---|---|
| १. स्वतःमध्ये विश्वास | २. श्रेष्ठतेचा सन्मान (सम्मान) |
| ३. प्रतिभेमध्ये संतुलन | ४. व्यक्तित्वामध्ये संतुलन |
| ५. व्यवहारामध्ये सामाजिक | ६. व्यवसायामध्ये स्वावलंबी |

असा स्वायत्त मानव परिवारामध्ये स्वतःहून समाधान आणि समृद्धि आपोआप प्रमाणित करेल, त्यामुळे समाज सूत्र, व्यवस्था सूत्र आपोआप निष्पन्न होते. अखंड समाज सूत्र व्यवस्था स्वाभाविक सूत्र व्याख्येचे उद्गम स्थळ परिवार आहे ह्याला मी पाहिलं आहे. हे व्यवस्थितपणे सार्थक होते. ह्यानंतर येते ते व्यवस्थेचे स्वरुप. समजदारीनंतर व्यवस्था आपोआप उद्गमित होते, वहायला लागतेच.

प्रत्येक अभिभावक आपल्या मुलांना शिकवतातच. नंतर शिक्षा संस्थांमध्ये शिकवतात, नंतर राजगादी, धर्मगादी आपल्या पद्धतीने शिकवतात. ह्यातून आपण जी शिक्षा प्राप्त केली, त्यामुळे मानव झालो नाही. आता विचार, प्रयत्न, प्रमाण इतकेच आहे की आपण मानव हे मानवत्वाने संपन्न होऊ शकू. मानव परंपरा बनू शकेल. ह्याने नैसर्गिकतेचे संतुलन आणि मानवामध्ये न्यायाची स्थापना होईल. न्यायाने व्यवस्थेत जगायचेच आहे, हे कुठले दुर्गम काम आहे ? तरी पण मानवाला त्याची आवश्यकता जाणवण्याची गरज आहे. आतापर्यंत जे काही केले ते संवेदनांच्या आधारावर केले आहे, ह्यामुळे आपला हव्यास पूर्ण होणार नाही, ह्यामुळेच पृथ्वी नष्ट झाली, मानव तर झालाच आहे, त्यामुळे भरभराट व्हायची असेल तर मानवीयतेला ओळखलंच पाहिजे. मानवीयतापूर्ण व्यवस्थेमध्ये जगावं लागेल आणि त्याच्या निरंतरतेची शक्यता आहे. वर्तमानामध्ये मुद्दा हा आहे की नैसर्गिकतेबरोबरचे अपराध थांबायला हवे. व्यवस्थेचे स्वरुप आहे–

१. शिक्षा -संस्कारामध्ये भागीदारी
२. न्याय -सुरक्षेमध्ये भागीदारी
३. उत्पादन -कार्यामध्ये भागीदारी
४. विनिमय- कोषामध्ये भागीदारी.
५. स्वास्थ्य - संयमामध्ये भागीदारी

ह्या पाचही आयामांमध्ये भागीदारी करणे म्हणजे व्यवस्थेमध्ये भागीदारी आहे. जागृतिने प्रत्येक माणसाद्वारे ही व्यवस्था उद्‌गमित होते, प्रत्येक माणसामध्ये प्रमाणित होते. अशाप्रकारे थोडक्यात व्यवस्थेविषयी सांगितले. प्रत्येक बुद्धिमान माणूस ह्याला स्वीकारु शकतो.

कोणताही मुद्‌दा कळेपर्यंत त्याला शोध, अनुसंधान म्हणतात. शोध किंवा अनुसंधान केलेली वस्तू जेव्हा आपण प्रमाणित करतो तेव्हा त्याचे शिक्षा- संस्कार विधिने लोकव्यापीकरण करणे तुम्ही आधीपासूनच जाणत आहात. लोकव्यापीकरण करणे हा पहिला मुद्‌दा आहे. लोकव्यापीकरण करताना जे शिक्षक आहेत ते अध्ययन विधिने, व्यवहारिक विधिने, तर्कसंगत विवेक, विज्ञान विधिने पारंगत असतील. पारंगत होणे म्हणजे अवधारणा स्पष्ट होणे. अवधारणेनंतर प्रत्येक मानव आपल्याच प्रवृत्ती, प्रयत्न आणि आवश्यकतेमुळे प्रमाणिक होऊ शकतो. प्रमाणिक होण्याची आवश्यकता प्रत्येक मानवामध्ये सामावलेली आहेच. जेव्हा तुम्हांला हे जाणवेल की प्रमाणित होणे हे नितांत आवश्यक आहे, तेव्हा तुम्ही तरी गप्प थोडेच रहाल? तुम्ही सुद्धा प्रमाणित व्हाल. आधी अनुसंधान विधिने, नंतर शोध विधिने मी मिळवले, माझ्याकडून जे मिळवतील ती असेल अध्ययन विधी. अध्ययन झाल्यानंतर, बोध झाल्यानंतर स्वतःची जबाबदारी सुरु होते. बोध झाल्यानंतर प्रमाणित करतोच. एखाद्या अवधारणेचा बोध झाल्यानंतर जेव्हा प्रमाणित करण्यासाठी प्रगल्भ होतो आणि जगाला सांगायला जातो तेव्हा आपण अनुभूत होतो. त्यानंतरच दुसऱ्यांना बोध होऊ शकतो. ह्या विधिने प्रत्येक व्यक्ति अनुभव झाल्यानंतरच दुसऱ्यांना बोध करुन देईल. केवळ बोलण्याने बोध होणार नाही. काही गोष्टी आपण ऐकल्यानंतर आपल्याला बोध होतो. आपण अनुसंधान करतो. मी असेच केले, पण अधिकाधिक लोक अध्ययन करतील, अनुभव करतील आणि प्रमाणित

करतील, असं मला समजतं.

मला परंपरा जशी समजली आहे, तिला मी चार भागांमध्ये प्रस्तुत करतो. १. शिक्षागद्दी २. धर्मगद्दी ३. राजगद्दी ४. व्यापारगद्दी हेच परंपरेचे कर्णधार आहेत. ह्यामध्येच वेगवेगळया प्रकारे प्रत्येक व्यक्ती प्रवास करते. मी असं पाहिलं आहे की परंपरा पूर्णपणे जर्जर झालेल्या आहेत, त्यामुळे ह्यामध्ये प्रवास करणाऱ्याला त्या काही देऊ शकणार नाहीत. पण ह्या चारही परंपरा इतकी शेखी मिरवतात आणि म्हणतात की आम्ही हे सगळे काही तुम्हाला तारण्यासाठीच सुरु केलेलं आहे. पण ह्यातून तरुन जाणारा एकही माणूस दिसलेला नाही. त्या ऐवजी जो तारणारा आहे, तो सुद्धा ह्यामध्ये बुडालेला दिसतो. ह्या आधारावर मी म्हटलं की, सगळया परंपरा नासलेल्या आहेत, बेकार झालेल्या आहेत. सार्थकतेचा स्रोत मानवच आहे. प्रत्येक मानव कमीत कमी ५१% पेक्षा अधिक सार्थक आहेच. मानवामध्ये सुधार होऊ शकतो. परंपरा सुधारण्यापेक्षा दुसरी परंपराच स्थापित होईल. परंपरा सुधारणार नाहीत, सुधार होण्याची वस्तू त्यामध्ये नाही.

सार्थक शिक्षा असेल अथवा निरर्थक, सार्थक राज्य असेल अथवा निरर्थक; शिक्षेची, राज्याची परंपरा तर असेलच. जसं सध्या राज्याचं मूळ तत्त्व शासन आहे, त्याचा आधार संविधान आहे; संविधानाचं मूळ आहे शक्ती केन्द्रित शासन. ह्याचा अर्थ आहे, चुकीला चुकीने थांबवा, युद्धाला युद्धाने थांबवा, अपराधाला अपराधाने थांबवा. ह्यामुळे माणसाला काय हवे आहे, थांबवल्याने सुधारणार आहे का ? जितकं थांबवायला गेलो तितके अपराध, युद्धे वाढतच गेली. हे तर सगळयांच्या समोर आहे. व्यापाराचे व्यसन शोषणापासून वेगळे होऊ शकत नाही. धर्माचे कोणते व्यसन आहे तर सगळयांना आश्वासन देणे आणि सन्मान मिळवणे.

आश्वासन कोणते द्यायचे? पापी लोकांना तारणार, स्वार्थी लोकांना परमार्थी बनवणार, अज्ञानी लोकांना ज्ञानी बनवणार. ह्या आश्वासनांच्या पूर्ण होण्याचे कोणतेही प्रमाण मिळाले नाही . संपूर्ण मानव जातीने आजपर्यंत हाच विचार केला की मानव चुकीचा आहे, परंपरा ठीक आहेत. इथेच मी माणसाचे डोळे उघडू इच्छितो की परंपरांना डोळे नाहीत. मी परंपरेशी देव घेव करत नाही. मी एक माणूस आहे, मी माणसांशी संबंधित आहे.

आता मी चार परंपरांबद्दल बोललो, त्यामध्ये असण्याऱ्या लोकांमध्ये सुधारण्याची जिज्ञासा नाही. ह्या सत्ताचे धार्जिणे असलेल्यांमध्ये आणि ह्या सत्तांच्या दस्तऐवजांमध्ये जिज्ञासेचा आधार नाही. ह्या आधारावरच त्या नासून गेलेल्या आहेत. पण प्रत्येक माणसाच्या कुठल्या तरी कोपऱ्यात जिज्ञासेचा उदय असतोच, ह्या आधारावरच मी म्हणतो की माणूस ५१% पेक्षा अधिक ठीक आहे.

आतापर्यंत तर रस्ते बनवणे, पक्की घरे बांधणे, उद्योग सुरू करणे ह्यालाच विकास म्हणत आहेत, एवढेच नाही तर प्रत्येक तालुक्यात तुरुंग बनावा ह्यालासुद्धा विकास म्हणतात. चमकणाऱ्या घराला विकास म्हणतात. ह्याला माझा फार काही विरोध नाही कारण मानवाच्या सामान्य आकांक्षा, महत्त्वाकांक्षेमध्ये जी साधने हवी आहेत, त्यामध्ये हे सगळे येतेच. परंतु ह्याचा उपयोग करण्यासाठी सामाजिक चेतनेची आवश्यकता आहे. यांत्रिक चेतना असेल तर आपण चुका आणि अपराधांकडे वळू. कुठे ना कुठे मानवाला सामाजिक, व्यवहारिक व्यवस्थेच्या चेतनेची आवश्यकता आहे. ह्या चेतनेची भरपाई करण्यासाठीच 'जीवन विद्या' तुमच्यासमोर ठेवली आहे. त्यानंतर शिक्षेच्या मानवीकरणाचा, त्यानंतर परिवार मूलक स्वराज्य व्यवस्थेचा प्रस्ताव आहे. ह्या तिन्ही प्रस्तावांच्या आधारावर एक दृष्टिक्षेप

टाकला तर आपण जितका कमीत कमी पृथ्वीला त्रास देऊ, घायाळ करु तितके अधिक दिवस आपण टिकू शकू. पृथ्वीला नष्ट करुन माणूस राहणार कुठे? त्यामुळे मानव विकसित झाला त्याचा आधार आहे की तो  परिवारामध्ये समाधान आणि समृद्धिला प्रमाणित करु शकेल, प्रत्येक मानवाला एकाच जातीचा समजू शकेल, व्यवहार करु शकेल आणि मूल्यांकन करु शकेल म्हणजेच सामाजिक होईल. व्यवस्था म्हणजे पाचही आयामांमध्ये भागीदारी करु शकेल. ह्यालाच मी मानवाचा विकास किंवा जागृती म्हणतो. सामाजिक व्यवस्थेमध्ये व्यवहारिक म्हणतो. आतापर्यंत आपले विकासाचे जितके मापदंड आहेत, त्यात सुख मिळाले नाही. सुख मिळवण्यासाठी समाधान, समृद्धी, अभय, सह-अस्तित्व ह्या चारही गोष्टी पूर्ण हव्यात, त्याशिवाय सुख मिळणार नाही.

परंपरेमध्ये डार्विनने सगळयांसमोर जे काही ठेवले आहे, ते म्हणजे शरीर रचनेच्या आधारावर विकास सांगितला आहे. उदा. एखाद्या किड्याची रचना, जळूची रचना, घोडयांची रचना, गायीची रचना तसेच मानवाची रचना. ह्यामध्ये हाडांना आधार बनवलं आहे. हाडांचा प्रकार, त्यांची लांबी, त्यांची रुंदी ह्या गोष्टींना त्याने विकास असे म्हटले आहे.  'जीवन' ज्ञान डार्विनला नव्हतं. 'जीवनाला' ध्रुव मानून त्यांनी काहीही म्हटलं नाही. 'जीवन' आणि शरीराच्या संयुक्त रुपामध्ये मानव आहे. अजूनही विकासाचा शोध शरीरामध्ये, हाडांमध्ये घेतात आणि त्यासाठी नोबेल पारितोषिके असतात, पदव्या असतात, नोकरी पण असते, त्यांच्या विकासाचा ध्रुव मानव शरीर आहे, तर त्यांच्या म्हणण्यानुसार शरीर बनवून मानव तयार होणार होता, तो झाला नाही. शरीराच्या हाडांच्या सीमेमध्ये मानवाची व्याख्या करता येत नाही. त्याचा पुरावा म्हणून डार्विनने स्वतःच लिहिले आहे की मी स्वतः शरीराच्या हाडांच्या सीमेमध्ये व्याख्यायित होत नाही. तो मानवाची व्याख्या करण्यामध्ये असमर्थ होता. रचना विधिमध्ये श्रेष्ठ असल्यानंतर त्याला तुम्ही

विकास म्हणता, पण विकासाचा ध्रुवबिन्दू ‘जीवनच’ आहे. जीवनाशिवाय शरीर कोणतेही काम करु शकत नाही. शरीराला ‘जीवनच’ जिवंत ठेवतो. फक्त ‘जीवनाच्या’ आधारावर नाही, फक्त शरीराच्या आधारावर नाही तर मानव, ‘जीवन’ आणि शरीराच्या संयुक्त आधारावर आहे.

घडणपूर्णतेच्या (गठनपूर्णतेच्या) अर्थाने अणुमध्ये (परमाणुमध्ये) विकास आहे. भौतिक, रासायनिक कार्ये करत असताना प्रत्येक अणू (परमाणु ) घडणशील (गठनशील) आहे. प्रत्येक घडणीमध्ये एकापेक्षा अधिक अंश असतात. प्रत्येक अणुमध्ये (परमाणुमध्ये) मध्यांश आणि त्याच्या चारही बाजूने फेऱ्या मारणारे अंश आहेत. अस्तित्वामध्ये हे सगळे स्वाभाविकपणे आहे, अशा अणुंमध्ये (परमाणुंमध्ये) कमीत कमी दोनपासून अनेक संख्येमध्ये अंश सामावलेले असतात. अनेक जातींचे अणू आहेत. त्यापैकी एका जातीचा अणू आहे –जीवन अणू (परमाणु), ‘जीवन’ परमाणुमध्ये अंश कमी जास्त होत नाहीत, त्यामुळे त्यामध्ये अक्षय शक्ती अक्षय बल असते, ह्यालाच अणुमध्ये (परमाणुमध्ये) विकास म्हणतात, म्हणूनच जीवन अणूला (परमाणुला) विकसित म्हणत आहे आणि विकासानंतर जागृती असते. जागृतिचे प्रमाण आहे जाणणे - मानणे, ओळखणे -निर्वाह करणे. एक अणुअंश (परमाणुअंश) दुसऱ्या अणुअंशाला ओळखतो म्हणून निश्चित अंतरावर राहून व्यवस्था निर्मिती केली आहे. ते व्यवस्था रुपात कार्य करतात. हेच भौतिक रासायनिक क्रियांच्या रुपात गणले जाते. रासायनिक क्रियांची अत्युच्च उत्कर्ष रचना मानव शरीर रुपात ह्या धरतीवर प्रमाणित आहे. शरीराला जीवन मानले हाच भ्रम आहे.

व्यापक वस्तू आपल्याला लगेच समजते. ह्याला तुम्ही रिकामी जागा किंवा सत्ता म्हणा, परमात्मा म्हणा किंवा ईश्वर

म्हणा. ही काय आहे? तर ही मूळ वस्तू, ऊर्जा आहे. ह्यामध्ये सगळी एकके ह्याच्यामुळे प्रेरित होऊ शकतात, ही अशी वस्तू आहे. प्रेरित होणे म्हणजे काय? वरुन धक्का मारतात की काय? आधी असं पण म्हटलं गेलं की एक आधी सुरु झालं नंतर त्याच्या धक्क्याने एक एक करत बाकी सगळे सुरु झाले. सत्तेमध्ये धक्का देणारा कोणताही गुण नाही. ह्यामध्ये तरंग, गती, दबाव ह्यापैकी काहीच नाही, त्यामुळे धक्का देणारं असं काहीच नाही. प्रत्येक वस्तू सत्तेमध्ये संपृक्त राहिल्यामुळे ऊर्जित आहे, प्रेरित आहे हे प्रमाण तर आहेच. हे सगळीकडे विद्यमान आहेच. प्रत्येक एकक व्यापकमध्ये बुडालेले सुद्धा आहे, घेरलेले सुद्धा आहे, असे एक एक वेगळे असण्याचा अर्थच हा आहे की त्यांच्यामध्ये सत्ता आहे. त्यांच्या दरम्यान सत्ता नसेल तर वेगवेगळं होऊच शकणार नाही. मध्ये सत्ता असल्यामुळे जोडले पण जाते. ह्या प्रकारे रचना विरचनेचा आधार झाला आणि भिजलेली असल्यामुळेच वस्तुमध्ये ऊर्जा संपन्नता आहे कारण वस्तु क्रियाशील आहेच.

यथार्थामध्ये पाहिलं तर सगळया वस्तू शून्याकर्षणामध्ये आहेत. पृथ्वी, सूर्य, सौरमाला, आकाशगंगा हे सगळे शून्याकर्षणामध्ये आहेत. शून्याकर्षण स्थितिमध्ये आहे. ह्यामुळे हे स्पष्ट होते की सत्ता आणि एकक ह्यांच्या परस्परतेमध्ये भार नाही. पण एककांच्या परस्पतेमध्येच भार स्पष्ट होतो. उदा. दोन अणुंच्या परस्परतेमध्ये रेणू बनण्याच्या प्रवृत्तिमुळे भार स्पष्ट होतो. ह्याप्रकारे एकापेक्षा अधिक रेणूंच्या निश्चित रचना प्रवृत्तिमुळे भार स्पष्ट झाला, त्यामुळे भार स्पष्ट होतो. अशा प्रकारे एका पेक्षा जास्त रेणू बनण्याची प्रवृत्ती असते. एकके एकमेकांमध्ये भार स्पष्ट करतात, त्याला आपण आकर्षण बल म्हणतो; वास्तव हे आहे की ते विकासक्रमामध्ये भागीदारी किंवा समग्र व्यवस्थेमध्ये भागीदारीच्या अर्थाने आहे. उदाहरणार्थ एखादा दगड जर पृथ्वीच्या वातावरणामध्ये काही उंचीवरुन सोडला तर तो पृथ्वीवरच येतो, हे

त्या दगडामध्ये समाहित विकासोन्मुखी प्रवृत्तिच्या आधारावरच आहे. ही प्रवृत्ती प्रकाशित होताना तिला आकर्षण बल नाव दिलेले आहे. ह्या दोन प्रमाणांनी आपल्याला समजते की सगळे क्रियाशील आहेत. सत्ता पारगामी आहे ह्याचा पुरावा काय तर प्रत्येक एकक क्रियाशील आहे, नियंत्रित आहे, बलसंपन्न आहे. अस्तित्वामध्ये एकक कुठेही असल्यानंतर नियंत्रण, क्रियाशीलता आणि बलसंपन्नता ह्या गोष्टी आहे तशाच राहतात, सत्ता पारगामी असण्याची ही साक्ष आहे.

प्रत्येक एककाला स्वतःचे असे अनंत कोन आहेत. अनंत कोन कोणत्या न कोणत्या दिशेला सरळ रेषेत जातात आणि त्या सरळ रेषेमध्ये ती वस्तू प्रतिबिंबित राहतेच. कोनसुद्धा कुठेतरी, कोणत्या तरी वस्तुवरच जाऊन थबकतो. समोर एखादी वस्तू दिसेपर्यंत तो कोन जातच राहील. जिथे वस्तू मिळते तिच्यावर वस्तू प्रतिबिंबित राहते. ह्या ढंगाने वस्तू प्रकाशमान आहे हे ह्यावरुन सिद्ध होते. वस्तू प्रकाशित आहे हे कोणत्या प्रमाणाबरोबर म्हटले तर प्रत्येक वस्तुमध्ये प्रकाश सामावलेला आहे. ह्या प्रकारे प्रत्येक एककामध्ये अनंत कोन सामावलेले आहेत हे स्पष्ट होते. ते प्रकाशमानतेच्या अर्थानेच आहे. तुमचे प्रतिबिंब माझ्यावर असल्यामुळेच तुमची प्रकाशमानता मला समजते.

लक्ष्य आणि दिशाविहीन स्थितिमध्ये मानव अडकल्यामुळे दिशा आणि लक्ष्यापासून वंचित तर झालेला आहेच, त्यामुळे त्याच्या योजना आणि कार्यक्रमामध्ये निश्चितता काही होऊ शकत नाही. लक्ष्य स्थिर असेल, दिशा निश्चित असेल तर कार्यक्रम सुद्धा निश्चित होऊ शकतात. ह्यामध्ये तात्विक रुपात विवेकानुसार विज्ञान, विज्ञानानुसार विवेक ह्या दोघांचा ताळमेळ, संगीत किंवा गतिच्या रुपात आपल्याला प्राप्त होते. मुख्य गोष्ट हीच आहे, लाभोन्मादरुपी अर्थव्यवस्थेचे लक्ष्य जर शोधायला

सुरुवात केली तर फक्त संग्रह, सुविधा, भोग, अतिभोग हेच आहे. त्याची निश्चिती कधीच होऊ शकत नाही. सुविधा संग्रह करण्याचा तृप्तिबिन्दू नाही. ह्या पृथ्वीवर राहणाऱ्या सातशे कोटी मानवांपैकी कोणा एकालाही ह्या सुविधा संग्रह करण्यामुळे तृप्ती मिळालेली नाही, ना मिळू शकेल ना ह्याचे प्रमाण देऊ शकेल. दिशाविहिनता आणि लक्ष्यविहिनता ह्यांचे हे प्रमाण आहे. जर लक्ष्य आणि दिशा निश्चित असेल तर आपला कार्यक्रम सुद्धा निश्चित होतो. ह्यामध्ये कधीच तृप्ती मिळणार नाही म्हणून लाभोन्माद म्हणालो, पण सतत अतृप्त राहून त्यामध्ये रत राहणे, ह्यालाच मी उन्माद म्हटलं. हे संग्रहाचे स्वरूप मी पाहिलेले आहे. तुम्हीसुध्दा पाहू शकत असाल. संग्रहाचा आणखी विस्तारच होतो आहे, कमी होत नाही, मग हा संग्रहाचा विस्तार करून आपण कोणते लक्ष्य प्राप्त करणार आहोत, कुठे पोहोचून आपल्याला तृप्ती मिळणार आहे? ह्या सुविधांचा संग्रह आपल्याला मिळाला तरी त्यांचे नियोजन भोग, बहुभोग, अतिभोग ह्यांच्या सीमेमध्येच होऊ शकते आणि त्याचे गम्य स्थान नाहीच. आजपर्यंत भोगामुळे कुणी तृप्त झालं आहे असं नाही. ह्या दोन गोष्टींच्या साक्षीमुळे असा निष्कर्ष निघतो की हा उन्माद नाही तर अजून काय आहे? ह्या प्रकारच्या उन्मादाने सातशे कोटी मानव उन्मादित होतील, त्यापासून कोण वेगळा होऊ शकणार? ह्या प्रश्नाला दूर करण्यासाठीच अनुसंधान करुन सर्वशुभ सुखाची इच्छा आहे, निश्चय हवा आहे, निरंतरता हवी आहे. हे सगळे मिळून अनुसंधानाची वस्तू आहे. अर्थव्यवस्था हा एक अंश सुद्धा त्यातच आहे. तन, धन, मन रुपात अर्थ आहे. तन असेल, मन असेल, धनसुद्धा असेल. ह्या तिन्हींमधील एकाही गोष्टीला वेगळं करुन अर्थशास्त्र होत नाही. आतापर्यंत शिकवलेल्या अर्थशास्त्रानुसार मुद्रेला अर्थ म्हणाले आहेत, पण आतापर्यंत मुद्रा दोन प्रकारच्या आहेत असं सांगितलं १) धातू मुद्रा २) पत्र मुद्रा. पत्र मुद्रा एखाद्या छापखान्यातच छापली जाते. छापण्याची जी टेक्नॉलॉजी आहे, जे तंत्र आहे त्याचे लोकव्यापीकरण झाल्याने

नकली नोटा सुद्धा छापल्या जातातच, त्यामुळे सध्याच्या अर्थशास्त्राची जी कीर्ती गायली जाते ते पत्र मुद्रा आणि धातू मुद्रा विज्ञान आहे. धातू मुद्रा आणि पत्र मुद्रा आपल्याकडे कितीही असली तरी त्यापासून जोपर्यंत आपल्याला हवी असलेली वस्तू मिळत नाही तोपर्यंत त्या मुद्रेने आपले पोट भरत नाही. त्याने आपली तहान भागत नाही, त्यामुळे त्याला काय मानावे? वस्तुचे प्रतीक प्राप्त झाल्यामुळे वस्तू प्राप्त होत नाही. अशा प्रकारे मुद्रा प्राप्त झाली म्हणजे आपल्याला वस्तू प्राप्त झाली हे आपण मानलेलं आहे, ह्यालाच वेडेपणा म्हणतात. त्याचे निराकरण करण्यासाठी तन, मन, धनरुपी अर्थाला मी प्रस्तुत केलेलं आहे. इथे धन ह्या शब्दाचा अर्थ सामान्य आकांक्षा आणि महत्त्वाकांक्षा संबंधी वस्तू आहेत म्हणजे आहार, आवास, अलंकार, दूरदर्शन, दूरश्रवण, दूरगमन ह्यासंबंधी आवश्यक वस्तू आहेत, त्यामुळे आपल्याला आवश्यक असणाऱ्या वस्तुंचा उपयोग होईल, संग्रह होणार नाही. उदा. धान्य उत्पादन केल्यानंतर एक, दोन, चार वर्षे ठेवू. आणखी ठेवावं लागलं तर ते नासून जाईल, खराब होईल. त्याच प्रकारे एखाद्या उपकरणाचा, यंत्राचा उपयोग केला नाही तर त्याला आपोआप गंज चढेल आणि ते संपून जाईल, त्यामुळे आपण जी यंत्रे तयार करतो ती उपयोगासाठी आहेत त्यांचा संग्रह करता येणार नाही. संग्रह केला तरी एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच. जितका अधिक आपण संग्रह करायला जाऊ तितकं अधिक ते त्रासदायक होतं, त्यामुळे त्यांचा अवश्य उपयोग होतो. उपयोगितेनंतर सदुपयोगिता आणि प्रयोजनशीलतेसाठी सगळया वस्तुंना नियोजित केले जाऊ शकते. मी एक फारच वैशिष्टयपूर्ण गोष्ट बघितली आहे, कोणत्याही वस्तुचे उत्पादन करताना मन गुंतणे आवश्यक आहे, मनानंतर तन म्हणजे शरीर त्याच्याबरोबर असणे आवश्यक आहे. मन आणि तन ह्यांच्या संयोगानेच सगळया वस्तुंचे उत्पादन होते. त्यामुळे ह्या पद्धतीने कदाचित आपण एक अवधारणा स्वीकारु शकतो की वस्तूचा अर्थ आहे

सामान्य आकांक्षा आणि महत्त्वाकांक्षा ह्यांच्याशी संबंधित वस्तू. ह्या निर्णयाने काय फायदा होईल? मानव जातीचे मन उत्पादनाकडे लागायला सुरुवात होते. आतापर्यंत अर्थशास्त्राचा डंका वाजवून आपण शिकल्या – सवरल्या मानवाच्या उत्पादनाच्या प्रवृत्तिला निरर्थक म्हटले किंवा त्याला समूळ नष्ट केले आहे. त्याचा नाश केलेला आहे. त्यानंतर आणखी स्पेशलाइझेशनविषयी गप्पा मारतात. त्यामध्ये उत्पादन कार्य करण्याची प्रवृत्ति अजूनच संपून जाते. अशा तऱ्हेने संपून गेलेल्या माणसाला चांगला माणूस म्हटले जाते. असा चांगला माणूस बनल्यानंतर उत्पादन केल्याशिवाय त्यांना सगळे काही हवे आहे, सगळयात अधिक त्यांनाच हवे आहे. अशा प्रकारे उत्पादन न करण्याची प्रवृत्ति आणि जास्तीत जास्त सगळया वस्तू प्राप्त करण्याची इच्छा ह्या दोन्ही गोष्टी मिळून जगाबरोबर द्रोह, विद्रोह, शोषण करणे आवश्यक होते. ह्या पद्धतीने माणूस अडकलेला आहे. ह्यापासून मुक्त व्हायला हवं आहे. मला मुक्ती मिळालेली आहे, मला कुणाचे शोषण करण्याची आवश्यकता नाही, द्रोह, विद्रोह करायची गरज नाही. परिश्रम करुन मी स्वतः आपल्या आवश्यकतेपेक्षा अधिक उत्पादन करतो. तुम्ही सुद्धा करु शकता. आवश्यकता किती आहे ते कुटुंबातच ठरते. व्यक्तिमध्ये किंवा जगामध्ये ठरत नाही. कुटुंबाच्या आवश्यकतेपेक्षा जास्त उत्पादन केल्यानंतर आपल्याला समृद्धिचा अनुभव होतो. ह्या प्रकारे आवर्तनशील अर्थव्यवस्थेचे अध्ययन करण्याची गरज वाटायला लागली. निश्चित रुपात रचना करुन हिन्दी भाषेमध्ये सगळया जगासमोर त्याला ठेवले आहे. लोकांना जर ते समजलं तर त्याने उपकार होतील, त्यामुळे जगातील कोणत्याही माणसाची, केव्हाही, कोणत्याही परिवाराची, कुठेही क्षति होणार नाही. झाला जर उपकारच होईल. आपल्याला सुद्धा शोषणविधिपासून मुक्त व्हायचे आहे, द्रोह, विद्रोह ह्यापासून मुक्त व्हायचे आहे. ज्या राजनीतीने स्वतःहूनच कूटनीतीचा अंगीकार केला आहे त्याने कुठेच अभय, शांती, मनःस्वास्थ्य लाभणार नाही.

शांततेसाठी, सौख्यासाठी आवर्तनशील अर्थव्यवस्था पाहिजे. उदा. तन, मन, धनरुपी अर्थाला प्राकृतिक ऐश्वर्यावर मी नियोजित केलं तेव्हा नियोजनाने उत्पादित झालेली वस्तू आपल्या शरीराचे पोषण, संरक्षण आणि समाजगती ह्यांचा आधार बनते. ही समाजगती, पोषण, संरक्षण ह्यांच्या आधारावर आपण पुन्हा वस्तुंची निर्मिती करण्यायोग्य होतो, ह्या पद्धतीने ही आवर्तनशील विधी आहे. मानव आपल्या शक्तिचे विचार शक्तिबरोबर, शरीराद्वारे प्राकृतिक ऐश्वर्यावर श्रमाचे नियोजन करतो म्हणून वस्तुंची निर्मिती होते. आपल्याला जितक्या वस्तू हव्या आहेत त्यापेक्षा अधिक आपण निर्माण करु शकतो, अतृप्तीपासून मुक्त होण्याच्या जागी आपण पोहोचतो. आधीपासूनच आपण तृप्त होऊ इच्छितो, सुखी होऊ इच्छितो, त्यामुळे तृप्तिचा उपाय शोधतो, उपाय शोधता शोधता सापडला तर तो स्वीकारतोच. सोडण्यासाठी कोणतीही गोष्ट ह्यात नाही, चुकीच्या गोष्टींना योग्य गोष्टींमध्ये बदलायची गोष्ट आहे, अपराधाला न्यायामध्ये बदलणे, युद्धाला सह-अस्तित्वामध्ये बदलणे, द्रोहाला सौजन्यतेमध्ये बदलणे, विद्रोहाला मैत्रीमध्ये, शोषणाला उपकारामध्ये बदलायची गोष्ट आहे. ह्या सगळयांना आपण स्वीकारतोच. सातशे कोटी लोकांना विचारुन पहा की त्यांना द्रोह, विद्रोह, शोषण, युद्ध ह्या गोष्टी हव्या आहेत की नाही? सगळे म्हणतील, नको आहे. माझ्या मतानुसार अतृप्त राहण्यासाठी कोणीही माणूस तयार होत नाही. ह्या आवर्तनशील अर्थशास्त्रामुळे संपूर्ण मानव जात द्रोह, विद्रोह, शोषण, युद्ध ह्या पासून मुक्त होऊ शकते. वेडया माणसाला जशी बरे होण्याची इच्छा असते तशीच लाभोन्मादी अर्थव्यवस्थेमध्ये राहूनसुद्धा आवर्तनशील अर्थव्यवस्थेची आकांक्षा माणसामध्ये आहे. आपल्यामधल्या आकांक्षेला जागृत करणे हा मुद्दा आहे. प्रत्येक मानवामध्ये शुभाकांक्षा असतेच, तिला जागे करणे महत्त्वाचे आहे. ह्या जागृतिच्या प्रक्रियेमध्ये आवर्तनशील अर्थव्यवस्था एक

अविभाज्य स्वरुप आहे, श्रम नियोजन, श्रम विनिमय हा त्याचा मूळ सिद्धांत आहे. ह्यामधूनच आपल्या महत्वाकांक्षा, सामान्य आकांक्षेशी संबंधित वस्तुंची निर्मिती करायची आहे. आवर्तनशील अर्थव्यवस्था असणे हेच वर्तमान आहे, प्रकृती स्वाभाविक आहे, नियती आणि सह - अस्तित्वानुसार आहे, त्यामुळे आपल्याला त्याचे संपूर्ण अध्ययन करायला हवे आहे, जीवनामध्ये चरितार्थ करायला हवे आहे आणि स्वतः संतुष्ट होऊन (दुसऱ्यासाठी) संतुष्टिचा स्रोत व्हायला हवे आहे.

आता जे काही काम चालले आहे, ते ओढाताणीने चाललेले आहे, अशी प्रचलित द्वंद्वात्मक भौतिकवादाची परिकल्पना आहे. एकाचा नाश, दुसऱ्याचा विकास होतो असा विचार केला. ह्या आधारावर जे बलवान आहेत ते राहण्यायोग्य आहेत, दुर्बळ आहेत ते राहण्यायोग्य नाहीत असं द्वंद्वात्मक भौतिकवादानुसार मानलं जातं. अस्तित्वामध्ये कोणतीही ओढाताण नाही, हे मी पाहिलेलं आहे. एकमेकांची बलसंपन्न असलेली स्थिती मी बघितली आहे, एका अणुचा अंशसुद्धा बल संपन्न आहे, अणुसुद्धा बलसंपन्न आहे, रेणू, रेणुरचित पिंड हे सगळे बलसंपन्न आहेत, हे एकमेकांबरोबर देव- घेवीच्या रुपात पूरक होण्यास योग्य आहेत म्हणून विकास आहे. अस्तित्वाला समजून द्वंद्वात्मक भौतिकवाद लिहिला जाऊ शकत नाही. आपल्या बुद्धिचा अचूक उपयोग न झाल्यामुळेच आपण असा विचार करु शकतो. मी राहीन, बाकी सगळे नष्ट होईल, आमचा धर्म राहणार, बाकी सगळयांचा नाश होणार. आम्ही धरतीवर राहणार, राज्य करणार, इतरांचा नाश होईल. अशा घोषणा, गोंधळ रोज ऐकायला मिळतो, ह्या सगळया शेखचिल्लीच्या गोष्टी आहेत. ह्यांच्यामुळे कुणाला निश्चित दिशा, लक्ष्य मिळालेले नाही, ना मिळेल. दिशा आणि लक्ष्य निश्चित झाल्यानंतरच निश्चित कार्यक्रम तयार होतात, हे मी पाहिलं आहे. ह्याचं मी अध्ययन करतो,

जे अध्ययन करु इच्छितात, त्यांना अचूक अध्ययन करवतो हे माझं रोजचं काम आहे, ह्याद्वारे मी आपल्यावर मोठा उपकार करतोय, असंही नाही, हेच माझे काम आहे, जसं हवा आपलं कार्य करतेच, पाणी आपलं काम करतंच तसंच हे माझं काम आहे, आपलं काम मी करतो. मला दृढ विश्वास आहे, आतापर्यंत जितके दिवस, जितके क्षण, जितकं मी काम केलं आहे हीच अवधारणा, हाच उद्देश ठरवून केलं आहे. मला प्रत्येक वळणावर मुद्दा, कार्य - व्यवहार, उत्पादन, विनिमय अशा प्रकारे प्रत्येक ठिकाणी सहजतेने समाधान मिळत जाते. ह्याने मी सुखी आहे, माझं कुटुंब सुखी आहे. मला असं दिसतं, प्रत्येक कुटुंब सुखी होऊ इच्छितं, प्रत्येक मानव सुखी, समजदार होऊ इच्छितोच, कोणीही मूर्ख होऊ इच्छित नाही, त्यामुळे मूर्खालासुद्धा मूर्ख म्हटल्याने तो शिवी देईल आणि आपल्यालाच मूर्ख म्हणेल, त्यामुळे अस्वीकृत असं कोणीही स्वीकारु शकत नाही. मूर्खपणा, ओढाताण, द्वंद्व, द्रोह, विद्रोह, भांडण मला स्वीकृत नाही. भौतिकवादी म्हणतात, द्रोह-विद्रोहाशिवाय काहीही होऊ शकत नाही. ह्याच्या विकल्पामध्ये समाधानात्मक भौतिकवादाच्या दृष्टिने अस्तित्वात जी कुठली गोष्ट आहे, ती बलसंपन्न आहे. बलसंपन्नतेचा उपयोग आहे, सदुपयोग आहे, प्रयोजनशीलता आहे, जागृत ‘जीवनात’ असणारा हाच स्वाभाविक सुगंध आहे. विज्ञानानुसार विवेक होऊ शकतो हाच मुद्दा आहे. विवेकाचा अर्थ आहे प्रयोजन, म्हणजे प्रयोजन विज्ञानानुसार व्हावे आणि विवेकानुसार विज्ञान व्हावे. विज्ञानानुसार विवेक ह्याचा अर्थ आहे की मानव हा प्रयोजनांचे विश्लेषण करण्यायोग्य होतो. जर मानव प्रयोजनांचे विश्लेषण करु शकत नाही तर आपला तर्क अपुरा आहे. आतापर्यंत विज्ञानवादी नियम हेच सांगतात की आम्ही तर्कसंगत भौतिकवाद दिलेला आहे. तेव्हा पहिला तर्क हाच समोर येतो की मी काय आहे? कोण आहे? का आहे? आणि आपली शांती, अशांती, सुख, दुःख हे कसे निर्माण होतात? ह्याच्यामुळे आपण दुःखी का होतो, खूष का

होतो? ह्याचे उत्तर विज्ञानाने मिळत नाही, त्यामुळे खोट्यापासून सुरुवात करुन आपण सत्य मिळवू शकत नाही. समाधान आहे, अस्तित्वामध्ये नियती आहे, नियतिक्रम आहे. नियतिक्रम ह्याचा अर्थ आहे, समाधानाच्या दिशेने गती. समाधानात्मक भौतिकवादामध्ये ह्या गोष्टीला समजवायचा प्रयत्न केला आहे.

ह्याच आधारावर व्यवहारात्मक जनवाद आहे, मानव सुखी होऊ इच्छितो आणि समाधानानेच सुख, समस्येनेच दुःख. समाधान हवेच आहे, ते कसे मिळेल ? व्यवहारानेच मिळेल. कसे मिळेल ? संबंध, मूल्य, मूल्यांकन आणि उभयतृप्तिनेच समाधानित होऊ. ज्यावेळी आपण संबंधांना ओळखत नाही, त्यावेळी आपण समस्यांनी घेरले जातो, संबंधांनुरुप मूल्यांचा निर्वाह करत नाही तेव्हाही आपण समस्येने ग्रासले जातो. ह्या चारही (संबंध, मूल्य, मूल्यांकन, उभयतृप्ती) गोष्टी असल्यानंतर समाधान मिळते. ह्या चारही गोष्टी एकत्र आल्यानंतर चार समस्यांच्या बदल्यात एक समाधान असते. माणूस समस्यांनी, प्रश्नांनी दबून गेलेला आहे. समस्याच फक्त दिसतात, माणसाचा पत्ताच नाही. राजनैतिक, सांस्कृतिक, सामुदायिक, आर्थिक समस्या अंतहीन होऊन माणसाला त्याने झाकले आहे ही ह्याची साक्ष आहे. प्रत्येक माणूस, प्रत्येक पिढी, ह्या सगळयांचा त्यामुळे कण्हत कण्हतच शेवट होतो. व्यवहारानेच मानव समाधानित होतो असं प्रतिपादन व्यवहारात्मक जनवादमध्ये आहे. दोन स्थितिंमध्येच आपण व्यवहार करतो, एक नैसर्गिक संबंधांमध्ये आणि एक मानव संबंधांमध्ये. नैसर्गिक संबंधांमध्ये आपण जितके काही व्यवहार करु ते नियम, नियंत्रण, संतुलन ह्या अर्थानेच करणार, त्याने आपल्याला समाधान मिळते, नाही तर समस्यांनी ग्रसित होतोच, जसे सध्या झालेले आहोत. काहीही विचार न करता आपण टेक्नॉलॉजीची कामे केलेली आहेत, धरतीचे पोट फाडले, त्यामुळे कष्टग्रस्त आहोतच. ह्या समस्यांमुळेच मानव ह्या पृथ्वीवर राहील अथवा नाही हे एक मोठे प्रश्नचिन्ह आहे.

मला असे वाटते की प्रत्येक स्थिती, गतिमध्ये प्रत्येक मानव समाधानित होऊ शकतो, हेच व्यवहारात्मक जनवादामध्ये प्रतिपादन आहे. संबंध, मूल्य, मूल्यांकन, उभयतृप्ती हेच ह्याचे सार आहे. ह्यानेच आपल्याला सर्वतोमुखी समाधान मिळते. आवर्तनशील विधिने आर्थिक समाधान मिळते. मानव संचेतनावादी मनोविज्ञानामुळे सांस्कृतिक विधि मिळते. मानव हे ज्ञानावस्थेचे एकक आहे. संज्ञानशीलतेनेच तो स्वतःला प्रमाणित करु शकतो. संबंध असणे म्हणजे वर्तमानामध्ये विश्वास असणे. व्यवस्थेमध्ये जगणे आणि सह-अस्तित्वाला प्रमाणित करणे. ह्या पद्धतीने व्यवहारात्म्क जनवादाचे सर्वतोमुखी समाधानाच्या अर्थाने प्रतिपादन आहे.

प्रत्येक मानव हा 'जीवन' आणि शरीर ह्यांचं संयुक्त रुप आहे, ह्या गोष्टीला स्पष्ट केलेलं आहे. मुळात 'जीवन' हा घडणपूर्ण (गठनपूर्ण) अणू आहे. अणुच संक्रमित होऊन चैतन्य रुपात (जीवन) असतो. घडणपूर्ण अणू भारबंधन आणि अणुबंधन ह्यापासून मुक्त असतो. हेच त्याचे वैभव आहे. सह-अस्तित्व विधिने तो समृद्ध मेधस असलेल्या शरीराला चालवण्यायोग्य होतो. नियतिक्रमामध्ये येणाऱ्या ह्या दोन विधी आहेत, म्हणजेच निश्चितपणे अस्तित्व स्वाभाविक निरंतर प्राप्त झालेल्या गोष्टी आहेत. मानव आणि बाकी जीवांमध्ये 'जीवन' आणि शरीर ह्यांचे संयुक्त रुप व्हावे लागते. ह्याला व्यवस्थितपणे पाहिलेले आहे.ह्याचे अध्ययन केले जाऊ शकते. जिवंत राहणे, जिवंत नसणे ,जीवनसंपन्न असणे आणि जीवनाशिवाय असणे हे स्पष्ट होते, अध्ययनाचा हाच केंद्रबिंदू आहे. ह्यामध्ये जीवनासहित असण्याचे जे प्रमाण आहे, ते ज्ञानेंद्रियांच्या व्यापाराने समजते. शरीराद्वारे 'जीवन' जेव्हा प्रकाशित होऊ शकत नाही म्हणजेच ज्ञानेंद्रियांच्या मार्फत काही क्रिया जेव्हा होऊ शकत नाहीत, तेव्हा त्याचा मृत्यू झाला असे म्हणतात. शरीराला जीवनाने सोडून देणे म्हणजे मरणे

किंवा मृत्यू होय. शरीरापासून ‘जीवन’ जेव्हा वेगळा होतो, त्या वेळेपासून मृत झाला अशी घोषणा करतात. अशा शरीराला आपण मानव म्हणत नाही. ‘जीवन’ जोपर्यंत शरीराला चालवतो तोपर्यंतच आपण त्याला मानव म्हणतो. प्रत्येक मानव हे एक विचारशील एकक आहे. जीवांमध्ये विचार करण्याला काही स्थान नाही. वंशानुषंगी रुपातच त्यांचा विचार आहे. मानवाने वंशानुषंगीय विधिने जगायचे ठरवले तरी कल्पनाशीलता, कर्मस्वतंत्रता ह्या गोष्टींमुळे तो खूप दूरवर जाऊन पोहोचतो. जेव्हा वंशानुषंगी जगण्यामुळे म्हणजेच शरीराच्या सीमेमध्ये जर आपला विचार मर्यादित झाला नाही तर त्या स्थितिमध्ये दूरवर पसरतोच, त्यामुळे आपण (म्हणजेच जीवन) शरीराच्या सीमेमध्ये मर्यादित होऊ शकत नाही, त्यामुळे आपल्याच शरीराच्या मर्यादित सीमेपर्यंतचा विचार करुन आपण कधीही तृप्त किंवा समाधानित झालेलो नाही, त्यामुळे आपण सामाजिक सुद्धा होऊ शकलो नाही आणि अखंड समाज सुद्धा बनला नाही ह्या गोष्टी साक्षीला आहेतच. सार्वभौम व्यवस्था आपल्याला मिळालेली नाही. कुत्र्यांची सार्वभौम व्यवस्था आहे, घोडयांची सार्वभौम व्यवस्था आहे, प्रत्येक जीवाची सार्वभौम व्यवस्था आहे. मानव असा कमनशिबी का आहे की त्याची व्यवस्था सार्वभौम होऊ नये? विचार करणे हे आपले स्वत्व आहे. तुम्ही आम्ही गप्प राहू शकत नाही. विचारांना मूक करणे हे आपल्या अधिकारामध्ये नाही. अस्तित्वामध्ये गाढव, घोडा, कुत्रा, गवत, दगड, लोखंड, रत्नं, माणकं ह्या सगळयांचा उपयोग आहे किंवा ते एकमेकांना पूरक आहेत, त्यामुळे मानव असूनही पूरक होणार नाही असे कसे होऊ शकेल ? मूक होणे म्हणजे निसर्ग विरोधी होणे, नियतिविरोधी होणे, विकास विरोधी होणे आणि जागृतिविरोधी होणे. ह्या चारही विधिंनी विरोधी झालो आणि विरोधामुळे समस्या निर्माण झाल्या. हेच झालं.

आपल्या देशात जितक्या काही लोकांनी समाधीसाठी प्रयत्न

केले, त्या सगळया प्रयोगांमध्ये जेव्हा समाधीचे प्रमाण द्यायची वेळ येते, तेव्हा काही लोकांनी गोल मोल विधिने पुरावा सुद्धा दिलेला आहे. ''मी समाधी अवस्थेपर्यंत पोहोचलेलो आहे, समाधीचे हेच फलन आहे, मी ह्याचे प्रत्यक्ष प्रमाण आहे'', असं कुणी म्हणालं नाही. त्यानंतर आले अवतारी पुरुष. अवतारामध्ये मानवाचे जितके दस्तऐवज आहेत त्याद्वारे अंतिम कल्पनांना प्रस्तुत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. शुभ होण्यासाठीच केलं, पण सर्वशुभ घडले नाही. शुभ म्हणजे काय तर समाधान, समृद्धी, अभय, सह - अस्तित्व ह्या गोष्टींना प्रमाणित केलं नाही. अखंड समाज, सार्वभौम व्यवस्था प्रस्तावित, प्रमाणित झाली नाही. प्रत्येक मानव समजदार झाला आहे ह्या गोष्टीचे सत्यापन करण्यायोग्य प्रत्येक मानव झाला नाही. सगळयांना सुख, शांती, संतोष, आनंद प्राप्त झाला नाही. ह्या गोष्टी लक्षात घेऊन ते असफल झाले असं मी म्हणत आहे. त्याउलट भौतिकवादाने सुविधा संग्रहाविषयी सांगितले, त्यामुळे सुद्धा काही साध्य झाले नाही, ते सुद्धा असफल होण्याच्या टेकाडावर येऊन पोहोचले आहेत. मानव संचेतनेतूनच सफल होण्याची गोष्ट होते. मानव संचेतना कुठे असते? जीवनामध्ये असते. शरीरात नसते.

जर कामवासनेने त्रासून जाणे हीच जर जीवनाची मागणी असेल, हेच जर खरे असेल तर हे सगळे कुत्री, मांजरे इ. जीवांमध्ये आधीच झालेले आहे. मग नियतिक्रमामध्ये मानवाच्या असण्याची काय आवश्यकता होती? असं विचारलं तर मानवाच्या असण्याचे कोणतेही लक्ष्य नाहीच हाच तर्क समोर येतो, अजून वेगळेपण काय आहे त्यात? सुखी होणे मानवाचे लक्ष्य आहे. सुखी होण्यासाठी समाधान पाहिजे. समाधानाशिवाय एकही माणूस समृद्धिला प्रमाणित करणार नाही. समाधान सोडून आपण समृद्ध होऊ असे होणार नाही, त्यामुळे ह्यावर विचार करण्याची आवश्यकता आहे. विचार केल्यानंतर मला जे समजलं ते असं–

मानव संचेतनेची संपूर्णता, संज्ञानशीलता आणि संवेदनशीलतेमध्ये व्याख्यायित होते, जाणणे आणि मानणे ह्या दोन गोष्टी संज्ञानशीलतेमध्ये, तर ओळखणे आणि निर्वाह करणे ह्या गोष्टी संवेदनशीलतेमध्ये येतात. संवेदनशीलतेचे जे प्रयत्न आहेत, प्रवर्तन आहेत, ते इन्द्रियमूलक विधिने होतात, त्यामुळे इंद्रिय संवेदनांच्या आधारावर आपण जितके निर्णय घेऊ ते काही काळापुरतेच असणार. त्यामध्ये निरंतरता असणार नाही. उदा. जेवण आवडले म्हणून जेवतच राहिलो, झोपायला आवडते म्हणून झोपतच राहिलो असं होणार नाही. सांगण्याचा अर्थ एवढाच आहे की इन्द्रिय व्यापारामध्ये अशी कोणतीही क्रिया नाही जी आपण सतत करु शकू, त्यामध्ये वारंवार बदल आवश्यक आहे. वारंवार बदल केल्याशिवाय कोणीही माणूस सतत कोणत्याही इंद्रिय व्यापारामध्ये लिप्त होऊ शकत नाही. हा त्रास का आहे ? असे विचारले तर मानवाला संज्ञानशीलतेकडे प्रवृत्त होण्यासाठी, म्हणूनच ही व्यवस्थाच इतकी शुभ आहे की संवेदनशीलतेची भंगुरता ही मानवाला जागृत होण्यासाठी एक घंटी आहे. मानव जागृतिसाठी प्रेरणा आहे, दिशा आहे, माझ्यासाठी, तुमच्यासाठी. हे केव्हा होईल? ह्याला तुम्ही केव्हा सत्यापित करणार ? हा विचार तुमचाच आहे, त्याचे दायित्व पण तुमचेच आहे. मला सगळे काही मिळाले आहे. हे सगळे काही मिळाल्यामुळे मी रोमांचित होणे ही स्वाभाविक गोष्ट आहे. ही किती व्यवस्थित गोष्ट आहे? थोडेसे विचारशील होण्याने माणूस हा विचार करु शकतो आणि त्याच आधारावर मी जे काही प्रयोग केले त्याने हे स्पष्ट झाले की संवेदनशीलता भंगुरशील (क्षणभंगुर) आहे आणि आपल्याला निरंतर सुख हवे आहे. संवेदनांमध्ये आपल्याला सुख भासते सुद्धा, पण सुखानुभूतिची निरंतरता होत नाही. आपली तहान निरंतर सुखाची आहे, अनुभवाशिवाय ती पूर्ण होत नाही. अनुभव निरंतरच असतो. अनुभव क्षणभंगुर असत नाही. ह्या आधारावर निरंतर

सुखासाठी हे आवश्यक होतं. संवेदनांमध्ये भंगुरता स्वाभाविक आहे, हीच व्यवस्था आहे. ह्या आधारावर मी ह्याचे मूल्यांकन करु शकलो. त्यानंतर संज्ञानशीलतेचा अर्थ कळाला; अनुभवमूलक पद्धतीने जीवनाच्या सगळ्या क्रिया अनुप्राणित होणे. हीच मानव संचेतना आहे, हीच जागृत संचेतना आहे, मी स्वतः हे अनुभवलं आहे. मी तुम्हाला ह्याचं अध्ययन करवतो. अध्ययनमूलक पद्धतीने हे सगळं कळेल. ह्याचं वारंवार वाचन केल्यामुळे बोध होण्यासाठी हे सहाय्यक होऊ शकते. जीवन समजल्यानंतर तो मानव संचेतनेचा आधार होतो. मानवीयतापूर्ण आचरण समजल्यानंतर त्याची परंपरा बनते. परंपरेसाठी मानवाने मानवीय व्यवहाराला, मानवीयतापूर्ण आचरणाला समजल्याशिवाय मानव परंपरा होणार नाही. मानवीय आचरण ही अशी एक वस्तू आहे की जी सगळया देशांमध्ये, सगळ्या काळांमध्ये एक सारखीच आहे. आचरण म्हणजे मूल्य, चारित्र्य (चरित्र), नैतिकता ह्यांचे संयुक्त स्वरुप. चरित्र म्हणजे स्वधन, स्वनारी/ स्वपुरुष आणि दयापूर्ण कार्य व्यवहार. तन, मन, धन ह्यांचा सदुपयोग आणि सुरक्षा करणे ही नैतिकता आहे. संबंधांमध्ये समाहित मूल्यांचा निर्वाह करणे, संबंधांमध्ये मूल्यांकन करणे, त्यामुळे उभयतृप्ती होणे हेच मूल्य आहे. जीवनाचे लक्ष्य आहे सुखी होणे, मानवाचे लक्ष्य आहे समाधान, समृद्धी, अभय, सह - अस्तित्व. लक्ष्यासाठी आपण प्रत्येक ठिकाणी नैतिकतेला जोडतो, त्याच अर्थी नैतिकता सार्थक होते, त्याच अर्थी प्रायोजित होऊ शकते. मूल्य विधी सुद्धा हीच आहे, चरित्र विधिमध्ये हेच आहे. दुष्चरित्रामध्ये दुःखी होतो, अनैतिकतेमध्ये दुःखी होतो, मूल्यांचा अनादर झाल्यानंतर दुःखी होतो. अशाप्रकारे मूल्य, नैतिकता, चरित्र ह्यांचा निर्वाह करणे हेच मानवीय आचरण आहे, स्वभाव आहे. अशा आचरणासाठी कुठल्या गोष्टींची आवश्यकता होती? अस्तित्वदर्शन ज्ञान, जीवन ज्ञान आणि मानवीयतापूर्ण आचरणाच्या ज्ञानाची आवश्यकता आहे. ज्ञान काय आहे? सहअस्तित्व विधिने

जाणणे, मानणे हेच ज्ञान आहे. जाणल्यानंतर, मानल्यानंतर तृप्तिबिंदू कोणता आहे हे शोधू शकतो. जाणले नाही, मानले नाही तर तृप्तिबिंदू का म्हणून शोधणार? कुठे शोधणार? उदा. आपण दिल्लीला जाणतो, मानतो म्हणून दिल्लीला जायचा कार्यक्रम बनवतो. जर दिल्लीला जाणत नाही, मानत नाही तर दिल्लीला जाण्याचा कार्यक्रम कसा काय बनवणार ? चंद्राच्या असण्याला मानले आणि चंद्रावर पोहोचलोसुद्धा. जाणण्या आणि मानण्याच्या तृप्तिबिंदूसाठी (आपण) खूप काही करतो, पण प्रामुख्याने करायचे काय आहे? अस्तित्व समजल्यानंतर सह - अस्तित्व समजते, सह - अस्तित्व समजल्यामुळे मानवीयतापूर्ण आचरण होतेच, निष्पन्न होतेच. मानव संचेतनावादी मनोविज्ञानामध्ये ह्या सगळयांवर भर दिलेला आहे. अजून एक गोष्ट आहे, जीवनामध्ये मी १२२ क्रियांना पाहिलं आहे. ह्या १२२ क्रियांपैकी मनामध्ये, वृत्तिमध्ये, चित्तामध्ये, बुद्धिमध्ये, आत्म्यामध्ये किती क्रिया होतात ह्याला स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. ह्याचं प्रयोजन काय आहे?. एकानंतर एक ज्या गोष्टी ऐकायला मिळतात आणि समजतात, तेव्हा तृप्ति बिंदूसाठी अनुभव करणे आपसूकच बनते, त्याने दुसऱ्यांना बोध करवण्याची अर्हता येते, हे ह्याचे प्रयोजन आहे. दुसऱ्यांना बोध झाल्यानंतरच आपल्या संपदेचे प्रमाण मिळते. आपण दुसऱ्यांना समजावल्यानंतरच आपल्या समजदारीचे प्रमाण मिळते. आपण निरोगी असल्यानंतर दुसऱ्यांना निरोगी बनवण्यामध्ये आपण प्रमाणित होतो. आपण समृद्ध आहोत, दुसऱ्यांनासुद्धा समृद्ध बनवण्यामध्ये आपल्या समृद्ध होण्याचे प्रमाण आहे. अशा सोप्या पद्धतीने सामाजिक होण्याची रीत येते. आतापर्यंत मानव संवेदनशीलतेमध्येच जगत आलेला आहे, त्यामुळे संग्रह, सुविधा, द्रोह – विद्रोह, शोषण ह्या गोष्टी समोर येत राहिल्या. ह्या रीतीने मानव संचेतनावादी मनोविज्ञानाचे मूळ रुप स्पष्ट होते. मुळात ती जीवनाची क्रियाच आहे, जाणण्यासाठी मानले तर जाणण्याच्या

आधारावर प्रवर्तित होतो आणि ओळखणे व निर्वाह करण्याच्या क्रमाने आपण आपोआपच न्यायिक होतो, नियंत्रित होतो, संतुलित होतो, सुखी होतो, हेच मानव संचेतनावादी मनोविज्ञानाचे प्रयोजन आहे.

विशेषज्ञ असणे एक भूत किंवा पिशाचासारखे आहे. ते सगळयांना मारुन टाकते. मी विशेषज्ञ आहे, म्हणून मी जे काही म्हणतो, ते बरोबर आहे असं मानण्यामुळे सगळयांत जास्त अपराध रोग्यांवरच झाले. रोगी जेव्हा आपल्या त्रासाला सांगायला सुरुवात करतो तेव्हा डॉक्टरांची ऐकायची इच्छा नसते, यंत्राद्वारे ते रोग्याला ऐकू इच्छितात. यंत्राद्वारे मानवाच्या त्रासाला आपण ओळखू शकत नाही. मानवच मानवाचा त्रास ऐकू शकतो, ओळखू शकतो, ह्या गोष्टी यंत्रांनी होऊ शकत नाहीत आणि आपण रोग ओळखू शकत नाही. काही लोकांनी आधी आयुर्वेदिक, युनानी, आणखी बाकीच्या पद्धतींनी नाडी ज्ञानाच्या आधारावर त्रास ओळखण्याचा प्रयत्न केला होता, ह्या गोष्टी प्रशंसनीय आहेत. त्यांनी नाडीद्वारे, नाडीच्या गतिद्वारे, दबावाद्वारे, प्रवाहाद्वारे, नाडीच्या तणावाद्वारे रोगाला ओळखण्याचा जो प्रयत्न केला होता, तो प्रशंसनीय आहे, हळूहळू, कालांतराने नाडी परीक्षण कठीण आहे असे स्वीकारुन मानवाने यंत्राकडे धाव घेतली. आता सगळेच यंत्राद्वारे आजार आणि त्रासाबद्दल ऐकू इच्छितात. यंत्राच्या आधारावर आपण कोणताही निर्णय घेतला तरी रोगी तृप्त होत नाही आणि रोगाच्या मूळ स्वरुपापासून चिकित्सक लांबच राहतात. त्यासाठी युक्ती, अनुसंधान, शोध करण्याची गोष्ट कळते. त्यात चूक होतेच. कारण अनुकूलता, प्रतिकूलता ह्यावर जो शोध करणे आवश्यक आहे, रोग्याबरोबर ते होत नाही. सगळी विशेषज्ञता संग्रह सुविधेमध्ये अडकली आहे. रोग्याला तपासून औषधे देण्यासाठी पन्नास रुपयांपासून दोन हजार रुपयांपर्यंत पैसे

घेतात. मी हे पाहिलं आहे की पन्नास रुपये घेऊन जी औषधे लिहिली जातात तीच औषधे दोन हजार रुपये घेऊन मोठया शहरातले विशेषज्ञ लिहितात. इथं मी ह्या गोष्टीकडे (तुमचं) लक्ष वेधायचा प्रयत्न केला आहे की मानव कसा वेडा झाला आहे, अधिक पैसे घेणारा अधिक चांगला चिकित्सक आहे असा विचार करतो, त्या सीमेपेक्षा अधिक अपेक्षा त्यामध्ये होऊच शकत नाही. तिसरी गोष्ट, चिकित्सेमध्ये आपण समग्रतेने कधी विचारच केला नाही म्हणजे चिकित्सक बनण्याचा विचारच केला नाही, तसा प्रयत्नच केला नाही. चिकित्सेची समग्रता म्हणजे सुरुवातीला स्वास्थ्य किंवा निरोगीपणाचे बलाबल ओळखणे. रोगाचे बलाबल कसे ओळखणार? नाडी द्वारे ओळखणार. नाडीमध्ये काय ओळखणार ? नाडीच्या गतिंची ओळख करुन रोगांचा साक्षात्कार करणार आणि लक्षणांशी मिळते जुळते आहे की नाही ते पाहणार आणि हाच रोग आहे हा निश्चय करणार. त्याची चिकित्सा केल्यानंतर सफल झाले तर आपण जे काही समजलो होतो ते योग्य होते हे मानावे, जर सफल झालो नाही तर आपले समजणे चुकीचे होते. मग ह्या विषयी शोध करणे आवश्यक होते. सध्या असं दिसतं, जो जशी चिकित्सा करतो, स्वतःला योग्य मानतो. सफल झाली काय किंवा असफल झाली काय, मी योग्य चिकित्सा केली आहे, असं मानतो. ह्यामुळेच आपण प्राणसंकटात सापडलेलो आहोत, त्यामुळे आधी रोग ओळखणे, त्यांचे बलाबल ओळखणे, औषधे ओळखणे, त्यांचे बलाबल ओळखणे, त्यांच्या योग संयोगाला ओळखणे, त्यांचे सेवन कसे करायचे हे ओळखणे, रोग्याच्या मानसिकतेला ओळखणे, त्याचे पथ्य ओळखणे, नियम, संयम गोष्टी एकत्र झाल्यानंतर समग्र चिकित्सा होऊ शकते. औषधियोगाने संपूर्ण चिकित्सा होऊ शकते. मणी चिकित्सा किरण विकिरणाविषयीच चर्चा करते, मंत्र चिकित्सा आपल्या मानसिक तरंगांना अधिक प्रभावित करते. केवळ औषधेच अशी आहेत की ती

अधिकाधिक रस क्रियांबरोबर विरघळून रस परिवर्तन करण्यास मदत करतात. रोग दूर कसे करायचे ही गोष्ट जितक्या चांगल्या पद्धतीने शरीर व्यवस्थेला माहिती आहे, तितकी कोणत्याही डॉक्टरांना माहिती नाही. शरीराला ठीक करण्याचे ट्रेनिंग शरीर व्यवस्थेमध्ये समाहित आहे. डॉक्टर तर शरीरावर अत्याचार करतात. चिकित्सकाने काय केले पाहिजे? शरीर व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी शरीर अवस्थेला अनुकूल रस - द्रव्ये शरीराला दिली पाहिजेत, हेच चिकित्सकाचे वैशिष्ट्य आहे, महिमा आहे, हाच त्याचा विवेक, विज्ञान आहे. अशा चिकित्सेमुळे आपण बरे होऊ शकतो, त्यामुळे  चिकित्सा ह्या गोष्टीला विशेषज्ञांच्या हातामधून काढून घेऊन तिचे लोकव्यापीकरण करायला हवं आहे.

स्वास्थ्याचा अर्थ शरीराशी निगडित आहे. संयमाचा अर्थ मनाशी निगडित आहे. जो न्याय होतो, नियमित होतो, नियमावर आधारित होतो, नियंत्रणावर आधारित होतो, संतुलनावर आधारित होतो, हाच संयम आहे, म्हणून संतुलन, न्याय असण्याच्या मानसिकतेला संयम म्हणतात. त्याचे औषध काय आहे? त्यासाठी काय करायला हवे आहे? त्यासाठी समजदारी हे औषध आहे. अपूर्ण समजेमुळे असंतुलन, मानसिक असंतुलन आणि समजदारीमुळे संतुलन हे एक अगदी साधारण सूत्र आहे. समजदारीच्या अर्थाने संपूर्ण व्यवस्था ,संतुलन आहे.

हरिहर